CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १२ मे २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १६३ । पाने १२ । किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



कार्यकर्ता आपल्या आचरणातून असाध्य तेही साध्य करू शकतो. कार्यकर्ता म्हणजे कार्यात चैतन्य निर्माण करणारी संजीवनी. सर्वांना बरोबर घेऊन काम करणारा, अनेक बंधूंना आपल्या कामाशी संलग्न करणारा आणि आपल्या पश्चात कार्य व्यवस्थितपणे चालू राहील अशी योजना करणाराच उत्तम कार्यकर्ता ठरतो.

**- स्व. कृ. सूर्यनारायण राव**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सेवा प्रमुख

२ न्यायाच्या प्रतीक्षेत ७२ टक्के आयुष्ये तुरुंगातच!
७ चादर, टॉवेल उद्योग लढतोय अस्तित्वाची लढाई

# तुष्टीकरणाला खतपाणी घालणाऱ्या शक्ती सक्रिय

**● पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन ● सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचा अमृत महोत्सव**



**◆ सोमनाथ, ११ मे**

देशातील काही शक्ती राष्ट्रीय स्वाभिमानापेक्षा तुष्टीकरणाच्या राजकारणाला प्राधान्य देणे सुरू ठेवत आहेत. अयोध्येतील राम मंदिराच्या उभारणीला झालेल्या विरोधादरम्यानही अशीच मानसिकता दिसून आली, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी केले.

सरदार वल्लभभाई पटेल आणि भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी अतोनात प्रयत्न केले. मात्र, तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या विरोधाचा सामना करावा लागला, असे येथे आयोजित जनसभेला संबोधित करताना मोदी म्हणाले.

जगातील कोणतीही शक्ती भारताला झुकवू शकत नाही किंवा दबावापुढे नमण्यास भाग पाडू शकत नाही, असे सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित सोमनाथ अमृत महोत्सवात सहभागी झालेल्या नरेंद्र मोदी यांनी ठामपणे सांगितले.

११ मे ही तारीखही महत्त्वाची आहे. कारण १९९८ मध्ये याच दिवशी भारताने अणुचाचण्या केल्या होत्या. जगभरात अशी



असंख्य उदाहरणे आहेत, जिथे विदेशी आक्रमकांनी एखाद्या देशाच्या अस्मितेशी जोडलेली स्थळे नष्ट केली. जेव्हा-जेव्हा लोकांना संधी मिळाली, तेव्हा त्यांनी आपला वारसा पुनरुज्जीवित केला आणि आपला स्वाभिमान जपला, असे नरेंद्र मोदी यांनी म्हटले.

तुष्टीकरणाच्या राजकारणाला खतपाणी घालणाऱ्या शक्ती देशात अजूनही सक्रिय आहेत. राम मंदिराच्या उभारणीदरम्यान आणि त्यास ज्या प्रकारे विरोध करण्यात आला, त्यावेळी आम्ही हीच घटना अनुभवली. अशा प्रकारच्या मानसिकतेबाबत आपण सावध राहिले पाहिजे आणि अशा संकुचित राजकारणाला मागे टाकले पाहिजे, असे मोदी म्हणाले.

◂(वृत्तसंस्था)

### पंतप्रधानांच्या हस्ते महापूजा

**» सोमनाथ अमृत महोत्सवाचा एक भाग म्हणून नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ मंदिरात महापूजा आणि इतर धार्मिक विधी पार पाडले. महापूजेसोबतच जलाभिषेक करण्यात आला. मोदी यांनी कुंभाभिषेक सोहळ्याचेही दर्शन घेतले. यात देशभरातील प्रमुख तीर्थक्षेत्रांतून संकलित केलेले पवित्र जल क्रेनच्या मदतीने मंदिराच्या कळसावर शिंपडण्यात आले.** ■

# गंधक भरलेल्या काडतुसांचा भीषण स्फोट

### कामगाराला गमवावे लागले दोन्ही पाय

### जुनी मिल चाळ येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मे-**

गंधक भरलेल्या काडतुसांचा भीषण स्फोट होऊन एक कामगार गंभीर जखमी झाल्याची घटना जुनी मिल चाळ परिसरात सोमवार, दि.११ मे २०२६ रोजी घडली. संपूर्ण परिसरात स्फोटाचा आवाज घुमला. केदार सिध्दप्पा छत्रे (वय-५३, रा.रामलिंग नगर, विजापूर रोड, सोलापूर) असे त्या कामगाराचे नाव आहे.



याबाबतचे वृत्त असे की, बाळासाहेब प्रभाकर फुल्ले यांच्या मालकीची जुनी मिल परिसरात सहारा गन हाऊस या नावाचा कारखाना आहे. केदार छत्रे हे याठिकाणी कामगार म्हणून काम पाहतात. सोमवारी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास ते गंधकाने भरलेले काडतुसे चारचाकी वाहनामध्ये ठेवत असताना भीषण स्फोट झाला. शासकीय रुग्णालयात उपचारार्थ त्यांना दाखल करण्यात आले होते. नंतर मार्कंडेय रुग्णालयात हलविण्यात आले आहे. यात केदार छत्रे यांना दोन्ही पाय गमवावे लागल्याचे सांगण्यात आले. घटनेची माहिती मिळताच बॉम्ब डिस्पोजल स्कॉड, फॉरेन्सिक टीम, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला.

# कुंपणासाठी ४५ दिवसांत जमीन

**कोलकाता, ११ मे**

बांगलादेशच्या सीमेवर कुंपण उभारण्यासाठी सीमा सुरक्षा दल अर्थात् बीएसएफला जमीन देण्याची प्रक्रिया आजपासूनच सुरू झाली असून हस्तांतरणाची प्रक्रिया ४५ दिवसांत पूर्ण होईल, अशी घोषणा पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी सोवारी केली.

बांगलादेशमधून घुसखोरी रोखण्यासाठी पावले उचलली जातील, असे भाजपाने विधानसभा निवडणुकीत दिलेले आश्वासन या माध्यमातून पूर्ण झाले आहे. भारत-बांगलादेश सीमेवर कुंपण उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचा संपूर्ण ताबा बीएसएफकडे दिला जाईल, असे विधानसभा निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या दणदणीत विजयानंतर काहीच दिवसांत 'नबन्ना' (राज्य सचिवालय) येथे पार पडलेल्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवताना अधिकारी यांनी सांगितले. आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत बीएसएफला जमीन हस्तांतरणाचा निर्णय घेण्यात आला. ही प्रक्रिया आजपासून सुरू झाली आणि पुढच्या ४५ दिवसांत पूर्ण होईल.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### शुभेन्दू सरकारच्या मंत्रिमंडळात खातेवाटप

**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी आपल्या मंत्रिमंडळात खातेवाटप केले. सोमवारी करण्यात आलेल्या या महत्त्वपूर्ण घोषणेत भाजपाच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांना महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. या खातेवाटपात दिलीप घोष आणि अग्निमित्रा पॉल यांच्यासारख्या प्रमुख व्यक्तींना राज्याच्या विकासाला आकार देणारी महत्त्वाची खाती देण्यात आली आहेत. खातेवाटपानुसार, दिलीप घोष यांच्याकडे ग्रामीण विकास (पंचायत) आणि पशु कल्याण विभाग, अग्निमित्रा पॉल यांना महिला आणि बाल कल्याण मंत्रालय, महानगरपालिका, निशित प्रामाणिक यांना उत्तर बंगाल विकास विभाग, युवा कल्याण आणि क्रीडा विभाग, क्षुदिराम टुडू यांना आदिवासी विकास मंत्रालय तर अशोक कीर्तनिया यांच्याकडे अन्न व पुरवठा विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. ■

### पंजाबमध्ये भाजपा कार्यालयावर हल्ला

**तरनतारन** : पंजाबमधील तरणतारण स्थित भाजपाच्या जिल्हा कार्यालयावर हल्ला करण्यात आला. सोमवारी सायंकाळी तरणतारण बायपासजवळील भाजपा कार्यालयात सुमारे १५ ते २० बुरखाधारी लोक अचानक घुसले आणि त्यांनी तोडफोड केली. हल्लेखोरांनी कार्यालयाच्या खिडक्या फोडल्या आणि घटनास्थळी उपस्थित भाजपा नेते व कार्यकर्त्यांना धक्काबुक्की केली. या घटनेमुळे परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. ■

# डिसेंबरपर्यंत टोलनाक्यांवर ‘मल्टिलेन फ्री फ्लो’ प्रणाली

## नितीन गडकरी यांची घोषणा; अत्याधुनिक टोल प्रणालीचे लोकार्पण

◆ **नवी दिल्ली, ११ मे**

यावर्षीच्या अखेरीस म्हणजे डिसेंबरपर्यंत देशातील पारंपरिक टोल प्लाजा हटवण्याची आणि उपग्रह आधारित टोल वसुली प्रणाली देशभर लागू करण्याची महत्वपूर्ण घोषणा केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी केली.


मुंडका बक्करवाला येथे देशातील दुसऱ्या मल्टिलेन फ्री फ्लो टोल प्लाझाचे लोकार्पण करताना नितीन गडकरी

दिल्लीच्या मुंडका बक्करवाला येथे देशातील दुसऱ्या मल्टिलेन फ्री फ्लो टोल (एमएलएफएफ) प्लाजाच्या लोकार्पण समारंभात गडकरी बोलत होते. यावेळी मंत्रालयाचे राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा, राज्यमंत्री अजय टम्टा, भाजपा खासदार योगेंद्र चंडोलिया आणि भाजपा खासदार कमलजीत सहरावत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ही प्रणाली फास्टॅग आणि अत्याधूनिक तंत्रज्ञानाने युक्त आहे.

२०२६ पर्यंत देशातील पारंपरिक टोल प्लाजा हटवण्यात येतील आणि मल्टिलेन फ्री फ्लो टोल प्रणाली लागू केली जाईल, असे स्पष्ट करत गडकरी म्हणाले की, या नव्या तंत्रज्ञानानुसार देशभरात १२५ टोलप्लाजा उभारण्यत येणार आहे, पहिल्या टप्प्यात सप्टेंबर २०२६ पर्यंत महाराष्ट्रासह ९ राज्यात असे १७ टोलप्लाजा सुरु केले जातील आणि त्यानंतर मार्च २०२७ पर्यंत आणखी १०८ टोल या प्रणालीत आणले जातील. आज टोलवसुली प्रणालीवर १५ टक्के खर्च होतो, नव्या प्रणालीमुळे हा खर्च ५ टक्क्यावर येईल म्हणजे १० टक्क्यांची बचत होईल, तसेच टोलचोरीच्या घटनांनाही आळा बसेल, त्यातूनही उत्पन्नात वाढ होईल आणि महसुलात १२ ते १५ हजार कोटींचा फायदा होईल, याकडे गडकरी यांनी लक्ष वेधले.

एनएचएआयचे सदस्य विशाल चव्हाण यांनी प्रास्ताविक केले तर एनएचएआयचे अध्यक्ष संतोषकुमार यादव यांनी या प्रणालीची सविस्तर माहिती दिली. याआधी १ मेला गडकरी यांनी मुंबई दिल्ली राष्ट्रीय महामार्ग ४८ वरील सुरत भरुच दरम्यानच्या चोरयासी येथे देशातील पहिल्या मल्टिलेन फ्री फ्लो टोल प्लाजाचे लोकार्पण केले होते. या प्रणालीत टोलनाक्यांवर कोणताही मानवी अडथळा राहात नाही, तर वरच्या बाजूला लावण्यात आलेल्या रचनेत असलेले कॅमेरे आणि सेंसर वाहनांच्या नंबरप्लेटवरुन वाहनचालकांच्या बँक खात्यातून काही सेकंदात टोल कापून घेतात. ◂(तभा वृत्तसेवा)

### वाहनांना टोलनाक्यावर थांबण्याची गरज नाही

नव्या प्रणालीमुळे आता वाहनचालकांना टोलनाक्यावर थांबण्याची गरज पडणार नाही, तर ते भरधाव निघून जाऊ शकतील, असे स्पष्ट करत गडकरी म्हणाले की, गाडीच्या नंबरप्लेट आणि फास्टॅग प्रणालीद्वारे या वाहनांचा टोल कापल्या जाईल. यामुळे टोलनाक्यावर वाहनांची गर्दी होणार नाही, तसेच वाहनाच्या इंधनाची तसेच वाहनचालकांच्या वेळेची बचत होईल. प्रदूषणातही लक्षणीय घट होईल. ■

# ‘नीट’ पेपर फुटला; १४ जणांना अटक

## केरळ कनेक्शन समोर; ५ लाख ते ३०,००० रुपयांत प्रश्नपत्रिकांची विक्री

◆ **नवी दिल्ली, ११ मे**

देशातील सर्वात मोठी वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीट यूजी २०२६ वरून राजस्थानमध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. कथित अनियमितता, गेस पेपर आणि संभाव्य पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर राजस्थान पोलिसांचे विशेष कृती दल (एसओजी) आणि दहशतवादविरोधी पथक (एटीएस) या प्रकरणाचा सातत्याने तपास करत आहेत. आतापर्यंत १४ जणांना अटक करण्यात आली असून अनेकांची चौकशी सुरू आहे.

या तपासाचे केंद्र राजस्थानचा सीकर जिल्हा आहे. जिथे परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांमध्ये एक कथित ‘गेस पेपर’ व्हायरल झाले होते. जरी राष्ट्रीय चाचणी संस्थेने (एनटीए) सुरुवातीला पेपरफुटी नाकारली असली तरी, तपास यंत्रणांनी उघड केलेल्या निष्कर्षांमुळे हे प्रकरण अत्यंत गंभीर पातळीवर पोहोचले आहे. व्हायरल झालेल्या गेस पेपरमधील १०० हून अधिक प्रश्न प्रत्यक्ष नीट यूजी २०२६ परीक्षेत विचारलेल्या प्रश्नांशी जुळले आहे. काही वृत्तांनुसार हा आकडा सुमारे १२५ आहे.

**२ मे च्या रात्री गेस पेपर व्हायरल**

वृत्तानुसार, नीट यूजी २०२६ परीक्षा ३ मे रोजी झाली. परीक्षेच्या एक दिवस आधी, २ मे च्या रात्री काही विद्यार्थ्यांपर्यंत एक गेस पेपर पोहोचला. हा गेस पेपर व्हॉट्सॲप ग्रुप्सद्वारे शेअर करण्यात आला आणि नंतर त्याच्या फोटोकॉपी विविध ठिकाणी वाटण्यात आल्या. राजस्थान एसओजीचे अतिरिक्त पोलिस महासंचालक विशाल बन्सल यांनी स्वतः पुष्टी केली की, गेस पेपर आला होता. तो व्हॉट्सॲपवर पोस्ट करण्यात आला होता आणि एका झेरॉक्सच्या दुकानात सापडला.

**झुंझुनूमध्ये १३ तर डेहराडूनमधून एकाला अटक**

तपासादरम्यान राजस्थान विशेष कृती दलाला माहिती मिळाली की, या प्रकरणातील एक हवा असलेला आरोपी डेहराडूनमध्ये लपून बसला आहे. त्यानंतर राजस्थान पोलिसांनी डेहराडून पोलिसांशी संपर्क साधून आरोपीबद्दलची माहिती दिली. या माहितीनंतर, डेहराडून पोलिसांनी दलनवाला पोलिस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करून आरोपी तरुणाला ताब्यात घेतले. तरुणाची चौकशी केल्यानंतर राजस्थान पोलिसांना माहिती देण्यात आली. ◂(वृत्तसंस्था)

### नमुना प्रश्नपत्रिका केरळमधून आली

अनेक माध्यमांच्या अहवालानुसार, राजस्थान एसओजीच्या तपासात असे उघड झाले की, केरळमधून सीकर येथे एक नमुना प्रश्नपत्रिका आली होती, ज्यामध्ये परीक्षेत विचारलेल्या प्रश्नांसारखेच सुमारे १५० प्रश्न होते. अहवालानुसार, १ मे रोजी केरळमध्ये एमबीबीएसचे शिक्षण घेत असलेल्या चुरू येथील एका विद्यार्थ्याने राकेश मंदारिया नावाच्या समुपदेशकाला एक गेस पेपर पाठवला. त्या विद्यार्थ्याने त्यांना सांगितले की, या गेस पेपर्स दक्षिण भारतात विकल्या जात आहेत. ■

### जीव-रसायनशास्त्रातील प्रश्नांमध्ये साम्य

तपासात असे उघड झाले की, व्हायरल झालेल्या गेस पेपरमधील मोठ्या संख्येने प्रश्न मूळ प्रश्नपत्रिकेशी जुळत होते. विशेषतः जीवशास्त्र आणि रसायनशास्त्रामध्ये हे साम्य अधिक होते. सूत्रांनुसार, ४०० हून अधिक प्रश्नांच्या संचापैकी, अंदाजे १२५ प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेतील प्रश्नांसारखेच होते. यामुळेच हे प्रकरण एका साध्या अंदाजित प्रश्नपत्रिकेवरून संभाव्य प्रश्नपत्रिका फुटी आणि एका संघटित रॅकेटच्या तपासापर्यंत पोहोचले. ■

### परीक्षेच्या दिवशीच केली तक्रार

वृत्तानुसार, काही विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या दिवशी सीकर येथील उद्योग नगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. विद्यार्थ्यांनी आरोप केला की, काही जणांकडे आधीपासूनच एक अंदाजित प्रश्नपत्रिका होती, ज्यात परीक्षेतील अनेक प्रश्न होते. तथापि, स्थानिक पोलिसांनी त्यावेळी हे प्रकरण गांभीर्याने घेतले नाही. ■

# टीसीएसमध्ये महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक, मानसिक छळ

## राष्ट्रीय महिला आयोगाचा धक्कादायक अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर

◆ **नाशिक, ११ मे**

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) च्या नाशिक कार्यालयात कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि बळजबरीने धर्मांतर प्रकरणावरून राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. हे प्रकरण महिला कर्मचाऱ्यांच्या मानसिक आणि शारीरिक छळाशी संबंधित आहे. या प्रकरणात राष्ट्रीय महिला आयोगाचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. आयोगाने ५० पानांचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला आहे.

या अहवालात कार्यस्थळी लैंगिक छळ, मानसिक अत्याचार, धार्मिक भावना दुखावणे आणि कायद्याच्या शून्य अंमलबजावणी, असे गंभीर आरोप नोंदविले आहेत. आरोपींकडून महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक, मानसिक आणि भावनिक छळ झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. हिंदू धर्म, परंपरा आणि श्रद्धांचा अपमान करून महिलांवर दबाव टाकल्याचा आरोप करण्यात करण्यात आला आहे.



**सीसीटीव्ही आढळले बंद अवस्थेत**

अहवालानुसार कार्यालयात सीसीटीव्ही बसवलेले असले तरी ते बंद अवस्थेत आहे. तसेच महिला कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण, तक्रार केल्यास बदली आणि नोकरी गमावण्याची भीती दाखवल्याचाही उल्लेख त्यात आहे. पोश समिती पूर्णपणे निष्क्रिय असून नाशिक कार्यालयात कोणतीही जागरूकता व्यवस्था नव्हती, असेही आयोगाच्या निदर्शनास आले. आयोगाने पोलिसांना साक्षीदार संरक्षण कायद्यांतर्गत तक्रारदारांना संरक्षण देण्याचे निर्देश दिले आहेत. आयोगाने संबंधित आरोपींवर कलम ७५, ७८, ७९ आणि २९९ अंतर्गत कारवाईची शिफारस केली असून टीसीएस व्यवस्थापनावरही कठोर प्रश्न उपस्थित केले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### ‘तुम तो ठहरे परदेसी’चे गीतकार जहीर आलम यांचे निधन

◆ **नागपूर, ११ मे**

९० च्या दशकात प्रचंड लोकप्रिय ठरलेल्या ‘तुम तो ठहरे परदेसी, साथ क्या निभाओगे...’ या गाजलेल्या



गीताचे गीतकार जहीर आलम यांचे रविवारी रात्री नागपुरात दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने नागपूरच्या साहित्य, गझल आणि संगीत क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मोमीनपुरा परिसरात वास्तव्यास असलेले झहीर आल यांनी अत्यंत संघर्षय जीवन जगले. सुरुवातीला त्यांनी एम्प्रेस मिलमध्ये नोकरी केली होती. मिल बंद पडल्यानंतर त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, गीतलेखन आणि शायरीची आवड त्यांनी अखेरपर्यंत जपली. त्यांनी लिहिलेले ‘तु तो ठहरे परदेसी’ हे गीत गायक अल्ताफ राजा यांच्या आवाजात देशभर गाजले. १९९० च्या दशकात कॅसेट संस्कृतीच्या काळात हे गाणे अक्षरशः घराघरात पोहोचले होते. विरह आणि वेदनेची भावना व्यक्त करणाऱ्या या गीताने रसिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले. ◂(तभा वृत्तसेवा)


पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी पदभार स्वीकारताच धडाकेबाज निर्णय घेण्यास सुरुवात केली. शपथ घेतलेल्या मंत्र्यांना खातेवाटप केल्यानंतर कॅबिनेटची पहिली बैठक पार पडली. या बैठकीसाठी मंत्रालयात येताना मुख्यमंत्री अधिकारी

# एसटी उभारणार २०० चार्जिंग स्टेशन्स

## खाजगी वाहनांनाही मिळणार चार्जिंगची सुविधा

◆ **मुंबई, ११ मे**

सन २०३५ पर्यंत एसटी महामंडळातील सर्व बसेस ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याच्या दृष्टीने राज्य शासन आणि एसटी महामंडळाकडून वेगाने प्रयत्न सुरू आहेत. या अनुषंगाने आवश्यक असलेल्या चार्जिंग सुविधांची उभारणी करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राज्यभरात किमान २०० चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार असून, यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



मंत्रालयातील आपल्या दालनात आयोजित एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, सन २०३५ पर्यंत एसटीच्या सर्व बसेस ई-बसेस करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्या दृष्टीने भविष्यात सुमारे २० हजार ई-बसेससाठी आवश्यक चार्जिंग स्टेशन उभारणे ही काळाची गरज आहे. राज्यभरातील एसटी महामंडळाच्या उपलब्ध जागांवर नियोजित चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी ठराविक क्षेत्र संबंधित विकासकाला देण्यात येईल. त्या ठिकाणी विकासकाकडून आधुनिक चार्जिंग स्टेशन उभारण्यात येतील, जिथे एसटीच्या ई-बसेस चार्ज केल्या जातील.

यासोबतच सुमारे १५०० चौरस फूट जागा संबंधित विकासकाला भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येणार असून, इतर वेळेत त्या चार्जिंग स्टेशनवर खाजगी वाहनांनाही चार्जिंग सुविधा देण्यास परवानगी असेल. त्यामुळे एसटी महामंडळाला माफक दरात ई-बसेस चार्जिंगची सुविधा उपलब्ध होईल. तसेच विकासकाने वापरलेल्या जागेचे भाडे आणि खाजगी वाहनांच्या चार्जिंगमधून मिळणाऱ्या नफ्यातील ठराविक हिस्सा महसूल स्वरूपात एसटी महामंडळाला प्राप्त होणार आहे. या स्वरूपाचा सार्वजनिक-खाजगी भागीदारीतील प्रकल्प उभारण्यात येणार असून, त्याची निविदा प्रक्रिया येत्या काही दिवसांत सुरू करण्यात येईल. त्यामुळे भविष्यात पर्यावरणपूरक ई-बसेसच्या दृष्टीने एसटी महामंडळ स्वयंपूर्ण होईल, असा विश्वासही मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. ◂(वृत्तसंस्था)

# आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांची पगारवाढ

## आता ६० टक्के दराने मिळणार महागाई भत्ता

◆ **मुंबई, ११ मे**

महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांसाठी आज आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने या अधिकाऱ्यांच्या महागाई भत्यात २ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला असून, याबाबतचा अधिकृत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केला आहे. या निर्णयामुळे राज्यातील सनदी अधिकाऱ्यांच्या मासिक वेतनात मोठी वाढ होणार आहे.

केंद्र सरकारच्या वित्त मंत्रालयाने २२ एप्रिल २०२६ रोजी घेतलेल्या निर्णयाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने हा निर्णय घेतला आहे. यापूर्वी महागाई भत्याचा दर ५८ टक्के इतका होता, जो आता २ टक्क्यांनी वाढवून ६० टक्के करण्यात आला आहे. ही वाढ १ जानेवारी २०२६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आली आहे. या निर्णयाचा लाभ महाराष्ट्र राज्य संवर्गात कार्यरत असलेल्या भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलिस सेवा, भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांना मिळणार असून, यांना गेल्या चार महिन्यांची थकबाकी देखील मिळणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### थकबाकीसह मिळणार रक्कम

जानेवारी, फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल या महिन्यांचा वाढीव भत्ता आणि मे महिन्याचा पगार या अधिकाऱ्यांना आता नवीन ६० टक्के दराने दिला जाणार आहे. वाढत्या महागाईच्या काळात केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर राज्य संवर्गातील अधिकाऱ्यांना हा दिलासा देण्यात आला आहे. ■

# हिमंता बिस्व सरमा आज घेणार मुख्यमंत्रिपदाची शपथ



◆ **गुवाहाटी, ११ मे**

आसामच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ मंगळवारी घेण्यासाठी हिमंता बिस्व सरमा सज्ज असून, या राज्यात भाजपाप्रणीत रालोआ सरकारचा सलग तिसरा कार्यकाळ सुरू होत आहे. खानापारा येथील पशुवैद्यकीय महाविद्यालय मैदानावर होणाऱ्या शपथविधी समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन्,केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन तसेच रालोआचे ४० पेक्षा जास्त मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री उपस्थित राहतील, अशी अपेक्षा आहे. रविवारी सरमा यांची मुख्यमंत्रिपदी नियुक्ती करणारे राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य सकाळी ११.४० वाजता भाजपा नेते आणि मंत्रिमंडळातील सदस्यांना पद आणि गोपनीयतेच शपथ देतील. ◂(वृत्तसंस्था)

### हवाई तळाजवळ तीन संशयितांना अटक

◆ **पठाणकोट, ११ मे**

नौशेरा हवाई तळाजवळ संशयास्पद स्थितीत फिरणाऱ्या तिघांना पठाणकोठ पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपींकडून पंजाब पोलिस कॉन्स्टेबलचे बनावट ओळखपत्रही जप्त करण्यात आले. ही कारवाई रविवारी रात्री सुमारे ११ वाजता करण्यात आली. हे तिन्ही आरोपी एका कारमधून पंजूपूर गावातून प्रवास करीत होते. पोलिस पथकाने नाकाबंदीदरम्यान त्यांची कार थांबवून तिची झडती घेतली असता आरोपींनी आपण गुप्तचर कर्तव्यावर असल्याचा दावा करीत आपली ओळखपत्रे दाखवली. ◂(वृत्तसंस्था)

# न्यायाच्या प्रतीक्षेत ७२ टक्के आयुष्ये तुरुंगातच!

## प्रलंबित खटले आणि गरिबीमुळे लाखो कच्चे कैदी कोठडीत

◆ **मुंबई, ११ मे**

भारतीय न्यायव्यवस्थेत उशिरा मिळालेला न्याय हा न्याय नाकारण्यासारखाच असतो, असे वारंवार म्हटले जाते. या विधानाचे विदारक वास्तव सध्या देशातील तुरुंगांच्या स्थितीवरून समोर येत आहे. आज देशातील तुरुंगांमध्ये असलेल्या एकूण कैद्यांपैकी तब्बल ७२.६ टक्के हे कच्चे कैदी आहेत. याचा अर्थ असा की, त्यांच्यावर अद्याप गुन्हा सिद्ध झालेला नाही, तरीही ते कैद्यांचे जीवन जगत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, ९ हजारांहून अधिक कच्चे कैदी तर ५ वर्षांपेक्षा जास्त काळ केवळ सुनावणीच्या प्रतीक्षेत तुरुंगात



खितपत पडले आहेत.

कच्च्या कैद्यांची संख्या वाढण्यामागे न्यायालयांमधील प्रलंबित खटल्यांची संख्या हे सर्वात मोठे कारण आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (एनसीआरबी) २०२४ च्या अहवालानुसार, देशात हत्येचे सुमारे २.७४ लाख खटले अद्याप प्रलंबित आहेत.

बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांचे २ लाखांहून अधिक, तर अपहरण आणि खंडणीचे २.१७ लाखांहून अधिक खटले न्यायालयात निर्णयाच्या प्रतीक्षेत आहेत. सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे, या कच्च्या कैद्यांपैकी अनेकांवरील गुन्हे शेवटी सिद्धच होत नाहीत. अहवालातील आकडेवारीनुसार, हत्येच्या गुन्ह्यांत गुन्हेगार ठरण्याचे प्रमाण केवळ ४३.८ तर बलात्काराच्या प्रकरणांमध्ये हे प्रमाण अवघे २४.४ टक्के आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### आकडेवारी काय सांगते? (एनसीआरबी २०२४ नुसार)

| | |
|---|---|
| **७२.६ टक्के** : | देशातील तुरुंगांमधील एकूण कच्च्या कैद्यांचे प्रमाण |
| ९,०२८: | पाच वर्षांहून अधिक काळ तुरुंगात असलेले कच्चे कैदी |
| २,७४,८१४: | न्यायालयांत प्रलंबित असलेले हत्येचे खटले |
| २,०६,७७७: | बलात्काराचे प्रलंबित खटले |
| २,१७,७१०: | अपहरणाचे न्यायालयात प्रलंबित असलेले खटले |

### गरिबीचा शाप आणि जामिनाची अडचण

कच्च्या कैद्यांपैकी बहुतांश जण हे गरीब आणि अल्पशिक्षित वर्गातील आहेत. अनेकदा न्यायालय जामीन मंजूर करते, परंतु जामिनाची रक्कम भरण्यासाठी किंवा जामीनदार उभा करण्यासाठी या कैद्यांकडे पैसे नसतात. चांगला वकील न मिळाल्यामुळे आणि कायदेशीर प्रक्रियेचे ज्ञान नसल्यामुळे हे लोक जामीन मिळूनही तुरुंगातच सडत राहतात. ■


# कुनोमध्ये दोन चित्ते सोडले निसर्गवासात

## मध्य प्रदेशची आता चित्ता राज्य म्हणून ओळख : मुख्यमंत्री

◆ **श्योपूर, ११ मे**

बोत्सवानाहून आणलेल्या दोन चित्त्यांचा विलगीकरण कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांना सोमवारी कुनो राष्ट्रीय उद्यानातील खुल्या जंगलात मुक्त करण्यात आले, अशी माहिती मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी दिली. नायजेरिया, दक्षिण आफ्रिका आणि आता बोत्सवानाहून आणलेल्या चित्त्यांच्या पुनर्वसनाच्या प्रक्रियेला सातत्यपूर्ण यश मिळत आहे. आज मध्य प्रदेशने चित्ता राज्य म्हणून देशभरात आपली ओळख निर्माण केली आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री यादव पुढे म्हणाले, प्रकल्प चित्ताचा मुख्य उद्देश राज्यातील नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या या प्राणी प्रजातीचे पुनर्वसन करणे, त्यांची संख्या वाढविणे आणि त्यांना मुक्तपणे शिकार व संचार करण्यासाठी सज्ज करणे हा आहे. मध्य प्रदेशने चित्त्यांचा



मनापासून स्वीकार केला आहे आणि त्यांना आपल्या कुटुंबाचाच एक भाग बनवले आहे. चित्त्यांच्या पुनर्वसनाचा हा प्रकल्प सुमारे साडेतीन वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते कुनोमध्ये सुरू करण्यात आला होता. आज तो यशस्वीपणे पुढे वाटचाल करत आहे. या महत्त्वाच्या प्रकल्पात मध्य प्रदेश नवनवे विक्रम प्रस्थापित करत आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**भारतात चित्त्यांची संख्या ५७ वर पोहोचली**

फेब्रुवारी महिन्यात बोत्सवानाहून कुनोमध्ये आणलेल्या सहा मादी आणि तीन नरांसह नऊ चित्त्यांना स्थानिक वातावरणाशी जुळवून घेता यावे, यासाठी सुरुवातीला छोट्या कुंपणांमध्ये ठेवण्यात आले होते. आता त्यांनी आपला विलगीकरण कालावधी पूर्ण केला आहे. या चित्त्यांच्या आगमनामुळे भारतात (येथेच जन्मलेल्या बछड्यांसह) चित्त्यांची एकूण संख्या ५७ वर पोहोचली आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली. ◂(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# संघर्ष पुन्हा भडकण्याची चिन्हे

## ट्रम्प यांनी फेटाळली इराणची शांतता योजना




### होर्मुझमध्ये विदेशी युद्धनौकांना प्रवेश नाही : इराण

**अमेरिकेच्या कोणत्याही नवीन हल्ल्यांना प्रत्युत्तर दिले जाईल तसेच होर्मुझच्या सामुद्रधुनीत आणखी विदेशी युद्धनौकांना प्रवेश करू दिला जाणार नाही, असा इशारा यावर इराणने दिला आहे. इराणने अमेरिकेचा प्रतिप्रस्ताव हा शरणागतीसारखा असल्याचे सांगून तो फेटाळला आहे आणि त्याऐवजी अमेरिकेकडून युद्धाची नुकसान भरपाई, होर्मुझच्या सामुद्रधुनीवर इराणचे संपूर्ण सार्वभौमत्व, निर्बंधांचा अंत आणि जप्त केलेल्या इराणी मालमत्ता परत करण्याचा आग्रह धरला असल्याचे वृत्त इराणच्या सरकारी दूरचित्रवाणीने दिले.**

> **आम्ही शत्रूसमोर कधीही झुकणार नाही; आणि जर चर्चा किंवा वाटाघाटींचा विषय निघाला तर त्याचा अर्थ शरणागती किंवा माघार असा होत नाही.**
>
> **मसूद पेझेश्कियान**
> इराणचे राष्ट्राध्यक्ष

◆ **वॉशिंग्टन, ११ मे**

मध्यपूर्वेतील दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ सुरू असलेले युद्ध संपुष्टात आणण्याचा इराणचा प्रस्ताव अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फेटाळला आहे. इराणच्या अटी पूर्णपणे अस्वीकाराह असल्याचे नमूद करीत त्यांनी आठवडाभराच्या वाटाघाटीनंतर पुन्हा संघर्ष भडकणार असल्याचे संकेत दिले.

इस्लामिक प्रजासत्ताक इराणचा लष्करीदृष्ट्या पराभव झाला आहे, असे इराण युद्ध संपुष्टात आणण्यासाठी देशांतर्गत दबाव वाढत असताना डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले. युद्ध छेडण्यामागील प्रमुख कारणांपैकी एक असलेला इराणचा अणुकार्यक्रम आता नियंत्रणात आणला गेला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

इराणचा प्रस्ताव फेटाळताना या प्रस्तवाबाबतचे तपशील ट्रम्प यांनी दिले नाहीत. मात्र, ट्रूथ सोशल या मंचावर पोस्टमध्ये हा प्रस्ताव फेटाळत असल्याचे त्यांनी नमूद केले. मी नुकताच इराणच्या तथाकथित प्रतिनिधीचा प्रस्ताव वाचला आहे. मला तो आवडला नाही. तो पूर्णपणे अस्वीकाराह असल्याचे ट्रम्प यांनी सांगितले.

इराणने अमेरिकेसमोर आपल्या मागण्या मांडल्या असून, आपल्याकडील काही अत्यंत समृद्ध युरेनियम कमी करण्याची आणि उर्वरित युरेनियम एखाद्या तिसऱ्या देशात हस्तांतरित करण्याची शिफारस केली आहे, असे वृत्त आहे. वाटाघाटी अयशस्वी झाल्या किंवा अमेरिकेने नंतर करारातून माघार घेतली तर हस्तांतरित केलेले युरेनियम परत केले जाईल, असे इराणने मध्यस्थ पाकिस्तानमार्फत दिलेल्या प्रस्तावात म्हटले आहे.

इराणचा प्रतिसाद फेटाळताना ट्रम्प यांनी अशा तपशीलांचा कोणताही उल्लेख केला नाही. अमेरिका इराणच्या समृद्ध युरेनियम साठ्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहे तसेच जर कोणी त्या ठिकाणाजवळ जाण्याचा प्रयत्न केला, तर अमेरिकेला त्याची तत्काळ कल्पना येईल आणि असा प्रयत्न उधळला जाईल, असे ट्रम्प यांनी एका पत्रकारासोबत चर्चा करताना सांगितले. (वृत्तसंस्था)



गुजरातमधील गीर सोमनाथ जिल्ह्यात असलेल्या प्रसिद्ध सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराला ७५ वर्षे पूर्ण झालीत. सोमनाथ अमृत महोत्सवप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महापूजा आणि अनुष्ठान करण्यात आले. तसेच त्यांच्या हस्ते मंदिराच्या कळसाचा जलाभिषेक करण्यात आला. यासाठी ११ पवित्र ठिकाणांहून जल आणले

# बनावट पासपोर्टवर प्रवास; अफगाण नागरिकाला अटक

◆ **पणजी, ११ मे**

बनावट पासपोर्टचा वापर करून भारतीय नागरिक असल्याचे भासवून प्रवास केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी दाबोलीम येथील गोवा आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका अफगाण नागरिकाला अटक केली आहे. आरोपी कंदहारचा मूळ रहिवासी असून सध्या तो दिल्लीत वास्तव्यास आहे. दिवराज हिरो, असे आरोपीचे नाव आहे. त्याला रविवारी पहाटे विमानतळावरील इमिग्रेशन तपासणीदरम्यान कागदपत्रांमध्ये तफावत आढळल्यानंतर ताब्यात घेतले.

आरोपी नुकताच रशियाहून बहरीनमार्गे गोव्याला आला होता. तसेच, दिल्लीचा रहिवासी असल्याची बतावणी करुन तो अनिल शुक्ला या नावाने मिळवलेले एक बनावट भारतीय पासपोर्ट चा वापर करत होता. कागदपत्रांच्या पडताळणीदरम्यान, या आरोपीने यापूर्वी सुरेश आहुजा असल्याचे भासवून आणखी एक भारतीय पासपोर्ट मिळवले असल्याचेही अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले.

या आरोपीकडे अफगाण पासपार्टही होता. २००९ पासून त्याने अनेकदा भारतात प्रवास केला होता.

त्याने आपल्या अफगाण पासपोर्टचे नूतनीकरण भारताबाहेर केले होते. २ जानेवारी २०१६ रोजी तो पुन्हा भारतात दाखल झाला होता. या आरोपीविरुद्ध दाबोलीम विमानतळ पोलिस ठाण्यात फसवणूक आणि तोतयागिरीशी संबंधित विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

# माजी मंत्री बालाजींची सीबीआय चौकशी होणार

◆ **चेन्नई, ११ मे**

तामिळनाडूतील कथित ३९७ कोटी रुपयांच्या ट्रान्सफॉर्मर खरेदी घोटाळ्यात माजी ऊर्जा मंत्री व्ही. सेंथिल बालाजी यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा झटका बसला आहे. या प्रकरणात सीबीआय चौकशीचे निर्देश देणाऱ्या मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी नकार दिला. या प्रकरणात दाखल विशेष रजा याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या न्यायासनाने म्हटले की, याचिकेत विशेषतः मागणी केली नसली तरी, परिस्थितीनुसार न्यायालय सीबीआय चौकशीचे आदेश देऊ शकते.

सुनावणीदरम्यान, तामिळनाडू जनरेशन अँड डिस्ट्रिब्युशन कॉर्पोरेशनच्या एका अधिकाऱ्याचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील सिद्धार्थ दवे यांनी असा युक्तिवाद केला की, मद्रास उच्च न्यायालयात सीबीआय चौकशीची कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही आणि हे प्रकरण राजकीय हेतूने प्रेरित आहे. (वृत्तसंस्था)

# आयएसआयशी संबंधित तीन दहशतवाद्यांना अटक

## मंदिर, लष्करी तळ उडविण्याचा होता कट

◆ **भोपाळ, ११ मे**

दिल्ली पोलिसांनी पाकिस्तानी गुप्तहेर संस्था आयएसआयशी संबंधित मध्य प्रदेशातील तीन तरुणांना अटक केली आहे. या तिघांनी दिल्लीतील ऐतिहासिक मंदिर, दिल्ली-सोनीपत महामार्गावरील एक ढाबा आणि हरियाणातील लष्करी तळ उडवण्याचा कट रचला होता, असा पोलिसांचा दावा आहे. अनमोल राय रा. टीकमगढ, राजवीर आणि विवेक बंजारा दोघेही रा. डबरा, अशी आरोपींची नावे आहे. तिघांनाही पोलिसांनी त्यांच्या गावातून अटक करून सोबत नेले.



स्पेशल सेलचे एसीपी पीएस कुशवाहा यांच्या मते, तिन्ही आरोपी गरीब कुटुंबातील आहेत. तिघांच्याही मोबाईलवरील ऑडिओ, व्हिडिओ कॉलवरून संशयास्पद नंबरवर बोलणे झाल्याची आणि सोशल मीडियावरून विशिष्ट ठिकाणांचे फोटो पाकिस्तानात पाठवल्याची पुष्टी झाली आहे. आरोपींच्या मोबाईलमधून अनेक संशयास्पद ई-मेलही मिळाले आहेत. आरोपींना दहशतवादी कटात सामील करून घेण्यासाठी त्यांना काय मिळाले होते, याचा पोलिस शोध घेत आहेत.

### लष्करी छावणीसह आसपासचे बनवले व्हिडीओ

**आरोपींनी हरियाणातील हिसार येथील एका सैन्य छावणीचीही रेकी केल्याचे समोर आले आहे. आरोपींनी छावणी आणि आसपासच्या परिसराचे व्हिडिओ बनवून पाकिस्तानातील हँडलर्सना पाठवले होते. उत्तर प्रदेशातील काही पोलिस ठाणेही मॉड्यूलच्या निशाण्यावर होते.**

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने 'गँग बस्ट ऑपरेशन २.०' अंतर्गत विविध राज्यांमधून शाहजाद भट्टी मॉड्यूलशी संबंधित ९ संशयित ऑपरेटिव्हना अटक केली होती. त्यांच्या चौकशीतून तपास यंत्रणांना कळले की, आरोपींपैकी एकाने दिल्लीतील एका ऐतिहासिक मंदिराची रेकी केली होती.

परिसराची छायाचित्रे सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानमधील हँडलर्सना पाठवली होती. मॉड्यूलची योजना मंदिरात तैनात पोलिस आणि निमलष्करी दलांना लक्ष्य करण्याची आणि गोळीबार करून दहशत पसरवण्याची होती. (वृत्तसंस्था)

# चित्रपट वार्ता

## 'राजा शिवाजी'ची घोडदौड




**मुंबई** : 'राजा शिवाजी' हा ऐतिहासिक मराठी चित्रपट बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई करत असून प्रेक्षकांकडून मोठा प्रतिसाद मिळवत आहे. रितेश देशमुख दिग्दर्शित या चित्रपटाने प्रदर्शनाच्या दहाव्या दिवसापर्यंत देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर ७५ कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. संजय दत्त, अभिषेक बच्चन, जेनेलिया डिसूझा आणि विद्या बालन यांसारख्या कलाकारांनी सजलेल्या या चित्रपटाने पहिल्या आठवड्यापासूनच दमदार कामगिरी केली. दुसऱ्या वीकेंडमध्येही चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ झाल्याचे दिसून आले.चित्रपटाने पहिल्या आठवड्यात ५७.७० कोटी रुपयांची कमाई केली होती. त्यानंतर आठव्या दिवशी ३.५० कोटी, नवव्या दिवशी ६.३० कोटी आणि दहाव्या दिवशी ७.६० कोटी रुपयांची कमाई झाली. महाराष्ट्रासह देशभरातील प्रेक्षकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि कुटुंबीयांची मोठी उपस्थिती यामुळे चित्रपटाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.

## विजयचा 'जना नायकन' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला




**चेन्नई** : तामिळनाडूचे नवनियुक्त मुख्यमंत्री विजय यांचा बहुचर्चित आणि शेवटचा चित्रपट 'जना नायकन' प्रेक्षकांच्या भेटीला येण्याच्या मार्गावर आहे. गेल्या काही महिन्यांपासून सीबीएफसी प्रमाणपत्राच्या प्रक्रियेमुळे चित्रपटाचे प्रदर्शन रखडले होते. मात्र, आता निर्मात्यांनी चित्रपटाच्या रिलीजबाबत मोठी माहिती दिली आहे. चित्रपटाचे निर्माता व्यंकट के. नारायण यांनी चेन्नईमध्ये माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, चित्रपट पुढील दोन आठवड्यांत प्रदर्शित होऊ शकतो. केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळासोबत चर्चेची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून चित्रपटाला मंजुरी मिळण्याची शक्यता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दिग्दर्शक एच. विनोथ यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला हा चित्रपट गेल्या काही महिन्यांपासून चर्चेचा विषय ठरला आहे. प्रमाणपत्र प्रक्रियेसोबतच ऑनलाइन लीकच्या वादामुळेही चित्रपटाची चर्चा रंगली होती.

## फरहाना दिसणार 'खतरों के खिलाडी' शोमध्ये



**मुंबई** : बिग बॉस १९ ची उपविजेती फरहाना भट्ट आता छोट्या पडद्यावरील लोकप्रिय टीव्ही शो 'खतरों के खिलाडी'मध्ये झळकणार आहे. यावेळी 'डर का नया दौर' अशी थीम असेल. याप्रसंगी जुने आणि नवीन स्पर्धकांमध्ये जोरदार स्पर्धा होणार आहे. खरे तर आयुष्यात खरी स्पर्धा ही स्पर्धकांच्या नव्हे तर स्वतःच्या भीतीसोबत असते. मी आजही अनेक गोष्टींना घाबरते. पण, आता कदाचित भीती काय असते, हे जवळून पाहण्याची संधी मिळू शकते, अशी भावना फरहानाने व्यक्त केली. या शोमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाल्यानंतर मनात उत्सुकताही असेल आणि भीतीही. रोहित शेट्टींसारख्या दिग्गजासोबत काम करणे खूप मोठी गोष्ट आहे, असे ती म्हणाली.

# उत्तर प्रदेशमध्ये 'कृष्णावतारम' करमुक्त

◆ **लखनौ, ११ मे**

प्रदर्शित झाल्यापासून प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणाऱ्या 'कृष्णावतारम पार्ट १ : हृदयम' या चित्रपटासाठी एक मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. उत्तर प्रदेश सरकारने या चित्रपटाला राज्यभर 'करमुक्त' घोषित केले. सोमवारी चित्रपटातील कलाकार आणि निर्मात्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, ज्याचे फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. भगवान श्रीकृष्णाचे जीवन आणि सनातन संस्कृतीचे भव्य दर्शन घडवणाऱ्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरही आपली पकड मजबूत केली आहे. अवघ्या चार दिवसांत या चित्रपटाने देशांतर्गत ८ कोटींहून अधिक, तर जगभरात सुमारे ९.८० कोटींची कमाई करत कपिल शर्माच्या 'दादी की शादी' या चित्रपटालाही मागे टाकले आहे. (वृत्तसंस्था)

# 'त्या' ३१ जागांवरील विजयाचे अंतर कमी

◆ **नवी दिल्ली, ११ मे**

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) दरम्यान वगळलेल्या मतांच्या तुलनेत पश्चिम बंगाल विधानसभा जागांवरील विजयाचे अंतर कमी असल्याबाबत सर्वोच्च न्यायालयात नवीन याचिका दाखल करता येतील. सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि इतरांना या संदर्भात नवीन याचिका दाखल करण्याची परवानगी दिली आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या न्यायासनाने सोमवारी हे निर्देश जारी केले. हे प्रकरण तेव्हा समोर आले, जेव्हा ज्येष्ठ वकील आणि तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी न्यायालयात युक्तिवाद केला की, राज्यातील ३१ विधानसभा जागांवरील विजयाचे अंतर हे मतदार यादीतून वगळलेल्या मतांच्या संख्येपेक्षा कमी होते.

निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयासमोर आपली बाजू मांडताना सांगितले की, अशा दाव्यांसाठी निवडणूक याचिका हेच एकमेव योग्य माध्यम आहे. एसआयआर प्रकरणांशी आणि मतांच्या समावेश किंवा वगळण्याशी संबंधित अपीलांसाठी आयोग जबाबदार असू शकतो, असेही आयोगाने स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

### हिंसाचाराच्या घटनेचा तपास दोन महिन्यांत पूर्ण करा

**पश्चिम बंगालमधील मालदा जिल्ह्यात १ एप्रिलला झालेल्या हिंसाचाराच्या घटनेचा तपास दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय तपास यंत्रणेला दिले आहेत. या हिंसाचारात सात न्यायालयीन अधिकाऱ्यांना जमावाने नऊ तास ओलीस ठेवले होते. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या न्यायासनाने म्हटले की, तपास पूर्ण झाल्यावर एनआयएने आपला अहवाल सक्षम न्यायालयात सादर करावा.**

# चंद्रनाथ रथ हत्या प्रकरणी तिघांना अटक

## उत्तरप्रदेशातून घेतले ताब्यात

◆ **कोलकाता, ११ मे**

पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक चंद्रनाथ रथ यांच्या हत्या प्रकरणात तीन जणांना उत्तरप्रदेशातून अटक करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. आरोपींना न्यायालयाने १३ दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

उत्तर२४ परगणा जिल्ह्यातील मध्यग्राम भागात ६ मे रोजी रात्री घडलेल्या हत्येचा तपास करण्यासाठी स्थापन केलेल्या विशेष तपास पथक अर्थात् एसआयटीने रविवारी तीन आरोपींना ताब्यात घेतले आणि त्यानंतर त्यांना अटक केली.



तपास अधिकाऱ्यांनी या प्रकरणात डिजिटल धागेदोरे आणि आंतरराज्यीय दुवे शोधून काढले, असे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

ही एक महत्त्वपूर्ण प्रगती आहे. हल्लेखोर पश्चिम बंगालबाहेरील असल्याचे तपासातून निष्पन्न झाले. तांत्रिक पाळत, डिजिटल ट्रॅकिंग आणि इतर माहितीच्या आधारे एसआयटीचे सदस्य उत्तरप्रदेश आणि बिहारमध्ये पाठवण्यात आले. त्यांनी उत्तरप्रदेशातून तीन जणांना अटक केली. त्यांना ट्रान्झिट रिमांडवर बंगालमध्ये आणले जाईल, असे अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले.

### डिजिटल पेमेन्टमुळे अडकले

**हल्लेखोरांना वापरलेले वाहन हत्येपूर्वी बाली टोल प्लाझा ओलांडून गेले होते. त्यापैकी एकाने टोल देण्यासाठी यूपीआय व्यवहार केला. त्या डिजिटल व्यवहाराच्या मदतीने तपास अधिकाऱ्यांना एक मोबाईल क्रमांक ओळखता आला आणि संशयितांपैकी एकाची ओळख पटवता आली. या धाग्याच्या आधारेच एसआयटीची पथके आरोपींपर्यंत पोहोचली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.**

अटक करण्यात आलेल्यांची ओळख पटली आहे. त्यापैकी विशाल श्रीवास्तव हा बिहारच्या बक्सर जिल्ह्यातील पांडियापट्टी येथील रहिवासी आहे, तर इतर दोघे उत्तरप्रदेशचे आहेत. या दोघांपैकी एक जण शार्पशूटर असावा, असा संशय तपास यंत्रणांना असल्याचे त्यांनी सांगितले. हत्येचा कट रचण्यात आणि हत्या घडवण्यात आठ जण सहभागी असावे. रथ यांच्या हत्येपूर्वी हल्लेखोरांनी सविस्तर टेहाळणी केली असावी. ही हत्या अत्यंत काटेकोर नियोजनासह करण्यात आली. हल्लेखोरांना ओळख आणि हालचाली लपवण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या होत्या. (वृत्तसंस्था)

# बंगाल सचिवालय पुन्हा रायटर्स बिल्डिंगमध्ये

## जुने दिवस परतणार; छोट्या व्यापाऱ्यांच्या आशा पल्लवित



◆ **कोलकाता, ११ मे**

पश्चिम बंगालच्या नवीन सरकारने रायटर्स बिल्डिंगजमधून कामकाज करण्याचा घेतलेला निर्णय, येथील बाग परिसरातील छोट्या व्यापाऱ्यांमध्ये आशेचा किरण घेऊन आला आहे. १३ वर्षांपूर्वी राज्याचे सचिवालय नबन्ना येथे हलवण्यात आल्यामुळे या व्यापाऱ्यांच्या उपजीविकेला मोठा फटका बसला होता.

सुमारे २५० वर्षे जुन्या असलेल्या रायटर्स बिल्डिंग्जच्या परिसरातील चहा स्टॉल्स आणि छोट्या उपाहारगृहांचे मालक, फळविक्रेते आणि इतर व्यापाऱ्यांनी सांगितले की, सरकारी कर्मचारी आणि अभ्यागतांच्या परतण्यामुळे त्यांच्या व्यवसायाला नक्कीच चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. राज्य सरकारचे कामकाज जेव्हा येथून चालत असे, तेव्हा आम्हाला बसण्यासाठीही वेळ मिळत नसे. सरकारी कर्मचारी, सुरक्षा रक्षक, वकील आणि कार्यालयात जाणारे लोक सकाळपासून सायंकाळपर्यंत आमच्या स्टॉलवर येत असत,असे मध्य कोलकातातील बाग परिसरातील चहाच्या स्टॉलचे मालक प्रबीर साहा यांनी सांगितले.

साहा पुढे म्हणाले, सचिवालय हलवल्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच विक्रीत प्रचंड घट झाली आणि परिसरातील अनेक स्टॉल्स पूर्णपणे बंद पडले. रायटर्स बिल्डिंग्जमध्ये येणाऱ्या हजारो सरकारी कर्मचाऱ्यांच्या आणि अभ्यागतांच्या वर्दळीमुळे ही लगबग निर्माण होत असे. (वृत्तसंस्था)

### स्वातंत्र्यापासून २०१३ पर्यंत होते कार्यरत

**स्वातंत्र्यापासून २०१३ पर्यंत रायटर्स बिल्डिंग्ज हेच राज्याचे सचिवालय म्हणून कार्यरत होते. त्यानंतर ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हे कार्यालय हुगळी नदीच्या पलीकडे, हावडा येथील नबन्ना येथे हलवले होते. बागजवळच एक लहान फास्ट-फूड काउंटर चालवणाऱ्या रीना शॉ यांनी सांगितले की, नबन्ना हे प्रशासकीय केंद्र बनल्यानंतर लहान व्यवसायांसमोर अनिश्चिततेचे सावट उभे राहिले होते. जर कार्यालये पुन्हा येथे परतली, तर हा संपूर्ण परिसर पुन्हा एकदा चैतन्यमय होऊन जाईल.**

### अनेकांचे व्यवसाय पडले बंद

**झेरॉक्स आणि स्टेशनरी दुकानदारांनी सांगितले की, कार्यालये हलवण्याच्या निर्णयाचा त्यांच्यावर तात्काळ आणि अत्यंत तीव्र परिणाम झाला. कारण सरकारी कामकाजाशी संबंधित कागदपत्रांची कामे हाच त्यांच्या उत्पन्नाचा मुख्य आधार होता. अर्ज, प्रतिज्ञापत्रे, कार्यालयीन कागदपत्रे, ओळखपत्रे, अशा सर्वच गोष्टींच्या छायाप्रती पूर्वी येथेच काढल्या जात असत. मात्र, २०१३ नंतर ग्राहक जवळजवळ नाहीसे झाले. या भागातील सुमारे सात-आठ झेरॉक्सची दुकाने काही वर्षांतच बंद पडली, कारण त्यांना भाडे आणि विजेची बिले भरता आली नाहीत.**

# तेलुगू अभिनेता भरत कांतचा अपघाती मृत्यू

◆ **हैदराबाद, ११ मे**

तेलुगु अभिनेता भरत कांत यांचा हैदराबादमध्ये एका अपघातात मृत्यू झाला. या अपघातात सिनेमॅटोग्राफर जी. साई त्रिलोक यांचाही जीव गेला. हा अपघात रविवारी रात्री आदिबाटला पोलिस स्टेशन हद्दीतील आउटर रिंग रोडवर झाला. पोलिसांनी सांगितले की, भरत कांत यांची कार मागून एका ट्रकला धडकली. घटनेनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, दोन्ही मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आले आहेत.भरत कांत यांनी २०२१ च्या ग्रामम आणि २०२४ च्या टेनेंट या चित्रपटांमध्ये काम केले होते. त्यांनी गीतांजली आणि पार्वती परमेश्वरुलु या वेब सिरीजमध्येही अभिनय केला होता. (वृत्तसंस्था)



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# कसोटीचा काळ!

भारतीय मानसिकतेविषयी अनेक वाद-प्रवाद आहेत. भारतीय माणूस आळशी असतो. शेजाऱ्याच्या घराला आग लागली तरी ती स्वतःच्या दाराशी येईपर्यंत तो शांत राहतो, असे म्हटले जाते. अलिकडच्या काळात ही समजूत पुसली जाऊ लागली असली, तरी त्या मानसिकतेचे काही अवशेष मात्र अधूनमधून डोके वर काढत असतात. इतिहासकाळापासून भारतीय समाज वेगवेगळ्या समस्यांना, संकटांना तोंड देत आला आहे. परकीय आक्रमणे, दुष्काळ, गरिबी, भ्रष्टाचार, नोकरशाहीचा त्रास, या सर्वांसोबत जगताना 'हे असेच चालायचे' ही वृत्ती तयार झाली. त्यामुळे कोणतीही परिस्थिती तातडीने बदलण्याची अपेक्षा ठेवू नये अशी मानसिकता तयार होत गेली आणि कोणतीही परिस्थिती कायम राहात नसल्याने, ती बदलून पुन्हा परिस्थिती पूर्वपदावर येईल असा विश्वासही रुजत गेला. बहुधा राजकीय व्यवस्थेलाही जनतेच्या या सहनशीलतेची सवय लागली असावी.

पण या समजुतीची दुसरी बाजूही महत्त्वाची आहे आणि अलिकडे ही दुसरी बाजू भक्कमपणे मांडली जाऊ लागली आहे. यामुळे भारतीयांमध्ये आत्मनिर्भरतेचा विश्वास वाढला. आपल्या ताकदीच्या जाणिवाही जाग्या होत गेल्या. भारतीय समाज पूर्णपणे निष्क्रिय असता, तर स्वातंत्र्यलढा घडला नसता; आणिबाणीविरोधी लाट उभी राहिली नसती; भ्रष्टाचारविरोधी आंदोलने, शेतकरी आंदोलन किंवा विविध सामाजिक चळवळी उभ्या राहिल्या नसत्या आणि दहशतवादी कारवाया करणाऱ्यांना त्यांच्या घरात घुसून धडा शिकविण्याची हिंमतदेखील जमा झाली नसती. भारतीय समाज दीर्घकाळ शांत राहतो; पण जेव्हा त्याला प्रश्न अस्तित्वाचा वाटू लागतो, तेव्हा तो मोठा राजकीय बदल घडवू शकतो. कोणतीही समस्या, संकट, स्वतःच्या दारापर्यंत येऊन दाखल होईपर्यंत स्वस्थ राहिले, तर तोपर्यंत कदाचित खूप उशीर झालेला असतो, याची जाणीव आता समाजात रुजू लागली आहे. भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी देशवासीयांना 'आठवड्यातून एक वेळ उपवास करा' किंवा 'एका वेळचे जेवण कमी करा' असे आवाहन १९६५ च्या सुमारास केले होते. त्या काळातील गंभीर अन्नटंचाईशी सामना करण्यासाठी केलेले ते राष्ट्रीय शिस्तीचे आवाहन होते. भारत-पाकिस्तान युद्धामुळे आर्थिक ताण वाढला होता. अमेरिकेकडून 'पीएल-४८०' योजनेअंतर्गत मिळणारा धान्यपुरवठा अनिश्चित झाला आणि देशात अन्नसुरक्षेचा प्रश्न तीव्र झाला. या परिस्थितीत लालबहादूर शास्त्री यांनी देशवासीयांना स्वयंस्फूर्तीने त्याग करण्याचे आवाहन केले. देश अडचणीत असताना प्रत्येक नागरिकाने थोडा त्याग केला पाहिजे, ही त्यामागची भावना होती. या आवाहनाला देशभरातून उल्लेखनीय प्रतिसाद मिळाला. अनेक घरांमध्ये सोमवारचा रात्रीचा स्वयंपाक बंद ठेवला जाऊ लागला. हॉटेल्स, उपाहारगृहे आणि भोजनालयांनीही काही वेळ बंद ठेवण्यास सुरुवात केली. लोकांनी उपवास, अल्पाहार किंवा साधे जेवण स्वीकारले आणि देशभक्ती, सामूहिक जबाबदारी आणि नेतृत्वावरचा विश्वास यांचा प्रभाव समाजमनावर स्पष्ट दिसून आला. या संकटातूनच पुढे भारताने अन्न स्वावलंबनाचा मार्ग अधिक गांभीर्याने स्वीकारला. उच्च दर्जाची बियाणी, सिंचन, रासायनिक खते आणि आधुनिक शेतीपद्धती यांच्या साहाय्याने पुढे हरित क्रांती घडून आली. याच इतिहासाची पुनरावृत्ती आज घडत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेस केलेले काटकसरीचे आवाहन म्हणजे, भविष्यातील संभाव्य संकटाची तीव्रता कमी करण्याची पूर्वतयारी आहे. शास्त्रीजी आणि नरेंद्र मोदी यांच्या आवाहनांची तुलना करताना केवळ शब्दांची नव्हे, तर त्यामागील काळ, संकटाचे स्वरूप, समाजमानस आणि राजकीय शैली यांचीही तुलना करावी लागते. दोघांनीही देशवासीयांना सामूहिक शिस्त आणि त्यागाचे आवाहन केले; मात्र त्या आवाहनांचा संदर्भ, स्वरूप आणि परिणाम वेगळे होते. शास्त्रीजींनी आवाहन केले, तेव्हा अन्नटंचाई, आर्थिक परिस्थिती, अस्थिरता आणि युद्धजन्य परिस्थितीशी संघर्ष सुरू होता. अशा वेळी त्यांनी केलेले आवाहन अन्न या अत्यंत मूलभूत गरजेशी संबंधित होते. त्यामध्ये त्यागाची प्रत्यक्ष आणि ठोस भावना होती. दुसरीकडे, पंतप्रधान मोदी यांची अनेक आवाहने वेगवेगळ्या संकटांच्या किंवा मोहिमांच्या परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित करणारी ठरली. कोविड-१९ महामारीच्या काळातील 'जनता कर्फ्यू', दिवे लावणे किंवा 'व्होकल फॉर लोकल' यांसारख्या आवाहनांचे स्वरूप प्रतीकात्मक आणि जनसंपर्ककेंद्री होते. त्यांचा उद्देश लोकांमध्ये सहभाग, मनोबल आणि सामूहिकतेची भावना निर्माण करणे हा होता. काही आवाहनांना मोठा प्रतिसाद मिळाला; तर काहींवर प्रतीकात्मकतेचा अतिरेक झाल्याची टीकाही झाली.

अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धाच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी जनतेस केलेल्या काटकसरीच्या आवाहनावर आता उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. कालपरवापर्यंत, युद्धस्थितीतही भारतामध्ये असलेल्या सुरक्षिततेच्या जाणिवा जपत शेजारच्या घरात लागलेल्या आगीचे चटके बसत नसल्याच्या भावनेने सुखावणारे अनेकजण आता मात्र अस्वस्थ झाले आहेत. ही आग आपल्या घरांपर्यंत पोहोचू शकते, हे कळण्याएवढा सामाजिक विवेक मुळातच असणे अपेक्षित असताना, त्याचीच जाणीव करून दिली गेल्यावर लगेचच त्याची खिल्ली उडविण्यासाठी अनेक जण सरसावले आहेत. परिस्थिती इतकी गंभीर होती, तर सरकारने आधीच काटकसरीचे किंवा त्यागाचे संदेश का दिले नाहीत, असा या आक्षेपाचा सूर असावा. निवडणुका, प्रचारसभा, मोठे सार्वजनिक कार्यक्रम किंवा परदेश दौरे सुरू असताना हे संकट इतके प्रकर्षाने मांडले गेले नाही, पण आता मात्र जनतेला संयम, त्याग किंवा बचतीचे आवाहन करण्यात आले. त्यामुळे हे 'उशिरा सुचलेले शहाणपण' आहे, अशी टीका होत आहे. विशेषतः इंधनदरवाढ, महागाई, ऊर्जा संकट किंवा युद्धजन्य तणावाच्या पृष्ठभूमीवर सामान्य नागरिकांवर अतिरिक्त भार पडत असताना सरकारने प्रतीकात्मक आवाहनांपेक्षा धोरणात्मक उपायांवर अधिक भर द्यायला हवा होता, असे विरोधकांचे म्हणणे असावे. ते अगदीच नाकारता येणार नाही, पण मुळातच, कोणत्याही संकटकाळाच्या झळा आपल्यापर्यंत पोहोचत नाहीत तोवर स्वस्थ राहणे या जुन्या मानसिकतेची मुळे अजूनही कुठेतरी जिवंत आहेत हेच या अपेक्षांमधून प्रतिध्वनित होत नाही काय? अशा काळात कसे वागावे यासाठी राज्यकर्त्यांवर आवाहने करण्याची वेळ येण्याआधी असा समजूतदारपणा स्वतःहून दाखविणे ही काळाची सामान्य अपेक्षा असते. रशिया-युक्रेन युद्ध किंवा जागतिक ऊर्जा संकटामुळे अनेक देशांत इंधनटंचाई, महागाई, वीजकपात आणि पुरवठा साखळी विस्कळीत होणे असे परिणाम दिसत असताना भारतात तुलनेने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात आली. भारताने स्वस्त दरात रशियन तेल खरेदी, विविध देशांशी संतुलित परराष्ट्र धोरण, अन्नधान्य साठा आणि कल्याणकारी योजनांद्वारे मोठे सामाजिक धक्के काही प्रमाणात रोखले. त्या तुलनेत भारतात दैनंदिन जीवन फार मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले नाही, ही बाबदेखील या निमित्ताने अधोरेखित होते. त्यामुळेच, मोदी यांनी उशिरा का होईना, जनतेस केलेले आवाहन म्हणजे, संकट अधिक गंभीर होण्याआधीची सावधगिरीची सूचना आहे. परिस्थिती अधिक गंभीर होऊ नये म्हणून आधीच मानसिक तयारी करण्याच्या नीतीचाच हा एक भाग मानावयास हवा. जेव्हा जागतिक ऊर्जासंकट अधिकच अनिश्चित होत गेले, तेव्हा लोकसहभागातून ऊर्जा बचत किंवा संयमाचे संदेश देणे हे प्रतिबंधात्मक नीतीचाच भाग होता, असे आता स्पष्टदेखील झाले आहे. कोणतेही आवाहन केवळ प्रशासनिक नसते. त्याला राजकीय संदर्भ असतोच. त्यामुळे सरकारच्या समर्थकांना या आवाहनात दूरदृष्टी दिसेल, तर टीकेसाठी सरसावणाऱ्या विरोधकांस ते उशिरा सुचलेले शहाणपण वाटेल. सत्य बहुधा या दोन टोकांच्या मध्ये असते. केवळ संकट आल्यावरच्या आवाहनांवर नव्हे, तर संकट केव्हा ओळखले, त्याचे त्याचे परिणाम किती कमी ठेवले आणि लोकांमध्ये विश्वास किती टिकवला यावरही कोणत्याही राजकीय नेतृत्वाच्या क्षमतेची कसोटी होत असते.

## आंतरराष्ट्रीय

# कच्च्या तेलाच्या व्यापारावर परिणाम?

**प्रा. जयसिंग यादव**

'ओपेक' ही जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांची संघटना आहे. १९६० मध्ये स्थापन झालेल्या या संघटनेचा मुख्य उद्देश जागतिक तेल उत्पादनावर नियंत्रण ठेवून किमती स्थिर ठेवणे हा आहे. सौदी अरेबिया, इराण, इराक, कुवेत आणि व्हेनेझुएला या देशांनी मिळून तिची स्थापना केली होती. नंतर संयुक्त अरब अमिरातीसह इतर देशही त्यात सहभागी झाले. पुढे २०१६ मध्ये 'ओपेक प्लस'ची स्थापना झाली. त्यात रशियासह इतर काही देशांचाही समावेश करण्यात आला. जगातील जवळपास ३५ टक्के कच्च्या तेलाचे उत्पादन 'ओपेक' देशांकडून होते. त्यामुळे या संघटनेचे निर्णय जागतिक तेलबाजारावर थेट परिणाम करतात. अनेक दशकांपासून 'ओपेक' उत्पादन कोटा ठरवून तेलाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवत आला आहे. उत्पादन कमी करून किमती वाढवणे किंवा उत्पादन वाढवून बाजार स्थिर ठेवणे ही त्यांची पारंपरिक भूमिका राहिली आहे. अशा परिस्थितीत 'यूएई'सारख्या मोठ्या तेल उत्पादक देशाने 'ओपेक'मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेणे ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे. 'ओपेक'मध्ये 'यूएई' हा चौथा सर्वांत मोठा तेल उत्पादक देश मानला जातो. २०२४ मध्ये 'यूएई' दररोज सुमारे २९.२ लाख पिंप तेल उत्पादन करत होता. त्यामुळे त्याच्या बाहेर पडण्यामुळे 'ओपेक'च्या एकात्मतेवर आणि प्रभावापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. 'यूएई'ने आपल्या निवेदनात म्हटले आहे, की हा निर्णय 'राष्ट्रीय हित' लक्षात घेऊन घेण्यात आला आहे. देशाच्या दीर्घकालीन आर्थिक आणि धोरणात्मक उद्दिष्टांनुसार ऊर्जा क्षेत्रात अधिक गुंतवणूक वाढवणे आणि भविष्यातील जागतिक ऊर्जा बाजाराच्या गरजांनुसार स्वतंत्र भूमिका घेणे आवश्यक असल्याचे 'यूएई'चे मत आहे.

प्रत्यक्षात पाहता, या निर्णयामागे दोन मोठी कारणे दिसून येतात. पहिले कारण म्हणजे जागतिक तेलबाजारातील अस्थिरता आणि पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती. अमेरिका आणि इस्रायलच्या इराणविरोधातील कारवायांमुळे होर्मुज सामुद्रधुनीवरील तणाव वाढला आहे. जगातील सुमारे २५ टक्के समुद्री तेल व्यापार आणि २० टक्के एलएनजी पुरवठा या मार्गातून होतो. त्यामुळे या मार्गावरील संकटाचा थेट परिणाम जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर होत आहे. दुसरे आणि अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे सौदी अरेबिया आणि 'यूएई'मधील वाढते मतभेद. सौदी अरेबियाला 'ओपेक'चा अनौपचारिक नेता मानले जाते. उत्पादन कोटा, तेल धोरण आणि बाजार नियंत्रण याबाबत यूएई आणि सौदी अरेबियामध्ये काही वर्षांपासून मतभेद असल्याचे बोलले जात होते. 'यूएई'ने गेल्या काही वर्षांमध्ये स्वतःची उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी मोठी गुंतवणूक केली; पण 'ओपेक'च्या कोटा व्यवस्थेमुळे त्याला अपेक्षित उत्पादन करता येत नव्हते. त्यामुळे 'यूएई'ची स्वतंत्रपणे उत्पादन वाढवण्याची इच्छा होती. यामुळे आता 'यूएई' 'ओपेक'च्या उत्पादन मर्यादांपासून मुक्त होणार आहे. म्हणजेच तो बाजारातील परिस्थितीनुसार स्वतःचे तेल उत्पादन वाढवू किंवा कमी करू शकतो. विशेषतः आशियातील वाढत्या मागणीचा फायदा घेण्याचा 'यूएई'चा प्रयत्न असल्याचे दिसते. चीन, भारत, जपान आणि दक्षिण कोरिया हे देश ऊर्जा वापराच्या दृष्टीने वेगाने वाढत आहेत आणि 'यूएई'ला या बाजारपेठांमध्ये अधिक मजबूत उपस्थिती हवी आहे.

भारतासाठी या घडामोडी विशेष महत्त्वाच्या आहेत. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो. त्यातील मोठा भाग मध्यपूर्वेतून येतो. 'यूएई' हा भारताचा प्रमुख ऊर्जा भागीदार असून भारताच्या एकूण तेल आयातीत त्याचा मोठा वाटा आहे. 'यूएई'ने उत्पादन वाढवले, तर भविष्यात भारताला अधिक स्थिर आणि कदाचित स्वस्त दरात तेल मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेला काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो. वाढत्या जागतिक तणावाच्या पृष्ठभूमीवर ऊर्जेसाठी भारताकडे विविध पुरवठा स्रोत उपलब्ध असणे अत्यंत महत्त्वाचे आहे; मात्र चित्र इतके सोपे नाही. कारण सध्या होर्मुज सामुद्रधुनीवरील तणाव कायम आहे. हा मार्ग पूर्ण क्षमतेने खुला होत नाही, तोपर्यंत उत्पादन वाढवले, तरी प्रत्यक्ष पुरवठा सुरळीत होईल असे नाही. 'यूएई'कडे फुजैराहसारखी पर्यायी बंदरे असली, तरी त्यांची क्षमता मर्यादित आहे. याशिवाय, या निर्णयामुळे 'ओपेक'च्या भविष्यासंदर्भातही प्रश्न निर्माण झाले आहेत. मोठे उत्पादक देश स्वतःच्या राष्ट्रीय हितासाठी संघटनेबाहेर जाण्याचा मार्ग निवडू लागल्यास 'ओपेक'ची एकत्रित ताकद कमी होऊ शकते. भविष्यात इतर देशही अशाच प्रकारचा विचार करू शकतात. ऊर्जा राजकारणाच्या दृष्टीने पाहता ही घटना जागतिक शक्ती समीकरणातील बदल दर्शवते. एकेकाळी तेलबाजारावर मोजक्या देशांचे नियंत्रण होते. आज मात्र प्रत्येक देश आपले स्वतंत्र आर्थिक हित, गुंतवणूक आणि भू-राजकीय भूमिका लक्षात घेऊन निर्णय घेत आहे.

भारतासाठी ही परिस्थिती संधी आणि आव्हान दोन्ही घेऊन येते. एका बाजूला अधिक पुरवठा आणि संभाव्य स्थिर किमतींची शक्यता आहे, तर दुसऱ्या बाजूला मध्यपूर्वेतील अस्थिरता, वाढते युद्धजन्य वातावरण आणि समुद्री मार्गांवरील धोके कायम आहेत. या सर्व घटनांमधून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे ऊर्जा हा केवळ आर्थिक विषय राहिलेला नाही. तो आता जागतिक राजकारण, युद्ध, कूटनीती आणि राष्ट्रीय सुरक्षेचा केंद्रबदू बनला आहे. 'यूएई'चा 'ओपेक'मधून बाहेर पडण्याचा निर्णय हे त्याचेच एक मोठे उदाहरण आहे. गेली सहा दशके तेलाच्या जागतिक किमतींवर नियंत्रण ठेवणाऱ्या एका बलाढ्य कार्टेलच्या वर्चस्वाला बसलेला हा सर्वांत मोठा तडाखा आहे. संयुक्त अरब अमिरातीचा हा निर्णय अचानक घेतलेला वाटत असला तरी त्याची पाळेमुळे गेल्या काही वर्षांमधील सौदी अरेबिया आणि 'यूएई' यांच्यातील वाढत्या मतभेदांमध्ये दडली आहेत. संयुक्त अरब अमिरातीने आपल्या तेल उत्पादन क्षमतेत प्रचंड गुंतवणूक केली आहे. सध्या त्यांची क्षमता दिवसाला सुमारे ४८.५ लाख पप इतकी आहे; परंतु 'ओपेक'च्या नियमांमुळे त्यांना केवळ ३५-३६ लाख पपच उत्पादन करण्याची परवानगी होती. त्यामुळे आपल्या नैसर्गिक संसाधनांचा पूर्ण वापर करून महसूल वाढवण्याच्या अमिरातीच्या महत्त्वाकांक्षेला 'ओपेक'चे निर्बंध अडथळा ठरत होते.

संयुक्त अरब अमिरातीला २०२७ पर्यंत आपली उत्पादन क्षमता ५० लाख पपापर्यंत न्यायची आहे. तेल संपण्यापूर्वी त्याचा जास्तीत जास्त फायदा उठवणे हे संयुक्त अरब अमिरातीचे धोरण सौदी अरेबियाच्या 'किमती स्थिर ठेवण्यासाठी उत्पादन कमी करणे' या धोरणाशी विसंगत ठरले. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये केवळ तेलावरूनच नव्हे, तर येमेनमधील सुरक्षा धोरण आणि मध्यपूर्वेतील नेतृत्वावरूनही स्पर्धा सुरू झाली आहे. संयुक्त अरब अमिरातीचा 'ओपेक' त्याग हा केवळ आर्थिक नसून एक रणनीतिक बदल आहे. गेली अनेक वर्षे 'ओपेक' म्हणजे सौदी अरेबियाची हुकूमत असे समीकरण होते. संयुक्त अमिरातीच्या बाहेर पडण्यामुळे सौदी अरेबियाचे या संघटनेतील वजन कमी झाले आहे. एका अर्थाने संयुक्त अरब अमिरातीने आपली 'धोरणात्मक स्वायत्तता' जाहीर केली आहे. 'गल्फ को-ऑपरेशन कौन्सिल' (जीसीसी) मध्ये संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबिया हे दोन मुख्य स्तंभ आहेत. या निर्णयामुळे या देशांमधील एकीला तडा गेला असून, इराणसारख्या शत्रू देशासमोर आखाती देशांची आघाडी कमकुवत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशा विविधांगी अडचणींमुळे या निर्णयाची आणि त्याच्या संभाव्य परिणामांची जगभर चर्चा आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# समाजाची उदासीनता भ्रष्टाचाराला पोषक

भ्रष्टाचार ही देशाला लागलेली कीड असून जनतेच्या सहभागाविना भ्रष्टाचाराचा हा राक्षस समाजामधून हद्दपार होऊ शकत नाही, हे वास्तव आहे. आजमितीस भ्रष्टाचार हा शिष्टाचार समजला जात असला, तरी भविष्यामध्ये देश आणि समाजावर त्याच्या होणाऱ्या घातक परिणामाची चिंता व चिंतन करताना कोणीच दिसून येत नाही. याबाबत समाजामध्ये असलेली कमालीची उदासीनता असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांचे सहज फावते आणि ही मालिका अविरत सुरू राहते. भ्रष्टाचारामुळे देश पोखरला गेला आहे. तो सहन न करण्याचे व त्या विरोधात कठोर कारवाई करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारचे धोरण आहे. सुरुवातीपासूनच हा विषय नरेंद्र मोदी त्यास प्राथमिकता देऊन प्राधान्याने हाताळीत आहे. देशाला व सामान्य जनतेला लुटणाऱ्या भ्रष्ट लोकांना कदापिही सोडले जाणार नाही, या धोरणास त्यांनी प्राथमिकता देऊन हा लढा अधिक तीव्र केला आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध लढताना मोदींच्या मनातील तळमळ अनेकदा देशवासीयांनी अनुभवली आहे. अनेकदा याबाबत त्यांनी देशवासीयांसमोर आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. त्यामुळे या लढाईमध्ये देशामधील सामान्य जनतेचे सहकार्यही त्यांना अपेक्षित आहे. सामान्य जनतेच्या सहकार्याविना हा लढा जिंकणे अशक्य असल्याने त्यांच्या या लढ्यामध्ये प्रत्येकाने आपला सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराची सुरुवात समाजाच्या मूकसंमतीनेच होत असते, हे उघड आहे. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांचे चांगलेच फावते. यापुढे आपल्या आयुष्यामध्ये भ्रष्टाचाराला थाराच देणार नाही, असा ठाम निर्धार करून अशी शपथ जर प्रत्येकाने घेतली तर सरकारच्या लढ्याला अधिक बळ मिळून देशाची वाटचाल एक भ्रष्टाचारमुक्त देश म्हणून सहज होऊ शकते. जनतेच्या सहकार्यानेच या लढ्याला यश मिळू शकते. भ्रष्टाचाराच्या विरोधात लढताना पंतप्रधानांनी कोणाचीही तमा न बाळगता व विरोधकांच्या हल्ल्याची पर्वा न करता हा लढा निर्धारपूर्वक सुरू ठेवला आहे. भ्रष्टाचारमुक्त भारत हे त्यांचे स्वप्न आहे. नरेंद्र मोदी यांच्या पावलावर पाऊल ठेवून राज्य शासनानेही भ्रष्टाचार विरोधातील लढ्यास गती देणे आवश्यक आहे. हा लढा लढण्यास सहज आणि सोपा नाही, याची जाणीव सर्वांनाच आहे. या लढ्यामध्ये स्वकीयांशीच दोन हात करावे लागणार आहे. त्यासाठी तारेवरची कसरत करून पुढे जावे लागणार आहे. ही वाट अतिशय बिकट आहे. याची जाणीव असूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी कोणाचीही तमा न बाळगता गोरगरिबांच्या हितासाठी अधिक तीव्रतेने हा लढा पुढे रेटत आहेत. कोणतेही शासकीय काम सहजासहजी होत नाही, हा आजवरचा नागरिकांचा अनुभव आहे. ग्रामीण भागातील तळहातावर पोट घेऊन जगणाऱ्या व रोजमजुरीवर काम करून जगणाऱ्या गरिबांना शासकीय कार्यालयाचे उंबरठे रोज झिजविणे परवडणारे नसते. एखाद्या लहानशा कामासाठी रोजमजुरी पाडून दिवसभर कार्यालयामध्ये ताटकळत बसणे हे त्यांच्या कुटुंबासाठी उपासमारीचे कारण ठरू शकते. गोरगरिबांची नेमकी हीच असहायता हेरली जाते आणि नकळत असे गोरगरीब भ्रष्टाचाराच्या आहारी जातात. त्यांच्यापुढे पर्यायच उपलब्ध नसतो. त्यामुळे आज भ्रष्टाचारास शिष्टाचाराचे स्वरूप प्राप्त झाल्याचे बघावयास मिळत आहे. पंतप्रधान मोदी यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध आपली दिशा स्पष्टपणे ठरविली आहे. त्यांच्या जवळपास ११ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये एकही घोटाळा न घडणे, हे त्यांच्या यशाचे आणि ठाम निर्धाराचे श्रेय आहे. या देशाने यापूर्वी अनेक घोटाळ्यांची मालिका अनुभवली आहे. त्यामुळे आपल्या देशामध्ये काळ्या पैशाची एक समांतर मालिका उभी राहिली होती. मोदींच्या या ठाम निर्धाराने देशामधील अनेक बडे राजकारणी मोदींच्या या अस्त्राने घायाळ झाले असून आपली वर्षानुवर्षे चालणारी दुकानदारी बंद पडल्यामुळे ते सध्या चवताळले आहेत. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर वाट्टेल ते आरोप करून त्यांना बदनाम करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येत आहे. विरोधकांची ही दुटप्पी चाल जनताही ओळखून आहे. त्यामुळे मोदी विरोधकांचे धाबे दणाणले आहेत, एवढे मात्र नक्की.




९८८१७१७८५६

## विशेष

# पांढऱ्या कोटाआड लपलेले अश्रू

**प्रवीण राऊत**

**आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन दरवर्षी १२ मे रोजी जगभरात साजरा केला जातो. आधुनिक परिचर्या (नर्सिंग) क्षेत्राच्या संस्थापिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा हा जन्मदिवस आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळला जातो.**



राज्याच्या आर्थिक, सामाजिक प्रगतीत ज्या क्षेत्राचा अमूल्य वाटा आहे तो म्हणजे परिचारिका, मात्र या क्षेत्रावर पद्धतशीरपणे पांघरूण घातले गेल्याचे वास्तव आहे जे नाकारता येणारे नाही. रुग्णालयाच्या पांढऱ्या शुभ्र भिंती, औषधांचा दर्प आणि मशीनचा तो एकसुरी आवाज... या सगळ्या नीरस आणि अनेकदा भीतिदायक वाटणाऱ्या वातावरणात जर कोणता एक दिलासादायक घटक असेल, तर तो म्हणजे रुग्णाच्या उशाशी रात्रंदिवस उभी असणारी परिचारिका (नर्स). वेदनेने विव्हळणाऱ्या रुग्णाला मायेचा स्पर्श देणारी, मध्यरात्रीच्या भयाण शांततेत आशेचा किरण बनून वावरणारी ही परिचारिका खऱ्या अर्थाने आरोग्य सेवेचा कणा असते. दुर्दैवाने आज महाराष्ट्रात या कण्यालाच वाळवी लागली आहे. राज्याच्या आरोग्य व्यवस्थेला तारणाऱ्या हजारो परिचारिकांची अवस्था आज अत्यंत दयनीय, विदारक आणि मन सुन्न करणारी झाली आहे. महाराष्ट्रातील नर्सिंग क्षेत्राच्या या सद्य:स्थितीचे, त्यांच्या मूक वेदनांचे आणि कोलमडत चाललेल्या व्यवस्थेकडे सर्वांगीण आणि संवेदनशीलतेने पाहण्याची नितांत आवश्यकता आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने एका आदर्श आणि मजबूत आरोग्य व्यवस्थेसाठी काही सुस्पष्ट निकष आखून दिले आहेत. सामान्य रुग्ण कक्षात, अति दक्षता विभागात आणि आपत्कालीन कक्षात किती रुग्णांच्या मागे किती परिचारिका असाव्यात याचे निकष निश्चित केले आहे. प्रगत महाराष्ट्रात नर्सिंग क्षेत्राची अशी अवकळा आणि अधोगती ही राज्याच्या पुरोगामी प्रतिमेला लागलेला एक मोठा कलंक म्हणून उदय होण्यास सुरुवात झाली आहे. याचे खरे वास्तव समजून घ्यायचे असल्यास शासकीय रुग्णालये अत्यंत उत्तम ठिकाण आहे. शासकीय वैद्यकीय रुग्णालये असोत वा सार्वजनिक आरोग्य रुग्णालये, सर्वत्र परिचारिकांची प्रचंड वानवा आहे. एकाच परिचारिकेवर अनेक रुग्णांची, कधी कधी संपूर्ण रुग्ण कक्षाची जबाबदारी निर्दयीपणे सोपवली जाते. कामाचा हा अमानवीय ताण त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची अक्षरशः चाळण करतो. याचा थेट परिणाम रुग्णसेवेच्या दर्जावर होतोच. पण देणे घेणे कुणाला आहे? राज्याच्या दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून ते गजबजलेल्या जिल्हा रुग्णालय आणि वैद्यकीय रुग्णालयपर्यंत सर्वत्र हीच भयावह परिस्थिती आहे. वैद्यकीय विभागाच्या रुग्णालयातील अवस्था आणि ग्रामीण महाराष्ट्रातील रुग्णालयाची अवस्था समान वाटेवर आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी अशी अवस्था आहे की एकाच परिचारिकेला संपूर्ण केंद्राचा डोलारा सांभाळावा लागतो तर शहरांत असलेल्या रुग्णालयात रुग्णांत परिचारिकेला शोधावे लागत आहे. हे केवळ त्या परिचारिकेवरच नव्हे, तर तिथे उपचारासाठी येणाऱ्या गरीब रुग्णांवरही केलेला शासकीय, प्रशासकीय दुर्लक्षातून झालेला घोर अन्याय आहे. महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांमधील नर्सिंग विभागात रिक्त पदांचा प्रश्न आता केवळ एक समस्या राहिलेला नाही, तर ते एक महामारीचे रूप धारण करत आहे. रुग्णालयात परिचारिकांच्या प्रशासकीय आणि व्यवस्थापकीय नेतृत्वाची धुरा ज्यांच्या खांद्यावर असते, ती अधिसेविका आणि त्यांच्या सोबतीला सहायक अधिसेविका, परिसेविका. ही अत्यंत महत्त्वाची पदे जवळपास दहा-दहा वर्षांपासून रिक्त आहेत. ज्या पदावर बसणाऱ्या व्यक्तीच्या हाती रुग्णालयातील नर्सिंग व्यवस्थापनाची, शिस्तीची आणि नियोजनाची सूत्रे असतात, त्याच पदावर जर कायमस्वरूपी नेमणूक नसेल, पदोन्नत्या मिळणार नसतील तर त्या रुग्णालयाचा गाडा कसा चालणार? हा प्रश्न शासनकर्त्यांच्या आणि त्यांच्या आधिपत्याखाली असलेल्या अधिकारी वर्गाच्या सद्सदविवेकबुद्धीला का टोचत नाही?

केवळ रुग्णालयांमध्येच नव्हे, तर जिथे भविष्यातील परिचारिका घडवल्या जातात, त्या नर्सिंग विद्यालयांमध्येही भयाण परिस्थिती आहे. विद्यालय-महाविद्यालये नावाच्या मोठमोठ्या इमारती निर्माण केल्या. त्यात शिक्षणाला विद्यार्थी आणले गेले. पण त्यांना शिकविण्यासाठी आवश्यक पदांचे काय? तात्पुरती मलमपट्टी किती काळ? जेव्हा इमारत बांधण्याचे निर्णय होतात तेव्हाच पदाची मान्यता आणि भरती, पदोन्नती का नाही? सामान्य गोरगरीब वर्गातील मुलं शिकतात म्हणून का? की कोणत्याही मोठ्या पदावरील अधिकाऱ्यांची मुलं-मुली शिकत नाही म्हणून उदासीनता का? मागील ८ वर्षांपासून शासकीय परिचारिका विद्यालयात पाठ्यनिर्देशिका यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. या पदाचे सेवाप्रवेश नियम १९६४ पासून आहे. मग यात बदल करायला कुणाच्या हाताला लकवा मारला होता? अजूनही त्याला गती का दिली गेली नाही?

एखाद्या व्यक्तीने आपले संपूर्ण आयुष्य एकाच पदावर, कोणत्याही बढतीशिवाय व्यतीत करावे, यासारखी मोठी शिक्षा कोणती असू शकते? मात्र ती परिचारिकांवर आलेली असून त्या सहन करत आहे. नर्सिंग क्षेत्रातील सर्वांत मोठी आणि हृदयद्रावक समस्या म्हणजे सेवाप्रवेश नियमांचा अभाव. साध्या सेवाप्रवेश नियमांसाठी गेल्या वीस-वीस वर्षांपासून परिचारिका डोळ्यांत प्राण आणून प्रतीक्षा करत पदोन्नतीची वाट पाहत आहे. या विभागाच्या सचिवांचे आयुक्तांचे आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अगदी नियोजित वेळी पदोन्नत्या होतात. मग त्यांच्या आधिपत्याखाली कार्यरत परिचारिका, परिसेविका, अधिसेविका, पाठ्यनिर्देशिका, या पदाचे कोण बघणार? प्रशासकीय अनास्थेमुळे जर नियमावली तयार व्हायला दशक लोटत असतील तर का म्हणून परिचारिका वर्गकडून चांगल्या रुग्णसेवेच्या अपेक्षा करता? महाराष्ट्रातील नर्सिंग क्षेत्राला या भीषण संकटातून बाहेर काढायचे असेल, तर मलमपट्टीचे उपाय चालणार नाहीत. त्यासाठी काही तातडीच्या आणि दीर्घकालीन शस्त्रक्रियात्मक उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. सेवाप्रवेश नियमांची तातडीची अंमलबजावणी, रिक्त पदांची युद्धपातळीवर भरती, नर्सिंग शिक्षणावर कठोर नियंत्रण, कामाच्या सुविधा आणि वेतन, उच्च शिक्षण आणि संशोधनाला चालना या उपाययोजना आवश्यक आहेत. परिचारिका म्हणजे केवळ डॉक्टरच्या मागे उभ्या राहणाऱ्या किंवा रुग्णाच्या बेडशेजारी उभ्या असणाऱ्या एक व्यक्ती नाहीत. त्या संपूर्ण आरोग्य व्यवस्थेचा श्वास आणि आत्मा आहेत. या आत्म्याशिवाय डॉक्टरांची कितीही मोठी कौशल्ये, कोट्यवधी रुपयांची अत्याधुनिक आणि सोफिस्टिकेटेड उपकरणे, भव्य इमारती आणि शासनाच्या कागदावरील आरोग्य योजना या सर्वांचा कवडीमोलाचाही उपयोग नाही. नर्सिंग क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाशिवाय निरोगी महाराष्ट्राचे स्वप्न हे केवळ एक मृगजळच राहील. त्यामुळे आता मलमपट्टीचे उपाय आणि स्वार्थाचे राजकारण बाजूला ठेवून, परिचारिकांच्या हिताला आणि त्यांच्या मागण्यांना सर्वोच्च प्राधान्य देणे हीच काळाची सर्वांत मोठी गरज आहे.

९४०३६४०९३३

### मनपाचे ग्रीन शेड नेट

नागपूर महानगरपालिकेने एप्रिल २०२६ च्या कडक उन्हापासून वाहनचालकांना दिलासा देण्यासाठी नागपूर शहरातील प्रमुख वाहतूक सिग्नलवर ग्रीन शेड नेट लावण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. काही ठिकाणी पाण्याचे तुषार देखील लावल्याचे वृत्त आहे. त्यासाठी धन्यवाद. सिग्नलवर थांबणाऱ्या वाहनचालकांना सूर्यप्रकाशापासून सावली मिळते आहे. परंतु हा प्रकल्प एप्रिल महिन्यात पूर्णत्वास जायला हवा होता. काही चौकांमध्ये ग्रीन शेड नेट लावण्याचे काम अजून सुरू आहे. अर्धा उन्हाळा होऊन गेल्यावर हे काम सुरू केले आहे. उशिरा का होईना पण या ग्रीन शेडमुळे वाहनचालकांना थंडावा मिळतो आहे. फक्त उन्हाळा संपायच्या आत सगळीकडचे काम पूर्ण व्हावे ही अपेक्षा आहे. सध्याच्या वातावरणाची अनिश्चितता बघता गेल्यावर्षी नेट पडल्याच्या तक्रारींमुळे यावर्षी ते अधिक मजबूतपणे बसवावे जेणेकरून पुढील काही दिवस सामान्यजनांसाठी दिलासादायक असतील.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## वाचक पत्रे

### मुक्ताबाई : अध्यात्म, करुणा, आत्मज्ञानाची तेजस्वी ज्योत



महाराष्ट्राच्या संतपरंपरेत अनेक संतांनी आपल्या विचारांनी समाजाला नवी दिशा दिली. या संतपरंपरेत संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ यांच्याप्रमाणेच एक तेजस्वी आणि विलक्षण व्यक्तिमत्त्व म्हणजे संत मुक्ताबाई होय. अल्पायुष्यातही त्यांनी अध्यात्म, समता, करुणा आणि आत्मज्ञानाचा जो संदेश दिला, तो आजही समाजासाठी दीपस्तंभ ठरतो. मुक्ताबाई या केवळ संत ज्ञानेश्वरांच्या धाकट्या भगिनी नव्हत्या, तर त्या एक उच्च कोटीच्या ज्ञानी योगिनी, कवयित्री आणि संत होत्या. त्यांच्या अभंगांमधून प्रकटणारे तत्त्वज्ञान हे अतिशय साधे, सरळ आणि जीवनाला दिशा देणारे आहे.

मुक्ताबाईंचा जन्म इ. स. १२७९ च्या सुमारास झाला असे मानले जाते. त्यांचे वडील विठ्ठलपंत आणि आई रुक्मिणीबाई हे अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते. विठ्ठलपंतांनी संन्यास घेतला होता; परंतु नंतर संसारात परत आल्यामुळे समाजाने त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला बहिष्कृत केले. या बहिष्काराचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर झाला. समाजाकडून अपमान, उपेक्षा आणि दुःख सहन करताना मुक्ताबाई, निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर आणि सोपानदेव या भावंडांनी आपल्या आध्यात्मिक शक्तीने जीवनाला अर्थ दिला.

मुक्ताबाईंच्या आयुष्यातील संघर्ष अत्यंत वेदनादायी होता. लहान वयातच आई-वडिलांचे निधन झाले. समाजाने दरवाजे बंद केले; परंतु या दुःखाने त्या खचल्या नाहीत. उलट त्यांनी आत्मज्ञानाच्या मार्गाने स्वतःला घडवले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात करुणा, सहनशीलता आणि अद्वैत तत्त्वज्ञानाची गूढ अनुभूती दिसून येते. त्यांचे संपूर्ण जीवन हे ''संतत्व म्हणजे केवळ पूजा नव्हे, तर अंतःकरणातील निर्मळता'' याचे जिवंत उदाहरण होते. त्यांचे अध्यात्म अत्यंत व्यापक होते. त्यांनी देवाला मंदिरापुरते मर्यादित मानले नाही. त्यांच्या दृष्टीने परमेश्वर हा प्रत्येक जीवामध्ये वसलेला होता. म्हणूनच त्यांनी जातिभेद, अहंकार आणि दंभ यांना तीव्र विरोध केला. त्यांचे विचार समाजाला समतेचा आणि मानवतेचा संदेश देणारे होते. त्यांच्या अभंगांतून जीवनाचे खोल तत्त्वज्ञान अत्यंत साध्या भाषेत व्यक्त झालेले दिसते. मुक्ताबाई या महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आकाशातील एक तेजस्वी चांदणी होत्या. त्यांनी आपल्या ज्ञानाने, प्रेमाने आणि करुणेने समाजाला प्रकाश दिला. त्यांच्या विचारांचा संदेश मानवतेला सदैव प्रेरणा देत राहील. त्यांच्या जीवनातून आपण समता, सहनशीलता, आत्मज्ञान आणि प्रेम यांचे अमूल्य धडे घेतले पाहिजेत.

**कुमार व्यंकटेश नेरकर**/अमरावती, ७६२०६८७३०३

### युद्धामुळे इंधनटंचाईचे संकट

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील जागतिक युद्धाचे ढग आता गडद होत आहेत. देशात इंधनटंचाई तोंड वर काढीत आहे. बचत, काटकसर हे शब्द व्यवहारातून बाजूला झाले आहेत. ते आता पुन्हा उपयोगी ठरणार आहेत. इंधन बचत जनतेने पुन्हा सुरू करावी असे शासनाने सूचित केले आहे. जनतेने आता बचत करण्याची सवय अंगीकारली पाहिजे. सार्वजनिक वाहन व्यवस्थेचा वापर करावा. आस्थापनांनी कोरोना काळात सुरू केलेले वर्क फ्रॉम होम चालू ठेवून आता आठवड्याचे सर्व दिवस घरूनच काम करण्यास सुरू करावे. जनतेने वाहतूक, पर्यटन कमी करावे. असे झाले तरच इंधनटंचाईवर मात करता येईल. सोने, चांदीची खरेदी कमी करावी. यातून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन वाचेल इत्यादी अनेक पर्याय आहेत, असे विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले आहेत. पक्षभेद विसरून सर्वांनी देशातील या संकटप्रसंगी एकत्र येणे गरजेचे आहे.

**ॲड. बळवंत रानडे**/पुणे

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...




### तेजस डिकसळकर यांना महाराष्ट्र आयकॉन अवॉर्ड्स

**सांगोला, दि. ११ मे -**

बामणी (ता.सांगोला) येथील तेजस जितेंद्र डिकसळकर यांना कृषी क्षेत्रातील त्यांचे योगदान आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेली कामगिरी यानिमित्त नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र आयकॉन अवॉर्ड्स २०२६ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पद्मश्री पुरस्कार प्राप्त चैत्राम पवार यांच्या हस्ते तर मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे, फलोत्पादन संचालक डॉ.कैलास मोते यांच्या उपस्थितीत सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्याचे आयोजन एजीसी इव्हेंटच्या संचालक रोहिणी पाटील यांनी केले होते. सर्वांचे स्वागत ॲग्रोकेअर ग्रुपचे चेअरमन भूषण निकम यांनी केले.

### भीमा नदीकाठावरील वीजपुरवठा पूर्ववत सुरू करण्याचे आदेश

**सोलापूर, दि. ११ मे -**

सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर शहरातील जनतेला पिण्यासाठी व जनावरांना पिण्यासाठी, शेतीसाठी उजनी धरणातून पाणी सोडण्यात आले होते.परंतु त्या दरम्यान जिल्ह्यातील मंगळवेढा,पंढरपूर,म



ोहोळ, उत्तर सोलापूर व द .सोलापूर तालुक्यातील नदीकाठच्या शेतकर्यांचा विजपुरवठा खंडीत करण्यात आला होता व नंतर हा विज पुरवठा ३ तासावर करण्यात आला. परंतु ह्या म ुळे नदीला पाणी असुनही नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पीक धोक्यात आले होते. याची तात्काळ दखल सोलापूरच्या कर्तव्यदक्ष खा.प्रणितीताई शिंदे यांनी घेऊन मा.जिल्हाधिकारी श्री एस.कार्तिकेयन साहेबांकडे विजपुरवठा पुर्ववत करण्याची मागणी केली. त्याबद्दल सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे आज रोजी जिल्हाधिकारी कार्यालया कडुन विजपुरवठा पुर्ववत करण्या संदर्भात विज महावितरण कंपनीला आदेश देण्यात आले व वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला.

### संगेपाग यांची सोलापूर शहराध्यक्षपदी निवड

**सोलापूर, दि. ११ मे -**

वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी सोलापूर ते दिल्ली असा सायकल प्रवास करून तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची भेट घेणारे धडाडीचे युवा नेते निलेश संगेपाग यांची पक्षाच्या सोलापूर



शहर अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे शहरातील युवा कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. गेल्या काही वर्षांपासून निलेश संगेपाग हे पक्षाची ध्येय-धोरणे आणि विचार तळागाळातील जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. विविध पदांवर काम करताना त्यांनी पक्षवाढीसाठी रात्रंदिवस कष्ट घेतले आहेत. त्यांच्या या प्रामाणिक कार्याची आणि निष्ठेची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर आता सोलापूर शहराध्यक्षपदाची अत्यंत महत्त्वाची धुरा सोपवली आहे. अवघ्या २३ व्या वर्षी त्यांच्यावर टाकण्यात आलेला हा विश्वास त्यांच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासातील एक मोठा टप्पा मानला जात आहे.

### 'त्या'वक्तव्यावरुन काँग्रेस, शिवसेना 'उबाठा'च्या महिला आघाडीकडून संताप

**सोलापूर, दि. ११ मे-**

खासदार प्रणिती शिंदे यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यावरुन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याविरोधात काँग्रेस व शिवसेना 'उबाठा'च्या महिला आघाडीने पत्रपरिषद घेवून तीव्र संताप व्यक्त केला. पालकमंत्र्यांनी १० दिवसांच्या आत जाहीर माफी मागावी. अन्यथा रस्त्यावर उतरुन आंदोलन करु, असा इशाराही देण्यात आला. खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूरच्या प्रश्नांकडे लक्ष देत नाहीत. काँग्रेसचे नेते खा.राहुल गांधी यांच्या घरासमोरील रस्त्याचाच त्या विचार करतात, असे वक्तव्य त्यांनी केले होते. महिला लोकप्रतिनिधीविषयी अशा प्रकारची भाषा वापरणे अत्यंत दुर्दैवी असून महिलांच्या सन्मानाला धक्का देणारे आहे. पालकमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळताना अशा प्रकारची भूमि का घेणे अयोग्य असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. या पत्रपरिषदेस प्रमिला तुपलवंडे, शिवसेना 'उबाठा'च्या रेखा आडकी, भारती इप्पलपल्ली, मंगल थोरात, हेमा चिंचोळकर, शुभांगी लिंगराज, स्वाती रुपनर आदी उपस्थित होत्या.

# संत शिरोमणी श्री सावता महाराज मंदिराचे डिझाईन आठ दिवसात अंतिम करावे : पालकमंत्री

**श्री सावता महाराज मंदिरासाठी आवश्यक असलेली जमीन खरेदी प्रक्रिया तत्काळ सुरू करावी**

**जगद्गुरु श्री महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकासाठी १५ एकर जागेची उपलब्धता**

**चोखामेळा स्मारकासाठी मंगळवेढा शहरातील जमिनीची पाहणी जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी व स्थानिक आमदार यांनी करून घ्यावी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मे-**

अरण येथील संत शिरोमणी श्री सावता महाराज यांच्या स्मारकासाठी राज्य शासनाने १५० कोटीचा निधी मंजूर केला असून त्यातील ८९ कोटीच्या निधीला प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने टेंडर प्रक्रिया सुरू करावी. तसेच मंदिराचे डिझाईन पुढील आठ दिवसात अंतिम करावे, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित संत शिरोमणी श्री सावता म हाराज स्मारक तसेच जगद्गुरु महात्मा बसवेश्वर स्मारक आढावा बैठकीत पालकमंत्री श्री. गोरे बोलत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कार्तिकियेन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, माढा प्रांत अधिकारी जयश्री आव्हाड, मंगळवेढा प्रांत अधिकारी अमित माळी यांच्या सह अन्य अधिकारी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री श्री गोरे म्हणाले की, संत शिरोमणी श्री सावता महाराज मंदिरासाठी आवश्यक असलेल्या जागा खरेदीला शासनाकडून दहा कोटींचा निधी प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने जागा खरेदीची कार्यवाही तात्काळ सुरू करावी. त्यानंतर अनुषंगिक कामाचे टेंडर प्रक्रिया करावी. येथे मंदिर हा मुख्य विषय असून याविषयी कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही, त्यामुळे मंदिराचे डिझाईनही खूप सुंदर, आकर्षक तसेच मोठ्या जागेचे असावे, असे त्यांनी निर्देशित केले. मंगळवेढा येथे नियोजित जगद्गुरु महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकासाठी प्रशासनाची १५ एकर जागा उपलब्ध करून देण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या १५ एकर जागेवर भव्य स्मारक तसेच तलाव सुशोभीकरणसाठी आवश्यक निधीची मागणी करावी. त्याप्रमाणेच मंगळवेढा शहरात चोखामेळा समर्थासाठी किमान दोन एकर पेक्षा अधिक जागा उपलब्ध होत असेल तर त्या जागेची पाहणी जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी व आमदार यांनी करावी, अशा सूचनाही पालकमंत्री गोरे यांनी दिल्या.

## दमाणी नगरातील एक ४९ वर्षीय इसम आढळला मृतावस्थेत




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि ११ मे -**

सातव्या मजल्यावर राहणाऱ्या एका ४९ वर्षीय इसमाचा सडलेला मृतदेह दमाणी नगर येथील सनसिटी अपार्टमेंटमध्ये आज सोमवार रोजी सकाळी मिळून आला. मृतदेह सडल्याने दुर्गंधी सुटली होती. त्यामुळे आसपासच्या लोकांनी पोलिसांना खबर दिल्याने ही घटना उघडकीस आली.

अमित अशोक तेलंग (वय ४९ वर्ष, रा. बी. विंग, सनसिटी अपार्टमेंट , दमाणी नगर, सोलापूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. आज सकाळपासूनच तेलंग यांच्या घरापासून दुर्गंधी येत होती. आणि तेलंग यांचे दार देखील बंद होते. शंका आल्याने याबाबत शेजारच्यांनी फौजदार चावडी पोलिसांना ही माहिती दिली असता पीएसआय श्रीकांत पाटोळे यांनी रुग्णसेवक लादेन यांना बोलावून घटनास्थळी पोहोचले. दरवाजा तोडला असता अमित तेलंग हे फरशीवर पालथे पडले होते. मृतदेह फुगून दुर्गंधी सुटली होती. फौजदार पाटोळे यांनी त्वरित सदरचा मृतदेह शव विच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात दुपारी दीड वाजता दाखल केला . मयत अमित हे ब्रोकरचा काम करायचे आणि त्यांची पत्नी पुणे येथे राहायला होती तेंव्हापासून तो एकटाच येथे रहात होता अशी माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान पोस्टमार्टम अहवाल प्राप्त झाल्या नंतर हा मृत्यू कशामुळे झाला याचा उलगडा होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## सोशल ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्सचा निकाल ९८.६४ टक्के



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे -**

एस. एस. ए. उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, सोलापूर येथील इयत्ता बारावी परीक्षेमध्ये एकूण २९६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून त्यापैकी २९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या निकालामध्ये १३ विद्यार्थी विशेष प्राविण्य आणि ९० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर १५६ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीमध्ये यश संपादन केले आहे. महाविद्यालयात प्रथम शिफा समीर बिजापुरे ८७.५०% व द्वितीय अमिरून्निसा अख्लाक अहमद चितापूरे ८५.६७% तर अदिबा आसिफ पठाण ८३.८३% तृतीय क्रमांक पटकाविला. सदरील विद्यार्थ्यांना सोलापूर माध्यमिकचे उपशिक्षणाधिकारी मा. प्रकाश नांगरे साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कॉलेजचे प्राचार्य रसूल चौधरी, प्राथमिकचे मुख्याध्यापक डॉ. आसिफ इक्बाल, उपप्राचार्य इम्तियाज शाब्दी, पर्यवेक्षिका यास्मिन शेख, पर्यवेक्षक अल्ताफ कुमठे यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. या यशामागे ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख कलिम करजगी, प्रा. समी गदवाल, प्रा. निलोफर वडवान, वड्डो मॅडम, यास्मिन पेरमपल्ली तसेच इतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

**CHANGE IN NAME**

I Am Changing MY NAME from **Farooque Shaikh** TO **Farooque Rashid Sayyed** for Passport issuance

Resi. - 124-A, Sahara Nagar, Hotgi Road, Solapur - 413003

**KINDLY NOTE THE SAME**

**(Affi. No 20003 Dtd. 11.05.2026)**

## मुलींची गुणवत्तेतील भरारी अभिमानास्पद : मार्तंडे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

दरवर्षी दहावी, बारावीच्या परिक्षेत मुलीच प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत आहेत. मुलींची गुणवत्तेतील भरारी निश्चितच अभिमानास्पद असल्याचे गौरवोद्‌गार सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अविनाश मार्तंडे यांनी काढले.

मार्डी येथील महात्मा फुले हायस्कूलची विद्यार्थिनी राजनंदिनी राजेश गिरे या विद्यार्थिनीने दहावीच्या परिक्षेत ९३.६० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम व तालुक्यात दुसरा क्रमांक मिळविल्याबद्दल व पूजा दशरथ कटरमल या विद्यार्थिनीने ८५.३३ टक्के गुण मिळवून बारावीच्या परिक्षेत महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल दोघींचाही मार्तंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. प्राचार्य सुजितकुमार इनामदार, पर्यवेक्षक गंगाधर राजमाने, चंद्रकांत शिंदे, प्रा.शाहुराजे पाटील, प्रा.अहमदी मोमीन, प्रा.सारिका देशमुख, प्रा.शर्वरी सवणे, स्वप्नाली मार्तंडे, प्रा.संमिता सुतार, भारत मुडके, प्रशांत मुडके, प्रदीप मार्तंडे, दशरथ कटरमल यावेळी उपस्थित होते. दोघींनाही यावेळी श्रीधरराव मार्तंडे प्रतिष्ठानच्या वतीने प्रत्येकी एक हजार रुपयांचे बक्षीस,पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

मार्तंडे म्हणाले, जिद्दीपुढे परिस्थिती शरणांगती पत्करते, हे पूजा कटरमलने सिद्ध करुन दाखविले असून घरची परिस्थिती बेताची असताना देखील तिने बारावीच्या परिक्षेत चांगले यश संपादन केले. तर तिची बहीण दिपाली कटरमल हिने दहावीच्या परिक्षेत ८४ टक्के गुण मिळविले. या दोघी बहिणींचा आदर्श प्रत्येक विद्यार्थ्यांनी घेणे गरजेचे आहे. राजनंदिनी गिरे हिने दहावीत ९३.६० टक्के गुण घेऊन तालुक्यात दुसरा क्रमांक पटकविला त्यामुळे महात्मा फुले महाविद्यालयाच्या गुणवत्तेचा लौकिक निश्चितच वाढला आहे. प्रा.शाहुराजे पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

**विक्री अधिकारी यांचे कार्यालय,**
**द्वारा- श्री. भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप सोसायटी लि., बार्शी.,**
पत्ता - ७३९/१७, पाटील प्लॉट, निकिता हॉटेल जवळ, कुर्डूवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर. ४१३ ४११.
संपर्क - ९०११६९२८५८ / ९८८१९२६२९६ / ८८०५३७५९५९ ईमेल: sbmbarshi@gmail.com

जा.क्र कायदा विभाग/लवाद/३०/बार्शी/२०२६-२७. दि.- ०७/०५/२०२६

**जप्त केलेली स्थावर मालमत्ता विक्रीसाठी विक्री सूचना**

(MSCS Rule, २००२ नियम ३७ (३) (११) व उपनियम मधील तरतुदी पहा)

बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ व नियमामधील तरतुदीनुसार कलम ९७ व नियम २ (x) शक्ती प्रदानित विक्री अधिकाऱ्याने जप्त केलेली स्थावर मालमत्तेची विक्रीची जाहीर सूचना याद्वारे सामान्यतः जनतेला आणि विशेषतः कर्जदार/ जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की, खाली वर्णन केलेली जप्त केलेली मालमत्ता सदर कायद्याअंतर्गत कलम ९७ व नियम (x) ती शक्ती प्रदानित विक्री अधिकारी यांनी कर्जदाराकडून/ जामीनदाराकडून थकबाकी रक्कमेच्या वसुलीसाठी थकबाकीदारांच्या स्वतःच्या नावाने असलेल्या स्थावर मालमत्तेवर जप्ती बोजाची नोंद झाली आहे. सदर मालमत्ता ''जशी व जेथे असतील तशा ''(As Is Where Is), ''जे आहेत ते ''(As Is What Is) आणि ''जे काही आहे ते ''(Whatever There Is) आणि ज्ञात व अज्ञात बोजासह (Known, Unknown Encumbrance) जाहीर लिलावाने विक्री करण्यात येणार आहे. खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव सदर कायदा व खालील अटी व शर्ती व नियमातील तरतुदीनुसार करण्यात येईल.

| कर्जदार/जामीनदार/ मिळकतदार यांचे नाव व पत्ता | अखेर येणे बाकी दिनांक - ०७/०५/२०२६ | स्थावर मालमत्तेचा तपशील | लिलावाचे ठिकाण, तारीख, वेळ |
|---|---|---|---|
| कर्जदार:- श्री. रामहरी लक्ष्मण नलगे<br>रा. खामगाव ता. बार्शी जि. सोलापूर<br>जामीनदार:-<br>१) श्री. राजेंद्र चंद्रभान नलगे<br>रा. खामगाव ता. बार्शी<br>२) श्री. मारुती आबाराव नाईकनवरे<br>रा. खामगाव ता. बार्शी | कर्ज खाते क्र. SHO-५५ चे<br>रक्कम रुपये<br>येणे बाकी - ६३,९२७/- | श्री. रामहरी लक्ष्मण नलगे<br>मौजे पिंपळगाव (पांगरी) यांचे सर्वे/गट नं.: १२६/३ मधील क्षेत्र ०.७६ आर<br>चतु:सीमा:-<br>पूर्व- श्री. बाळासाहेब देशमुख<br>पश्चिम - श्री. अक्षय आण्णा नलगे<br>दक्षिण - नदी<br>उत्तर - श्री. राजेंद्र चंद्रभान नलगे | तारीख - १२/०५/२०२६<br>वेळ -सकाळी ११.००<br>ठिकाण - श्री. भगवंत म ल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप सोसायटी लि., बार्शी., ७३९/१७, पाटील प्लॉट, निकिता हॉटेल जवळ, कुर्डूवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर. |
| **राखीव किंमतः- रुपये- १५,२०,०००/- (पंधरा लाख वीस हजार फक्त)** | | | |

बहुराज्यीय सहकारी कायदा २००२ अंतर्गत वैधानिक सूचनाः- बहुराज्यीय सहकारी कायदा २००२ व नियमानुसार विक्रीसाठी वैधानिक ३० दिवसाची विक्री सूचना कर्जदारांना लिलावापूर्वी पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची शेवटची संधी दिली जात आहे. तसेच न झाल्यास वरील वेळापत्रकानुसार सुरक्षित मालमत्ता विकली जाईल तसेच कर्जदारांना मालमत्तेच्या आत असलेल्या सर्व जंगम वस्तू काढून घेण्याची विनंती करत आहे.

सूचना - कृपया लक्षात घ्या की, सुरक्षित धनको सर्व कर्जदार/जामीनदार यांना स्पीड पोस्ट/नोंदणीकृत पोस्टाने विक्री सूचना/नोटीस पाठविणार आहे. जर ती कोणत्याही पक्षांना प्राप्त झाली नाही, तर विक्री नोटीसचे हे प्रकाशन पर्यायी सेवा पद्धत म्हणून मानले जाऊ शकते. कर्जदार आणि जामीनदारांनी याद्वारे श्री भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. बार्शी शाखा - बार्शी ची एकूण थकबाकी बोली बोलण्यापूर्वी अदा करावी. त्यात अयशस्वी झाल्यास, थकबाकीच्या वसुलीसाठी विक्रीच्या रक्कमेतून वसूल न झाल्यास, शिल्लक रक्कम असल्यास ती कर्जदार/जामीनदार यांच्याकडून पूर्ण येणे बाकी व पुढील व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल याची नोंद घ्यावी.

अटी व शर्ती -१) लिलावात सहभागी होणाऱ्या बोलीदारांना लिलाव सुरू होण्यापूर्वी रू. २५,०००/- अनामत रक्कम (EMD) जमा करावी लागेल आणि स्वतःचे KYC व आर्थिक कागदपत्रे शाखेत सादर करावी लागतील. २) जप्त केलेली मालमत्ता राखीव किंमतीपेक्षा कमी किमतीत विकली जाणार नाही. ३) ज्याच्या नावे लिलाव मंजूर होईल, त्याला लिलावाच्या बोलीच्या २५% रक्कम लिलाव संपल्यानंतर लगेच किंवा एम.एस.सी.एस. (MSCS) कायद्याच्या तरतुदीनुसार कालावधी विक्री अधिकाऱ्याच्या अनुमतीने दिला जाईल. ४) लिलाव बोलीची बाकी राहिलेली ७५% रक्कम व मुद्रांक शुल्काची रक्कम विक्री कायम केलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत भरावी लागेल. न भरल्यास खरेदीदाराने भरलेली २५% रक्कम व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच अशा परिस्थितीत खरेदीदाराचा संबंधित मालमत्तेवर/रक्कमेबाबत कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क/दावा राहणार नाही. ५) लिलावात सहभागी होऊ इच्छिणारे व्यक्ती संस्थेच्या कामकाजाच्या दिवशी मंगळवार आणि बुधवार रोजी दुपारी ३:०० ते ४:०० या वेळेत जप्त केलेल्या मालमत्तेची पाहणी करू शकतात. अधिक माहितीसाठी आमचे बार्शी शाखेचे व्यवस्थापक श्री. कुंभारे एस. यु. (९८८१९२६२९६) यांच्याशी संपर्क साधावा. ६) विक्री अधिकाऱ्याला, कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्वसूचना न देता, कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा लिलाव स्थगित/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार आहे. ७) वरील मालमत्तेवरील महसूल कर, शेतसारा, स्थानिक कर, वीज बिल आणि इतर कोणत्याही करांची जबाबदारी खरेदीदाराची राहील; संस्था कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाही. ८) स्थावर मालमत्तेची विक्री ''जेथे आहे, जशी आहे'' या तत्त्वावर आणि जर आणि काही बोजा असेल तर त्यासह करण्यात येईल. यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्रीचा व्यवहार कर्ज देणाऱ्या संस्थेच्या संचालक मंडळाच्या अनुमतीनंतरच पूर्ण केला जाईल. ९) लिलाव प्रसंगी मोबाईल वापरण्यास प्रतिबंध राहील तसेच बयाणा रक्कम भरलेल्या भागधारकांनाच प्रवेश देण्यात येईल. नियमांचे उल्लंघन, आर्थिक क्षमतेचा अभाव, सार्वजनिक शांतता भंग, किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव लिलाव कोणत्याही वेळी तहकूब करण्याचा अधिकार विक्री अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. १०) विक्रीची पुष्टी केली जाईल आणि विहित नमुन्यानुसार विक्री प्रमाणपत्र केवळ खरेदीदार (विक्रेता)/अर्जदार (अर्जदारांच्या) नावावरच जारी केले जाईल आणि ते इतर कोणत्याही नावाने जारी केले जाणार नाही. नोंदणीसाठी उपनिबंधक यांच्याकडे विक्री प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी खरेदीदाराची असेल. ११) आयकर कायद्यातील नियमानुसार पात्र विहीत TDS सर्वोच्च बोलीदाराने भरणे बंधनकारक आहे. (बोली रक्कम वगळून). अधिक माहितीसाठी विक्री अधिकारी श्री. भोसले एन.जी मो.नं. ९०११६९२८५८ विक्री अधिकारी यांचे कार्यालय बार्शी येथे संपर्क करावा.

**दिनांक - ०७/०५/२०२६**
**ठिकाण - बार्शी**

**सही/-**
**विक्री अधिकारी,**
**सहकार मंत्रालय, सहकार संस्थेचे केंद्रीय निबंधक, न्यू दिल्ली. यांनी बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा कलम ९७ नियम २ (x) नुसार, द्वारा श्री. भगवंत मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप सोसायटी लि, बार्शी करिता शक्ती प्रदानित.**

## जॉगर्स ग्रुपतर्फे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक फुलचंद होटकर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**



महाराष्ट्र पोलीस दलातील सर्वोच्च समजले जाणारे पोलीस महासंचालक पदक प्राप्त झाल्याबद्दल शासकीय मैदानात नियमित व्यायामासाठी येणारे न्यू जॉगर्स ग्रुपचे सदस्य सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक फुलचंद शशिकांत होटकर यांचा न्यू जॉगर्स ग्रुपच्या वतीने ग्रुपचे अध्यक्ष हेमंत जाधव व दिलीप कदम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी जॉगर्स ग्रुपचे म ाजी अध्यक्ष शिवराज कांबळे, दीपक नलावडे, निंगराज विंचुरे, सुहास साळुंके, संतोष कदम यांच्यासह सदस्य डॉ. अतुल लकडे, विरेश नसले, नारायण पिसे, शांताराम शिंदे, चंद्रकांत पुकाळे, शिवा लालसंगी, हनुमंत हत्ताळे, श्री. चौगुले, श्री. बागेवाडी, श्री. राठोड, श्री. झाकणे आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी श्री. होटकर यांच्या प्रामाणिक व उल्लेखनीय पोलीस सेवेबद्दल गौरवोद्‌गार काढत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः नागोबाचीवाडी व तालुका बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** जि. सोलापूर सब जि. व ता. बार्शीपैकी नागोबाचीवाडी येथील जमीन ग्रामपंचायत मिळकत नं. ४२ याचे क्षेत्र ११६०.०० चौ. फूट, याचे १०७.८० चौ. मी. यांसी चतु:सिमा पूर्वेस - ग्रामपंचायत रोड, दक्षिणेस - सरुबाई भागडे, पश्चिमेस - ग्रामपंचायत रोड व उत्तरेस - भागवत भागडे येणेप्रमाणे वर्णनाची घरजागा ही श्री. खंडू भारत भागडे यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्रकी त्यांचे नांवे नोंद आहे.

श्री. खंडू भारत भागडे हे सदरची मिळकत बँकेस तारण देऊन त्यावर कर्ज घेऊ इच्छितात. तरी सदर मिळकतीवर कोणत्याही कसलेही हक्क हितसंबंध. उदा. - गहाण, दान, लीज, लीन, पोटगी, चोळी, बांगडी, टाच, बोजा, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील हे, सदर मिळकतीशी कोणाचाही, कसलाही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे. असे समजून सदरची मिळकत तारण स्विकारून सदर मिळकतीबाबत गहाणखताचा दस्त नोंदवून कर्जदारास कर्ज रक्कम वितरीत करतील. सदरचा गहाणखताचा दस्त नोंदणीकृत झाल्यानंतर कोणाची, कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या/बँकेच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसवणूक होऊ नये, म्हणून ही खरेदीपूर्व/हस्तांतरणपूर्व जाहीर नोटीस दिली असे. कळावे.

दिनांक ११/०५/२०२६

**सही/-**
**श्री. प्रवीण परशुराम करंजकर**
**ॲडव्होकेट, बार्शी**



## महत्त्वाचे

### उर्विल पटेल भविष्यातील तारा : हरभजन





**नवी दिल्ली** : उर्विल पटेल हा भविष्यातील एक स्टार खेळाडू आहे, असे मत भारताचा माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग याने लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्ध अवघ्या १३ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावून विक्रमाशी बरोबरी करणाऱ्या चेन्नई सुपर किंग्सचा फलंदाज उर्विल पटेल याचे कौतुक केले. ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील संघ प्लेऑफमधील स्थानाच्या दिशेने आपली वाटचाल सातत्याने पुढे नेत आहे. रविवारी चेन्नई येथे हंगामातील आपला सहावा विजय नोंदवत हा संघ गुणतालिकेत पाचव्या स्थानावर पोहोचला. या सामन्यात, २०४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना उर्विलने लखनौच्या बलाढ्य गोलंदाजी आक्रमणाची अक्षरशः धुलाई केली; त्याने २३ चेंडूंमध्ये ६५ धावांची धडाकेबाज खेळी साकारली, ज्यात दोन चौकार आणि आठ षटकारांचा समावेश होता आणि त्याचा स्ट्राईक रेट २८२ पेक्षाही अधिक होता.

### पाकिस्तान, बांगलादेश दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलियाचा क्रिकेट संघ जाहीर

**नवी दिल्ली** : आगामी पाकिस्तान आणि बांगलादेश दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलिया क्रिकेट मंडळाने आपला नवा संघ जाहीर केला असून, संघात अनेक बदल केले आहेत. २०२७ च्या विश्वचषकाच्या तयारीला आतापासूनच सुरुवात केल्याचे दिसत आहे. या दौऱ्यांमधून पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क आणि जोश हेझलवूड या अनुभवी वेगवान त्रिकुटांना विश्रांती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, टी-२० मधील स्फोटक फलंदाज ग्लेन मॅक्सवेल यालाही बांगलादेशविरुद्धच्या टी-२० मालिकेत स्थान मिळालेले नाही. या दिग्गज खेळाडूंच्या अनुपस्थितीत संघाचे नेतृत्व मिचेल मार्शकडे सोपविण्यात आले असून, लियाम स्कॉट आणि ऑली पीक यांसारख्या युवा खेळाडूंना संधी देऊन बोर्डाने भविष्यातील संघ बांधणीचे संकेत दिले आहेत. ऑस्ट्रेलियाचा हा दौरा ३० मे पासून पाकिस्तानमध्ये सुरू होणार असून, त्यानंतर संघ बांगलादेशला रवाना होईल. पाकिस्तानविरुद्ध रावळपिंडी आणि लाहोरमध्ये तीन एकदिवसीय सामने रंगतील, तर बांगलादेशमध्ये एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांचा थरार पाहायला मिळेल. पॅट कमिन्स आणि अनुभवी गोलंदाजांना विश्रांती देऊन त्यांना जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेसाठी ताजेतवाने ठेवण्याची ऑस्ट्रेलियाची योजना आहे. या नव्या आणि युवा खेळाडूंनी भरलेल्या ऑस्ट्रेलियन संघासमोर पाकिस्तान आणि बांगलादेशला त्यांच्याच मायदेशात रोखण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

### भारतीय १७ वर्षांखालील मुलांचा उझबेकिस्तानकडूनपराभव

**जेद्दाह** : किंग अब्दुल्ला स्पोर्ट्स सिटी हॉल स्टेडियमवर झालेल्या एएफसी १७ वर्षांखालील आशियाई चषक सौदी अरब २०२६ च्या गट ड मधील अंतिम सामन्यात भारतीय पुरुष संघाला गतविजेत्या उझबेकिस्तानकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला. या पराभवामुळे भारताच्या स्पर्धेतील वाटचालीस पूर्णविराम लागला आणि फिफा १७ वर्षांखालील विश्वचषकासाठी पहिल्यांदाच गुणवत्तेवर आधारित पात्रता मिळवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना आणखी एक वेदनादायक अपयश आले.

# प्रियांश, श्रेयसची दमदार अर्धशतके

## पंजाब किंग्स ५ बाद २१०

◆ **धर्मशाला, ११ मे**

हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटनेच्या स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या महत्त्वपूर्ण आयपीएल सामन्यात सलामीवीर प्रियांश आर्या (५६) आणि कर्णधार श्रेयस अय्यरने (नाबाद ५९) झळकावलेल्या अर्धशतकांच्या बळावर पंजाब किंग्सने २० षटकांत ५ बाद २१० धावा उभारल्या. दिल्ली कॅपिटल्सला विजय मिळविण्यासाठी २० षटकांत २११ धावा काढण्याचे लक्ष्य मिळाले आहे.

जिंकणे अनिवार्य असलेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला व संघात पाच बदल केले.

पंजाब किंग्सने कामगिरी सुधारण्याचे ध्येय उराशी बाळगून डावाची झकास सुरुवात केली. प्रियांश आर्या व प्रभसिमरन सिंगने दिल्लीच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत ४१ चेंडूंत ७८ धावांची सलामी भागीदारी केली. दरम्यान प्रियांशने २४ चेंडूंत आपले अर्धशतक साजरे केले. मध्यम गती गोलंदाज मुकेश कुमारने ही जमलेली सलामी जोडी फोडली. प्रभसिमरनने १५ चेंडूंत ३ चौकार हाणत १८ धावांची भर घातली. पुढे प्रियांश व श्रेयस अय्यरनेही दमदार फलंदाजी करीत पंजाबला शंभर धावांच्या जवळपास आणले, त्यावेळी मध्य प्रदेशचा वेगवान गोलंदाज माधव तिवारीने प्रियांशला डीप मिडविकेटवर साहील पारखकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. माधवचा हा आयपीएलमधील पहिला बळी ठरला. प्रियांश आर्याने ३३ चेंडूंत २ चौकार व ६ षट्कारांसह ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली. तोपर्यंत पंजाबने ९ षटकांत २ बाद ९७ धावांपर्यंत मजल मारली.









### अय्यर, कोनोलीची ८३ धावांची भागीदारी

पुढे श्रेयस अय्यर व कूपर कोनोलीने अधिक जबाबदारीने खेळत आपल्या पंजाब किंग्सची धावसंख्या वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी ८३ धावांची भागीदारी केली, दरम्यान अय्यरने ३२ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. पुन्हा माधवने आपल्या गोलंदाजीची कमाल दाखवित कूपरला डेव्हिड मिलरकडून झेलबाद केले. माधवचा हा दुसरा बळी ठरला. कूपर कोनोलीने २७ चेंडूंत ३८ धावांची भर घातली आणि संघाला १७.४ षटकांत १८० धावांचा टप्पा गाठून दिला. या धावसंख्येत सात धावांची भर पडत नाही तोच मिचेल स्टार्कने पंजाबला दोन धक्के दिले. अठराव्या षटकांदरम्यान स्टार्कने मार्कस स्टोइनिस (१) व शशांक सिंगला (०) आल्यापावली तंबत परत पाठविले.

पुढे श्रेयस अय्यर व सूर्यांश शेडगेने नाबाद खेळी करत पंजाब किंग्सला २० षटकांत ५ बाद २१० धावा उभारून दिल्या. अय्यरने ३६ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने नाबाद ५९ धावांची खेळी केली, तर सूर्यांशने अवघ्या ८ चेंडूंत नाबाद २१ धावांची खेळी केली, यात त्याने प्रत्येकी २ चौकार व षट्कार हाणलेत.

दिल्ली कॅपिटल्सकडून मिचेल स्टार्क व माधव तिवारीला प्रत्येकी २ बळी, तर मुकेश कुमारला एक बळी टिपण्यात यश आले. ◂(वृत्तसंस्था)

# मी खेळण्यास पात्र : विनेश

## विश्रांती अन् पुनरागमनबाबत चुकीचा अर्थ लावला

◆ **नवी दिल्ली, ११ मे**

मी राष्ट्रीय रँकिंग कुस्ती स्पर्धेत सहभागी होण्यास पात्र आहे. भारतीय कुस्ती महासंघाने माझ्या विश्रांतीचा कालावधी व पुनरागमनाबाबत चुकीचा अर्थ लावला आहे, असे ऑलिम्पिकपटू कुस्तीगीर विनेश फोगट हिने म्हटले आहे.

आपल्या कायदेशीर पथक व सल्लागारांशी चर्चा केल्यानंतर, नोटीसमध्ये करण्यात आलेल्या प्रत्येक दाव्याला मी पुढील चौदा दिवसांत सविस्तर उत्तर देईल, असेही हरयाणाच्या ३१ वर्षीय कुस्तीपटूने नमूद केले आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती विनेश हिला भारतीय कुस्ती महासंघाकडून १५ पानांची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. या नोटीसमध्ये तिच्यावर बेशिस्तपणाचा व उत्तेजक-विरोधी नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप करण्यात आला होता; तसेच तिला २६ जूनपर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास अपात्र घोषित करण्यात आले होते.

पॅरिस ऑलिम्पिकनंतर घेतलेल्या विश्रांतीनंतर, नंदिनीनगर महाविद्यालयाच्या आवारात सुरू असलेल्या राष्ट्रीय वरिष्ठ गट मानांकन कुस्ती स्पर्धेतील ५७ किलो वजनी गटात पुन्हा स्पर्धात्मक कुस्तीमध्ये परतण्याचा विनेशचा प्रयत्न होता, परंतु तो या निर्णयामुळे हाणून पाडला गेला.

या १५ पानांच्या कारणे दाखवा नोटीसमध्ये महासंघाने एका महत्त्वाच्या मुद्द्यावर प्रकाश टाकला आहे. तो मुद्दा म्हणजे, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत पोहोचल्यानंतर दुसऱ्याच दिवशी विनेशला विहित वजनाची अट पूर्ण करण्यात आलेले अपयश आहे.



उत्तर प्रदेशच्या गोंडा येथील राष्ट्रीय रँकिंग कुस्ती स्पर्धेस्थळी दाखल झालेली विनेश फोगट

'यूडब्ल्यूडब्ल्यू'च्या नियमांनुसार विहित वजनाच्या मर्यादेचे पालन करणे हे विनेशचे कर्तव्य होते व वजनाच्या अटीत अपात्र ठरल्यामुळे भारताचे पदक हुकले, तसेच महासंघाची नकारात्मक प्रसिद्धी झाली व महासंघाच्या प्रतिष्ठेलाही धक्का पोहोचला, असे महासंघाने म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# गुजरात, हैदराबाद यांच्यात प्लेऑफसाठी चुरस

◆ **अहमदाबाद, ११ मे**

१९ वा इंडियन प्रीमियर लीग हंगाम आता आपल्या निर्णायक अंतिम टप्प्यात दाखल होत असताना, गुणतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या सनरायझर्स हैदराबाद व तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या गुजरात टायटन्स या संघांदरम्यान मंगळवारी अहमदाबाद येथे अत्यंत महत्त्वपूर्ण साखळी सामना खेळला जाणार आहे. प्लेऑफच्या शर्यतीची दिशा ठरविण्यात ही लढत निर्णायक ठरू शकते.

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्स संघ, हंगामाची सुरुवात संथ गतीने झाल्यानंतरही, सलग काही महत्त्वाचे विजय मिळवून आता काहीसा अधिक भक्कम स्थितीत असल्याचे दिसून येत आहे. या विजयांमध्ये राजस्थान रॉयल्सवर मिळविलेल्या ७७ धावांच्या दणदणीत विजयाचाही समावेश आहे, त्यामुळे गुजरात संघाला गुणतालिकेत तिसऱ्या क्रमांकावर झेप घेता आली.



शुभमन गिल



पॅट कमिन्स

### प्लेऑफची शर्यत तापली

गुणतालिकेतील अव्वल तीन संघ- बंगळुरू, हैदराबाद व गुजरात हे सर्व १४ गुणांवर बरोबरीत असल्याने, प्लेऑफच्या शर्यतीत नेट रन रेट हा निर्णायक घटक ठरू शकतो. त्यामुळे, आपल्या घरच्या मैदानावर आणि प्रेक्षकांसमोर खेळताना गुजरात टायटन्ससाठी आपला नेट रन रेट सुधारणे अत्यंत अनिवार्य ठरले आहे.

हैदराबाद संघाने अगदी योग्य वेळी आपला सूर गवसून घेतला आहे. पंजाब किंग्जवर मिळवलेला ३३ धावांचा दणदणीत विजय हे याचेच द्योतक असून, ४ गड्यांच्या मोबदल्यात २३५ धावांचा डोंगर उभारून त्यांनी आपल्या फलंदाजीतील प्रचंड क्षमतेचे दर्शन घडविले आहे. मात्र, पुन्हा एकदा बहरलेला खेळ आणि गुणतालिकेतील भक्कम स्थान असूनही, त्यांना गाफील राहून चालणार नाही; कारण प्लेऑफची शर्यत अजूनही अत्यंत चुरशीची आहे आणि एकही छोटीशी चूक त्यांना महागात पडू शकते.

गुजरात टायटन्सची ताकद त्यांच्या संघाच्या संतुलनात आहे. कर्णधार गिल व साई सुदर्शन यांच्यामुळे गुजरातच्या फलंदाजीला बळकटी आली. या दोघांनीही डावाच्या सुरुवातीला भक्कमपणा दिला आहे.

जोस बटलर व वॉशिंग्टन सुंदर या अनुभवी खेळाडूंमुळे संघाला अधिक बळ मिळाले आहे. त्यांचा गोलंदाजीचा माराही तितकाच प्रभावी आहे. मोहम्मद सिराज व कॅगिसो रबाडाचा वेग व बळी घेण्याची क्षमता, तसेच रशीद खानचे नियंत्रण हे या सर्वांना उत्तम साथ देतात.

**आजचा सामना**

**गुजरात टायटन्स वि. सनरायझर्स हैदराबाद**
**स्थळ** : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

अलीकडे, त्यांची गोलंदाजी हंगामाच्या सुरुवातीच्या तुलनेत अधिक शिस्तबद्ध आणि प्रभावी दिसत आहे. हे या गोष्टीचे लक्षण आहे की परदेशी वेगवान गोलंदाज भारतीय परिस्थितीत चांगले स्थिरावत आहेत आणि त्यांच्या भूमिकेत अधिक सातत्य मिळवत आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### आयपीएल गुणतालिका

| संघ | सामने | विजय | पराभव | गुण | नेट रनरेट |
|---|---|---|---|---|---|
| रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू | ११ | ७ | ४ | १४ | १.१०३ |
| सनरायझर्स हैदराबाद | ११ | ७ | ४ | १४ | ०.७३७ |
| गुजरात टायटन्स | ११ | ७ | ४ | १४ | ०.२२८ |
| पंजाब किंग्स | १० | ६ | ३ | १३ | ०.५७१ |
| चेन्नई सुपर किंग्स | ११ | ६ | ५ | १२ | ०.१८५ |
| राजस्थान रॉयल्स | ११ | ६ | ५ | १२ | ०.०८२ |
| कोलकाता नाईट रायडर्स | १० | ४ | ५ | ९ | -०.१६९ |
| दिल्ली कॅपिटल्स | ११ | ४ | ७ | ८ | -१.१५४ |
| मुंबई इंडियन्स | ११ | ३ | ८ | ६ | -०.६४९ |
| लखनौ सुपर जायण्ट्स | ११ | ३ | ८ | ६ | -०.९०७ |

(बंगळुरू वि. मुंबईदरम्याच्या सामन्यापर्यंतचा गुणफलक)

# भुवनेश्वर अव्वल; अंशुल कम्बोज दुसऱ्या क्रमांकावर

## पर्पल कॅप क्रमवारी



◆ **रायपूर, ११ मे**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू व मुंबई इंडियन्स यांच्यात रविवारी झालेल्या अत्यंत महत्त्वाच्या आयपीएल सामन्यादरम्यान पर्पल कॅप शर्यतीत एक नाट्यमय वळण आले. या हंगामात मोठ्या धावसंख्या आणि अटीतटीच्या सामन्यांची मालिका सुरू असताना, अनुभवी स्विंग किंग भुवनेश्वर कुमारने रायपूरमधील आपल्या सामना-विजयी कामगिरीच्या जोरावर गोलंदाजीच्या क्रमवारीत थेट अव्वल स्थान गाठले आणि दर्जा हा कायम असतो हे पुन्हा एकदा सिद्ध केले.

मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात मैदानात उतरण्यापूर्वीच, भुवनेश्वर कुमार गोलंदाजांच्या यादीत आघाडीच्या फळीत विराजमान होता. परंतु, शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर रात्रीच्या प्रकाशात त्याने केलेल्या गोलंदाजीच्या अप्रतिम कामगिरीने या स्पर्धेची दिशाच बदलून टाकली. भुवनेश्वरने अचूक टप्प्यावर गोलंदाजी करीत मुंबई इंडियन्सची फलंदाजी फळी पूर्णपणे खिळखिळी केली आणि २३ धावांत ४ बळी अशी उत्कृष्ट कामगिरी नोंदवली.



या चार बळींच्या जोरावर, ११ सामन्यांमध्ये त्याच्या एकूण बळींची संख्या २१ वर पोहोचली आहे आणि त्याने अधिकृतपणे पर्पल कॅपवर आपले नाव कोरले आहे. पॉवरप्लेमध्ये आणि सामन्याच्या अखेरच्या टप्प्यात निर्णायक क्षणी बळी मिळवून देण्याची त्याची क्षमताच, आयपीएलच्या गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचण्याच्या प्रवासाचा मुख्य आधार ठरली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### भारताचे फिफा विश्वचषकाचे स्वप्न भंगले

**सुझोऊ** : चीनमध्ये सुरू असलेल्या एएफसी १७ वर्षांखालील महिला आशियाई चषक फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत, सोमवारी चीनकडून ०-३ ने झालेल्या पराभवासह फिफा विश्वचषकासाठी पात्र ठरण्याचे भारताचे स्वप्न संपुष्टात आले. हुआंग चिन्यी, लियू युक्सी आणि ली चिशियानने गोल करीत आपल्या चीन संघाला उपांत्य फेरीत पोहोचवले; तिथे त्यांची गाठ उत्तर कोरियाशी पडेल. कोरियाने उपांत्यपूर्व फेरीच्या दुसऱ्या सामन्यात थायलंडचा ६-० ने धुव्वा उडविला होता. या स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचण्याची भारताची ही पहिलीच वेळ होती. या सामन्यात विजय मिळविला असता, तर भारताचे या वर्षाच्या अखेरीस मोरोक्कोमध्ये होणाऱ्या १७ वर्षांखालील महिला विश्वचषकातील स्थान निश्चित झाले असते.

# पंजाब, बंगळुरूच अंतिम सामना खेळेल

## सुनील गावस्कर यांचा विश्वास

◆ **मुंबई, ११ मे**

आयपीएल २०२६ च्या अंतिम फेरीत गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) सोबत पंजाब किंग्स स्थान मिळवेल, यावर माझा अजूनही ठाम विश्वास आहे, असे भारताचा माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर म्हणाले.

पंजाब किंग्सला हंगामाच्या मध्यावर कामगिरीत काहीसा उतार अनुभवावा लागला असून त्यांना सलग तीन सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे; तरीही, श्रेयस अय्यरच्या संघात पुन्हा एकदा विजयाच्या मार्गावर परतण्याची क्षमता आहे, असे गावस्कर एका मुलाखतीत म्हणाले.

मी अजूनही पंजाब किंग्सलाच पसंती देईन. काही वेळा, सलग झालेले एखाद-दुसरे पराभव संघाला नव्याने सुरुवात करण्यास व गाफील राहणे टाळण्यास मदत करू शकतात. दुसरीकडे, दिल्ली कॅपिटल्सने जिंकू शकणारे काही सामने गमावले आहेत व या हंगामात त्यांच्यासाठी ही एक वारंवार उद्भवणारी समस्या ठरली आहे, असे गावस्कर म्हणाले.



स्पर्धेचा हा टप्पा किती महत्त्वाचा आहे, याची पंजाबच्या संघाला नक्कीच जाणीव असेल. त्यामुळे, आणखी एका पराभवामुळे आपल्या मनात आत्म-शंकेची भावना निर्माण व्हावी, असे त्यांना कदापि वाटणार नाही.

या हंगामासाठी अंतिम फेरीत पोहोचणारे संघ म्हणून मला अजूनही पंजाब किंग्स आणि आरसीबी हेच दोन संघ दिसत आहेत, असे ते म्हणाले. सोमवारी धरमशाला येथे हे दोन्ही संघ आमनेसामने येतील. ◂(वृत्तसंस्था)

# माधवराव गोठोस्कर यांना जीवनगौरव

◆ **मुंबई, ११ मे**

भारतीय क्रिकेटच्या इतिहासाचे साक्षीदार आणि शिवाजी पार्क जिमखान्याचे एकमेव भारतीय कसोटी पंच माधवराव गोठोस्कर यांना जिमखान्यातर्फे जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुण्यातील बाणेर येथील अथश्री या निवासस्थानी हा भावपूर्ण सोहळा पार पडला. वयाची ९७ वर्षे पूर्ण केली असूनही गोठोस्कर यांची प्रकृती अत्यंत तंदुरुस्त असून, त्यांच्या अफाट स्मरणशक्तीच्या जोरावर त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी शिवाजी पार्क जिमखान्याचे सचिव संजीव खानोलकर, कार्याध्यक्ष दीपक मूरकर, उपसचिव सुनील रामचंद्रन आणि अजय पाटणकर उपस्थित होते. खाण रत्नांची हे जिमखान्याच्या सुवर्ण इतिहासावर आधारित पुस्तक आणि सन्मानचिन्हं देऊन गोठोस्कर सरांचा गौरव करण्यात आला.



माधवराव गोठोस्कर १९६० साली शिवाजी पार्क जिमखान्याचे सदस्य झाले. त्यानंतर सलग २२ वर्षे त्यांनी विविध पदांवर कार्य करत जिमखान्याच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलला. यामध्ये ९ वर्षे अध्यक्ष, ७ वर्षे कार्याध्यक्ष आणि ६ वर्षे विश्वस्त म्हणून त्यांनी धुरा सांभाळली. त्यांच्या कार्यकाळात विजय मांजरेकर सिंगल विकेट आणि रमाकांत देसाई डबल विकेट अशा प्रतिष्ठित स्पर्धांची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. ◂(तभा वृत्तसेवा)

# आयसीसी संघ क्रमवारीत भारताचे अव्वल स्थान कायम

◆ **दुबई, ११ मे**

जागतिक क्रिकेटमध्ये भारतीय संघाने पुन्हा एकदा आपली ताकद सिद्ध केली असून आयसीसीच्या ताज्या वार्षिक क्रमवारीत टीम इंडियाने मर्यादित षटकांच्या दोन्ही प्रकारांत अव्वल स्थान काबीज केले आहे. एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटमध्ये भारताने आपले 'नंबर वन' रँकिंग कायम राखले असून, कसोटी क्रिकेटमध्येही भारतीय संघाने एका स्थानाची झेप घेत तिसरे स्थान पटकावले आहे. विशेष म्हणजे सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकावर नाव कोरल्यानंतर भारताचे या फॉरमॅटमधील वर्चस्व अधिकच भक्कम झाले आहे.



आयसीसीने प्रसिद्ध केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, टी-२० क्रमवारीत भारतीय संघ २७५ रेटिंग गुणांसह पहिल्या स्थानावर विराजमान आहे, तर इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. एकदिवसीय क्रमवारीतही भारताने ११८ गुणांसह आपले वर्चस्व कायम ठेवले असून न्यूझीलंड दुसऱ्या स्थानावर आहे. दुसरीकडे, कसोटी क्रिकेटमध्ये मात्र ऑस्ट्रेलियाचे निर्विवाद वर्चस्व कायम असून ते १३१ गुणांसह अव्वल स्थानी आहेत, तर दक्षिण आफ्रिका दुसऱ्या स्थानावर स्थिर आहे. भारतीय संघ १०४ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला असून त्यांनी इंग्लंडला मागे टाकले आहे. मे २०२५ नंतरच्या कामगिरीला १०० टक्के महत्त्व देऊन ही क्रमवारी निश्चित करण्यात आली असून, आगामी मालिकांमुळे या स्थितीत बदल होण्याची शक्यता असली तरी सध्या तरी जागतिक क्रिकेटवर भारतीय संघाचाच दबदबा दिसत आहे.

### विश्वचषक पात्रतेवर क्रमवारी अद्यतनाचा होणारा परिणाम

या वार्षिक क्रमवारी अद्यतनामध्ये, मे २०२५ पासून खेळल्या गेलेल्या सामन्यांना पूर्ण (१०० टक्के) महत्त्व दिले जाते; तर मागील दोन वर्षांतील सामन्यांच्या निकालांना अर्धे (५० टक्के) महत्त्व दिले जाते. दक्षिण आफ्रिकेने १०२ गुणांची कमाई करीत, पाकिस्तानच्या ९८ गुणांना मागे टाकले व अव्वल चार संघांच्या यादीत आपले स्थान मिळवले.

### वन-डे क्रमवारीतअव्वल १० संघ

अव्वल १० क्रमांकामधील उर्वरित स्थानांमध्ये कोणताही बदल झालेला नाही; श्रीलंका (९६), अफगाणिस्तान (९३) आणि इंग्लंडने (८९) अव्वल आठ संघांची यादी पूर्ण केली आहे. बांगलादेश ८४ गुणांसह नवव्या स्थानावर आहे, तर वेस्ट इंडीज सध्या ७४ गुणांवर आहे. मागील अद्यतनामध्ये (अपडेटमध्ये) बांगलादेशपेक्षा ६ गुणांनी पिछाडीवर असलेला वेस्ट इंडीज संघ आता १० गुणांनी मागे पडला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### विश्वचषक २०२७ पात्रतेची समीकरणे

या संदर्भात, जर दक्षिण आफ्रिका संघ अव्वल आठ स्थानांमध्येच कायम राहिला (ज्यांची स्पर्धेसाठीची पात्रता आधीच निश्चित झाली आहे), तर विश्वचषकाचे थेट तिकीट मिळवण्यासाठी नववे स्थान अत्यंत महत्त्वाचे ठरेल.

आयर्लंड (५४) संघाने झिम्बाब्वेला (५३) मागे टाकत ११ वे स्थान पटकावले आहे; तर अमेरिकेने स्कॉटलंडला मागे टाकत १३ व्या स्थानावर झेप घेतली आहे. स्कॉटलंडचे ४४ गुण असताना, अमेरिकेने ४६ गुणांची कमाई केली आहे. संयुक्त अरब अमिरातीने कॅनडाला मागे टाकत १६ गुणांसह १९ वे स्थान गाठले आहे. या विशिष्ट निकालाचे दोन्ही संघांसाठी महत्त्वपूर्ण परिणाम होणार आहेत, कारण हे दोन्ही संघ पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२७ स्पर्धेसाठी थेट पात्रता मिळविण्याच्या प्रयत्नात आहेत, असे आयसीसीने म्हटले आहे. ३१ मार्च २०२७ रोजीच्या आयसीसी क्रमवारीत अव्वल आठ स्थानांवर असलेल्या संघांना थेट पात्रता मिळेल. या संघांसोबतच यजमान देश असलेल्या दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे संघांनाही पात्रता मिळेल, कारण त्यांना आपोआपच (स्वयंचलितपणे) पात्रता प्राप्त झाली आहे,असेही आयसीसीने नमूद केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### द्वारकाधीश मंदिरात अधिक मास उत्सव दर्शन

**सोलापूर, दि. ११ मे-**



विजापूर रोड परिसरातील जलाराम नगर येथील श्री द्वारकाधीश मंदिरात अधिक मासनिमित्त दि.१७ मे ते दि.१५ जून २०२६ या कालावधीत श्री द्वारकाधीश प्रभूंच्या वर्षभरातील सर्व उत्सवांचे दर्शन होणार आहे. फुलमंडळी, नागदमन, विवाह खेळ, हिंडोळा, रासलीला, आम मनोरथ तसेच छप्पनभोग दर्शनचा लाभ भाविकांना होणार आहे. दररोज सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत दर्शनासाठी मंदिर भाविकांसाठी असेल. भजन-कीर्तनाचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे. तरी सोलापूरकरींनी उपस्थित राहून श्रीजींच्या दिव्य दर्शनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन किशन पुरोहित मुखियाजी यांनी केले.

### अल्पवयीन मुलीस फूस लावुन पळवले; मंगळवेढ्यात गुन्हा

**मंगळवेढा, दि. ११ मे-**

उचेठाण परिसरातून एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस आमिष दाखवुन पळून नेण्यात आले. ही घटना गुरुवार दि. ७ मे रोजी घडली. याप्रकरणी मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. संबंधित अल्पवयीन मुलगी दि. ७ मे रोजी रात्री १०.१५ ते पहाटे ५ दरम्यान राहत्या घरातून अचानक बेपत्ता झाली. अज्ञात व्यक्तीने कशाचे तरी आमिष दाखवून तिला फूस लावून पळून नेले असल्याची फिर्याद मुलीच्या मंगळवेढा पोलिस ठाण्यात दिली आहे. रंग सावळा, शरीराने सडपातळ, उंची १५० सेंटीमीटर, चेहरा गोल, केस काळे, नाक पसरट, शिक्षण इयत्ता आठवी, अंगात निळ्या रंगाचे जॅकेट अशा वर्णनाची मुलगी कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी पोलीस उपनिरीक्षक डॉ. आरती कणिरे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

### आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांना पितृशोक


**सांगोला,दि.११ मे -**



सांगोल्याचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे वडील तथा विक्रमवीर माजी आमदार गणपतराव देशमुख यांचे ज्येष्ठ सुपुत्र पोपट देशमुख (वय- ६९) यांचे सोमवारी (दि.११) अल्पशा आजाराने निधन झाले. गेले काही दिवस ते आजारी होते. हे मूळचे मोहोळ तालुक्यातील पेनूर येथील रहिवासी होते. त्यांचे वडील गणपतराव देशमुख हे राज्याच्या राजकारणात दीर्घकाळ सक्रिय राहून विक्रमी अकरा वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. मात्र, इतक्या मोठ्या राजकीय वारशाची पार्श्वभूमी असतानाही पोपट देशमुख यांनी कधीही सक्रिय राजकारणात सहभाग नोंदवला नाही. ते साधेपणाने आपल्या मूळ गावी राहून सामाजिक व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत होते. आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या राजकीय प्रवासात व त्यांना आमदार बनविण्यामागे पोपट देशमुख यांचे मोलाचे योगदान असल्याचे मानले जाते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवारी (दि. १२) सकाळी ९ वाजता पेनूर (ता.मोहोळ) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## निधन वृत्त...


### वजाबाई बाबर



**सांगोला, दि.११ मे -**

येदुचामळा, चोपडी (ता.सांगोला) येथील वजाबाई गोरख बाबर (वय-७३) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात विवाहित दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### अरविंद काकडे



**सोलापूर, दि. ११ मे-**

जुनी मिल चाळ येथील रहिवासी अरविंद तुळशीराम काकडे वय ७० यांचे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी मुलगा मुलगी असा परिवार आहे.

### सरोजबेन पटेल



**सोलापूर, दि. ११ मे-**

उमा नगरी, लोकमंगल ऑक्सि पार्क जवळीलरहिवासी श्रीमती सरोजबेन मधुसूदन पटेल (वय ८६) यांचे सोमवार ११.०५ २०२६ रोजी वद्धपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, नातवंडे असा परिवार आहे

# राष्ट्रीय रॉकेट बॉल स्पर्धेत पाँडिचेरी व केरळ संघास विजेतेपद





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मे-**

राष्ट्रीय रॉकेट बॉल स्पर्धेचे मुलींच्या गटात पाँडिचेरी तर मुलांच्या गटात केरळ संघाने विजेतेपद पटकाविले. उपविजेतेपद दोन्ही गटात तमिळनाडू संघाने जिंकले. मुलींच्या गटात केरळ तर मुलांच्या गटात आंध्र प्रदेश संघाने तृतीय स्थान संपादिले. मुलांच्या गटात चवथे बक्षीस उत्तराखंड संघाने जिंकले.

रॉकेट बॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र व रॉकेट बॉल फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित तसेच महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठान जुळे सोलापूर व विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट पुरस्कृत नेहरू नगर डीएड कॉलेज येथील चंद्राम चव्हाण गुरुजी मैदानावर ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेत आठ राज्यातील मुलीचे ४ तर मुलांच्या ७ संघांनी भाग घेतला होता.

साखळी पद्धतीने हे सामने पार पडले. मुलींच्या गटातील पांडेचेरी व तमिळनाडू संघात अंतिम सामना अटीतटीचा होऊन पाँडिचेरी संघाने विजय मिळविला. मुलांच्या संघात केरळ व तमिळनाडू संघात झालेल्या चुरशीच्या सामन्यात केरळने २५-११ गुणाने तमिळनाडू संघावर मात करुन विजयश्री खेचून आणली. उमरगा लोहारा मतदार संघांचे आमदार प्रवीण स्वामी व शिवसेना जिल्हा प्रमुख शरणराज केंगनाळकर यांच्या हस्ते सामन्याचे उद्घाटन करण्यात आले. पारितोषिके माजी आमदार शिवशरण पाटील, मागास सेवा मंडळ अध्यक्ष सुभाष चव्हाण, मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाचे संस्थापक सदस्य विजय शाबादी, निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे, पत्रकार तात्यासाहेब पवार, जॉगर्स क्लबचे माजी अध्यक्ष संतोष कदम, सामाजिक कार्यकर्त्या अलका गाडेकर, प्रसाद गाजरे, मल्लिनाथ याळगी आदी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी रॉकेट बॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव व खेळाचे संस्थापक डॉ.गोपालकृष्णन यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन विश्वनाथ आमणे यांनी केले.

यावेळी फेडरेशनचे विविध राज्यातील पदाधिकारी जी. श्रीधर, डी.सौंदराज, एम.डी हाफिजअहमद, मोहम्मद असीम, अन्वर बाशा, ललिता, व्ही. के. मुतू कृष्णन आदी मान्यवरांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. रॉकेट बॉल फेडरेशन महाराष्ट्र राज्य सचिव लक्ष्मीकांत पुजारी यांनी या स्पर्धेचे संपूर्ण नियोजन व आयोजन केले होते. स्पर्धेसाठी पी. सुरेश, बी. विद्या, एम.प्रशांत, एम.संतोषकुमार, एम.किर्तना, जेसना मारिया जोश, चेजीन बीजू आदी चॅम्पियन खेळाडूंनी पंचांची कामगिरी बजाविली.

या स्पर्धेस निंगुमल बहुउद्देशीय संस्था कसगी या संस्थेचे विशेष अर्थसहाय्य व योगदान लाभले. या सामन्यांसाठी मनीषा पुजारी, सिद्धाराम औरसंग, भगवती पुजारी, भुवनेश्वरी पुजारी, मल्लिकार्जुन पूजारी, विश्वजित पुजारी, सुरेखा औरसंग, पंमाराणी पाटील, कलावती कलापगोळ गौतम आतकरे, शरणबसु पुजारी आदींनी विशेष परिश्रम घेतले.



# मुलाचा हात धरून धावल्या माता

## चेतक स्केटिंग क्लबतर्फे आगळ्यावेगळ्या स्पर्धेने मातृदिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

चेतक रोलर स्केटिंग क्लबच्या ३५ व्या वर्षातील ८० व्या स्केटिंग शिबिरामध्ये जागतिक मातृदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पासपोर्ट ऑफिससमोरील होम मैदान लगतच्या जागेवर मुलाचे बोट धरून पळणे या आगळ्यावेगळ्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे २०० मीटर अंतराच्या या शर्यतीत मातांना आपल्या पाल्याचा हात धरून धावायचे होते. अनेक मातांनी साडी नेसलेली असतानाही अत्यंत वेगाने धावत या स्पर्धेत सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मातृत्वाला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर चेतक क्लब आणि सद्भावना परिवारातर्फे मुलांना खाऊ वाटप, तर मातांना पर्स व पिशव्या भेट देऊन गौरविण्यात आले.

### रुतुजा पोखरापूरकर (पाल्य: स्वरा) प्रथम

या स्पर्धेत रुतुजा पोखरापूरकर (पाल्य: स्वरा) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तन्झिला शेख (मोहम्मद) यांनी द्वितीय, भाग्यश्री खताळ (सार्थक) यांनी तृतीय तर मिसबा इनामदार (सिमराह) यांनी चतुर्थ क्रमांक मिळवला. पाचवा क्रमांक सपना सानम (अलेक्या) आणि पल्लवी मोरे (लतिका) यांनी विभागून देण्यात आला.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ जून महिन्यात होणार आहे. कार्यक्रमाचे नियोजन दिव्यकांत गांधी यांनी केले, तर मयुर सोलनकर, जयदेव बाहेरमठ, ध्रुवेश गांधी, स्नेहा गांधी, प्रितेश गांधी व गौरी सावंत यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

# छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजची श्रावणी शिताप राष्ट्रीय ज्युडो स्पर्धेत पाचवी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ मे -**

येथील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजची खेळाडू श्रावणी शिताप हिने राष्ट्रीय ज्युडो स्पर्धेत पाचवे स्थान संपादले.

भोपाळ (मध्य प्रदेश) येथे झालेल्या पश्चिम-दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ ज्युडो स्पर्धेत श्रावणीने ही कामगिरी केली. या यशाच्या जोरावर चंदीगड (पंजाब) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ज्युडो स्पर्धेत तिने सहभाग घेत तिने पाचवे स्थान प्राप्त केल. या कामगिरीच्या आधारावर तिची आगामी खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड होण्याची शक्यता आहे. श्रावणीने केवळ ज्युडोमध्येच नव्हे, तर कुराश या क्रीडा प्रकारातही जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर यश मिळवले आहे. तिची आंतरराष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठीही निवड झाली होती; मात्र युद्धजन्य परिस्थितीमुळे सध्या ही स्पर्धा लांबणीवर पडली आहे. श्रावणीला प्रा. सचिन गायकवाड, प्रा. संतोष गवळी आणि मारुती घोडके यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहरपंत सपाटे, जनरल सेक्रेटी प्रा. महेश माने, प्राचार्य डॉ. नितीन मोटे आणि श्री. चटके यांनी तिचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गांधीजींच्या तत्वे स्वीकारणे काळाची गरज

### साहित्यिक प्रा. धन्यकुमार बिराजदार यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**विजयपूर, दि. ११ मे-**



'महात्मा गांधी हे केवळ स्वातंत्र्यलढ्याचे नेते नव्हते, तर ते सत्य, अहिंसा, प्रेम, करुणा आणि मानवतेचे महान पुरस्कर्ते होते. गांधीजींनी 'सत्य हेच ईश्वर' मानत आपल्या संपूर्ण जीवनात सत्य आणि नैतिकतेचा मार्ग स्वीकारला. त्यांची अहिंसा ही केवळ हिंसा न करणे एवढ्यापुरती मर्यादित नव्हती, तर प्रत्येक माणसाविषयी प्रेम, सहिष्णुता आणि बंधुभाव ठेवण्याची जीवनपद्धती होती. समाजात शांतता, सामाजिक सलोखा आणि मानवी मूल्यांची जपणूक करण्यासाठी गांधीजींच्या सत्य, अहिंसा आणि सदाचाराच्या तत्वांचा स्वीकार करणे काळाची गरज आहे,'' असे साहित्यिक प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी केले.

अंजुमन-ए-इस्लाम संस्थेच्या अंजुमन कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात कर्नाटक गांधी स्मारक निधी, बेंगळुरू आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'गांधी विचारधारा आणि समकालीन प्रासंगिकता' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. जे. जहागीरदार होते. याचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष जनाब सय्यद जैनुल आबेदीन पीरजादे हाश्मी यांच्या हस्ते झाले.

प्रा. सुलेमान हत्तरकीहाल यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सलीम देसाई यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर डॉ. सद्दामहुसेन मुजावर यांनी आभार मानले.

# सोलापूरच्या रणरागिणींची विजयी घोडदौड

### मेट्रो संघाचा 10 गडी राखून धुव्वा; भक्ती पवार सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे -**



महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या महिला क्रिकेट स्पर्धेत सोलापूरने अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन करत मेट्रो संघाचा १० गडी राखून दणदणीत पराभव केला. गोलंदाजांच्या भेदक माऱ्यामुळे मेट्रो संघाचा डाव स्वस्तात गुंडाळल्यानंतर, सोलापूरच्या फलंदाजांनी अवघ्या ५ षटकांत विजयावर शिक्कामोर्तब केले.

प्रथम फलंदाजीला उतरलेल्या मेट्रो संघाला सोलापूरच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर तग धरता आला नाही. संपूर्ण संघ १२.४ षटकांत अवघ्या ४४ धावांवर तंबूत परतला. मेट्रोकडून सृष्टी भंबुर्डे हिने सर्वाधिक ९ धावा केल्या, मात्र इतर फलंदाज अपयशी ठरले. सोलापूरच्या गोलंदाजीचे नेतृत्व भक्ती पवार हिने केले. तिने ३ षटकांत केवळ ५ धावात २ महत्त्वाचे बळी टिपले. तिला पूनम मशाळे आणि आयुष्या भोई यांनी प्रत्येकी २ बळी मिळवून साथ दिली.

४५ धावांचे माफक आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या सोलापूरच्या सलामीवीरांनी सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. सलामीवीर साक्षी वाघमोडे हिने २० चेंडूत ५ चौकारांच्या मदतीने नाबाद २७ धावा फटकावल्या. दुसऱ्या बाजूला आर्या उमाप हिने ११ चेंडूत नाबाद १४ धावांचे योगदान दिले. या दोघींनी अवघ्या ५ षटकांत ४७ धावा पूर्ण करत संघाला एकतर्फी विजय मिळवून

# चादर, टॉवेल उद्योग लढतोय अस्तित्वाची लढाई

### या उद्योगाचे भवितव्य युवकांच्या हाती

### 'टीडीएफ'ने भूमिका बदलली पाहिजे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मे-**

चादर व टॉवेल उत्पादनसंदर्भात एकेकाळी 'सोलापूर'चा मोनोपॉली अर्थात दबदबा होता. मात्र, गेल्या काही वर्षांपासून देशांतर्गत व परदेशातील स्पर्धेमुळे हा उद्योग अस्तित्वाची लढाई लढतोय. निम्मे कारखाने बंद पडले. जे चालू आहेत त्यातील ८० टक्के कारखानदार अडचणीत आहेत.

या परिस्थितीवर मात करण्यासाठी विचारमंथन व सामुहिक प्रयत्न करण्याची गरज आहे. चादर-टॉवेल उद्योगाचे भवितव्य युवकांच्या हाती आहे, असे प्रतिपादन टीडीएफ अर्थात टेक्सटाईल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे संस्थापक श्रीनिवास बुरा यांनी केले.

### जीआय, ओडीओपी यांसारख्या योजना

जीआय अर्थात भौगोलिक सांकेतांक, ओडीओपी अर्थात वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट यांसारख्या सरकारी योजनांचा योग्य वापर करुन येथील चादर-टॉवेल उद्योगाला नवे आयाम देता येतील. प्रगतीची नवी दालने उघडू शकतील. दर एक-दोन वर्षात चादर टॉवेल एक्झिबिशन भरवून मार्केटिंगचे क्षेत्र देशात आणि परदेशात वाढवता येईल, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.




सर्वच कारखानदारांनी अगदी शून्यातून चादर, टॉवेल उद्योग सुरु केलं-वाढवलं, मोठी आर्थिक प्रगती केली. म्हणूनच हा टेक्स्टाईल उद्योग टिकविण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करणे ही आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. त्यासाठी 'टीडीएफ'सारख्या संस्था जास्त सक्रिय असणे अत्यावश्यक आहे. ३२ वर्षापूर्वी नियमितपणे विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी तसेच तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळविण्यासाठी टीडीएफची स्थापना झाली होती. मात्र परिस्थितीनुसार 'टीडीएफ'ने भूमिका बदलली पाहिजे.

आज 'टीडीएफ'ला ऊर्जा असणाऱ्या युवकांची नितांत गरज आहे. हा वारसा पुढे नेण्यासाठी नवनवीन कल्पना, प्रयोगशील विचार आणि नेतृत्व पुढे यायला हवं. डीटीएम, बी.टेक्स, एमबीए, एमसीए शिकलेले युवक विशेष योगदान देऊ शकतील. टीडीएफ अशा तरुणांना प्रशिक्षण, मार्गदर्शन, नेतृत्वाची संधी आणि व्यासपीठ मिळवून देण्यासाठी मी कटीबध्द आहे, असेही त्यांनी सांगितले.

# आंतरराष्ट्रीय खो-खो प्रशिक्षण शिबिरासाठी सांगलीचे प्रशांत पवार 'तज्ज्ञ मार्गदर्शक'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे -**



काठमांडू येथे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरासाठी महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागातील सेवानिवृत्त राज्य व राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक प्रशांत पवार (सांगली) यांची तज्ज्ञ तांत्रिक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. १३ ते १६ मे या कालावधीत कवरडेड हॉल, कीर्तीपूर येथे हे लेव्हल वन प्रशिक्षण शिबिर व परीक्षा पार पडणार आहे.

ऑलिम्पिक कौन्सिल, आंतरराष्ट्रीय खो-खो फेडरेशन आणि एशियन खो-खो फेडरेशनशी संलग्न असलेल्या खो-खो इंडियाच्या मान्यतेने नेपाळ खो-खो असोसिएशनच्या वतीने हे शिबीर आयोजित केले आहे. या शिबिरातील परीक्षार्थींना श्री. पवार हे मार्गदर्शन करणार आहेत. खो-खो इंडियाचे संस्थापक सुरेश शर्मा यांनी ही नियुक्ती केली आहे. श्री. पवार यांच्या या निवडीबद्दल खो-खो महाराष्ट्र कार्यकारणीचे समन्वयक सुरेश गांधी, अजय पवार, सत्येन जाधव, बिभीषण पाटील, तानाजी आगळे, मंदार देशमुख, सचिन मोहिते आणि अमित भंडारी यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. या विशेष प्रशिक्षणासाठी प्रशांत पवार हे काठमांडू येथे रवाना झाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने महसूल ना.चंद्रशेखर बावनकुळे यांचा विशेष सन्मान

**सोलापूर, दि. ११ मे -**

महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे हे रविवारी सोलापूर शहराच्या दौऱ्यावर आले असता ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. ईच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक तथा सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ चे भाजप नगरसेवक किसन जाधव यांच्या पुढाकारातून अशोक चौक परिसरातील स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानासमोर हा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी नामदार बावनकुळे यांना सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यात्रेतील प्रमुख आकर्षण असलेल्या सातही मानाच्या नंदीध्वजांचे प्रतीक असलेली



बाराबंदी पोशाखातील नंदिध्वज धारक सिद्धरामेश्वरांची आकर्षक मूर्ती भेट देण्यात आली. तसेच शाल, पुष्पगुच्छ अर्पण करून त्यांचा सन्मान करण्यात आला यावेळी बोलताना नामदार बावनकुळे यांनी सोलापूरच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचे कौतुक केले. सोलापूरची सिद्धरामेश्वर यात्रा ही राज्याच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहे. समाजातील एकोप्याची भावना जपणारे असे उपक्रम प्रेरणादायी आहेत, असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे, भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या तथा माजी महापौर श्रीकांचना यन्नम, सचिन उर्फ अक्षय जाधव यांच्यासह भाजपा नगरसेवक पदाधिकारी कार्यकर्ते आणि ईच्छा भगवंताची परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गढूळ पाणीपुरवठा, स्मशानभूमीप्रश्नी शिवसेनेचे मडका फोड आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे -**

सोलापूर : शहरातील अनियमित व गढूळ पाणीपुरवठ्याच्या समस्येबाबत तसेच मुळेगाव तांडा परिसरातील स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने मडकाफोड आंदोलन करण्यात आले.

जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, महिला आघाडी प्रमुख प्रिया बसवंती यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे शहरातील अनेक भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून गढूळ आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याची गंभीर बाब मांडण्यात आली आहे.

अनेक नागरिकांनी या संदर्भात तक्रारी केल्या असून काही ठिकाणी दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.सोलापूर महापालिकेकडून नियमित पाणी बिल आकारले जात असताना नागरिकांना चार ते आठ दिवसांनी अनियमित पाणीपुरवठा होत असल्याबद्दल यावेळी तीव्र नाराजी व्यक्त करत मडके फोडत सोलापूर महापालिका प्रशासनाचा निषेध व्यक्त करत मडके फोडण्यात आले.



शहरातील काही भागात अद्याप टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असल्याचे नमूद करत पाणीपुरवठा सुरळीत व स्वच्छ करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, प्रिया बसवंती यांनी महापौर आणि महापालिका आयुक्तांना देण्यात आलेल्या निवेदनात आला आहे.

दरम्यान, मुळेगाव तांडा क्रमांक २ येथील लमाण समाजासाठी स्मशानभूमीची जागा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे. या भागातील नागरिकांनी यापूर्वीही महापालिकेकडे मागणी केली होती; मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी मुळेगाव तांडा येथील स्मशानभूमी प्रश्नाकडे लक्ष वेधण्यात आले.

स्मशानभूमीची जागा नसल्याने अंत्यविधी करताना नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अनेकदा रस्त्यावर विधी उरकावे लागत असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. आंदोलनात शरणराज केंगनाळकर, महेश धाराशिवकर, दत्ता माने, मंगलाई धोरात आदी सहभागी झाले होते.

# महसूल मंत्र्यांनी मार्गी लावला बी २ आणि गुंठेवारीचा विषय



### आमदार देवेंद्र कोठे यांनी मानले आभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महापालिका निवडणुकीत दिलेला शब्द पाळून नागरिकांचा विश्वास सार्थ ठरविल्याने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आमदार देवेंद्र कोठे यांनी आभार मानले.

शहरी भागात समाविष्ट झालेल्या गावांमधील ७/१२ उतारे बंद करून त्याऐवजी मालमत्ता पत्रक (प्रॉपर्टी कार्ड) देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. यामुळे बँकांकडून कर्ज घेताना होणाऱ्या अडचणी दूर होतील.

गुंठेवारी नियमितीकरण केले असून, सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील गुंठेवारी जमिनी नियमित करण्याची प्रक्रिया वेगवान करण्याचे आदेश दिले आहेत.

### प्रॉपर्टी कार्ड नावावर मिळणार

सोलापूरच्या कामगारांच्या १३ चाळी, शहरातील २१ सोसायटी तसेच मुरारजी पेठ मधील अनेक नगरे व शहर मध्य विधानसभेतील ८५० हून अधिक मिळकती म्हणजे जवळपास १०००० कुटुंब, गुंठेवारी ५० हजार मिळकती नागरिकांना नावावर प्रॉपर्टी कार्ड करुन मिळणार आहे.

# जिल्ह्यातून पाणी टँकरची मागणी आल्यावर ४८ तासांच्या आत मंजुरी द्या

### पालकमंत्री गोरे यांच्या जिल्हा प्रशासनास सूचना

### उजनीचे 30 ऑगस्टपर्यंत पाणी राखून ठेवणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

जिल्ह्यातील कोणतेही गाव, वाडी-वस्ती किंवा तांड्यावरील नागरिकांकडून पाणीटँकरची मागणी आल्यास ४८ तासाच्या आत पाणीटँकर उपलब्ध करून देण्याच्या सुचना जिल्हा प्रशासनाला दिल्याची माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज (दि. ११) माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान, उजनीतून परवाच एक पाण्याचे आवर्तन सोडले असून, आता शेतीसाठीही पाणी जपून वापरण्याची गरज आहे. कारण उजनीचे पाणी ३० ऑगस्टपर्यंत राखीव ठेवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नियोजन भवन येथे आयोजित खरीप हंगाम २०२६ आढावा बैठक घेतल्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे माध्यमांशी बोलत होते. यावेळी ना. गोरे पुढे म्हणाले की, खरीप हंगाम आढावा बैठकीत खते पुरवठा करणाऱ्या कंपन्या तसेच बियाणे पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडून




कृषी विभागाने वेळेतच खते व बियाणे उपलब्ध करून घ्यावेत तसेच विक्रेत्यामार्फत विनालिंकिंग शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावेत. जे निविष्ठा विक्रेते लिंकिंग करून शेतकऱ्यांना बोगस खते व बियाणे विकत असतील अशा विरोधात प्रशासनाने कठोर कारवाई करावी. यामध्ये लोकप्रतिनिधी तसेच अधिकाऱ्यांनी अत्यंत संवेदनशील होऊन काम करावे व लिंकिंग होऊ देऊ नये. पोलीस विभागाने यासंबंधी तक्रारी प्राप्त झाल्यावर त्यावर तात्काळ गुन्हे दाखल करून घ्यावेत, असेही त्यांनी निर्देशित केले असल्याचे त्यांनी सांगितले. इतकेच नाहीतर कृषी विभागाने ४ लाख ९९ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन केलेले आहे. मागील वर्षीपेक्षा यावर्षीच्या खरीप हंगामात पेरणी क्षेत्रात वाढ दिसत आहे. तरी कृषी व संबंधित विभागांनी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना यावर्षीच्या खरीप हंगामासाठी खते व बियाणे मुबलक प्रमाणात व वेळेवर उपलब्ध करावेत,



असेही पालकमंत्री गोरे यांनी सुचित केले आहे.

यावेळी अरणचे सावता माळी आणि मंगळवेढ्यातील श्री बसवेश्वर स्मारकाचे काम तातडीने पुढे जात असल्याचे सांगितले. या दोन्ही कामांच्या डिझाईन दिल्या आहेत; जमिनीचे प्रश्न मिटले असून, आता कसलीही अडचण नसल्याचे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले. जिल्ह्यातील जलजीवन योजनेबाबतही बोलताना गोरे यांनी सागितले की, राज्यातील अशा अपूर्ण असलेल्या केंद्रीय योजनांना राज्य शासन आता आर्थिक मदत करणार असल्याने तीही कामे गतीने होतील. पंतप्रधान मोदी यांनी सोने, इंधनाबाबत दिलेल्या संदेशाबाबत बोलताना गोरे म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांचे आवाहन देशाला स्व:देशीकडे घेऊन जाण्याचे आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस, सोने विदेशातून आणावे लागते. त्यामुळे देशातील पैसा विदेशात जाऊ नये. ही त्यामागील प्रमुख भूमिका आहे. युद्धामुळे महागाई आणि इतर खर्च वाढला आहे. त्याचा फटका आपल्या देशाला बसू नये म्हणून हे आवाहन केले आहे. जनतेने आणि सोने-चांदी व्यापारी बांधवांनी हे आवाहन सकारात्मकतेने घेऊन स्वदेशी वस्तूचा वापर करण्याचा निर्णय घ्यावा. यावेळी कांदा भाव पडल्याबाबत बोलताना गोरे म्हणाले की, भारतातील कांदा जगातील इतर देशात पाठविण्यात बाबत बंधने आली. त्यामुळे देशातील कांद्याचा दर सध्या पडले आहेत. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर अत्यंत वाईट परिस्थिती आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत महाराष्ट्र सरकार कांदा उत्पादक शेतकऱ्यांची काळजी घेण्याबाबत सकारात्मक आहे. लवकरच यावर काहीतरी तोडगा निघेल, असाही आशावाद यावेळी पालकमंत्री गोरे यांनी व्यक्त केला. यावेळी भोंदूबाबा खरात, शक्तीपीठ महामार्गाबाबत विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

# कांदा भाववाढीसाठी मुख्यमंत्री फडणवीस लवकरच तोडगा काढतील : ना.बावनकुळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

जगात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे कांद्याची निर्यात थांबली. भारतातील कांदा जगातील इतर देशात पाठविण्यात बाबत बंधने आली. त्यामुळे देशातील कांद्याचा दर पडले आहेत. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर अत्यंत वाईट परिस्थिती आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत महाराष्ट्र सरकार कांदा उत्पादक शेतकऱ्यांची काळजी घेण्याबाबत सकारात्मक आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच तोडगा काढतील, असे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोलापूर येथे बोलताना केले.

मागील दोन दिवसापासून ना.बावनकुळे हे सोलापूर शहर-जिल्हा दौऱ्यावर होते. सोमवारी सकाळी त्यांनी



सोलापुरातील प्रसार माध्यमांशी संवाद साधला. राज्यातील जलजीवन योजनेच्या कामाला पंधरा हजार कोटींचा निधी लागणार आहे. त्याबाबत हुडकोचा एक प्रस्ताव आहे. त्यातून नक्की सकारात्मक मार्ग निघणार असल्याचे ना. बावनकुळे म्हणाले. भोंदूबाबा खरात प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमचं सरकार याबाबत कुठेही टाचणीभरही चूक होऊ देणार नाही. एसआयटी यावर चांगल्या पद्धतीने काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. कोणीही गडबड करू शकणार नाही. इतकी खबरदारी स्वतः मुख्यमंत्र्यांनी घेतली असल्याचे ना. बावनकुळे एका प्रश्नाच्या उत्तर दाखल बोलताना म्हणाले.

सेंट्रल ओबीसी यादीत अनेक ठिकाणी कॉमा, स्वल्पविराम या मुळे २७ जातींना सेंट्रल ओबीसीतून वगळण्यात आले आहे. झालेली चूक दुरुस्त करून वगळण्यात आलेल्या जातींचा समावेश सेंट्रल ओबीसी च्या यादीत करावा यासाठी आपण स्वतः प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आवाहन सकारात्मक

पंतप्रधान मोदी यांचे आवाहन देशाला स्वदेशीकडे घेऊन जाण्याचे आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस, सोने विदेशातून आणावे लागते. त्यामुळे देशातील पैसा विदेशात जाऊ नये. ही त्यामागील प्रमुख भूमिका आहे. युद्धामुळे महागाई आणि इतर खर्च वाढला आहे. त्याचा फटका आपल्या देशाला बसू नये म्हणून हे आवाहन आहे. जनतेने हे आवाहन सकारात्मकतेने घेऊन स्वदेशी वस्तूचा वापर करण्याचा निर्णय घ्यावा. असे ना. बावनकुळे म्हणाले.

## उंटाचा पाय अडकला पुलाच्या होलमध्ये



**सोलापूर, दि. ११ मे-**

पुणे नाका येथील नाल्याच्या पुलावरून तीन उंट जात असताना एका उंटाचा पाय पुलावरील होलमध्ये अडकला. दि. ११ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात मोठी गर्दी झाली. काही काळ वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण झाली होती. स्थानिक नागरिक तसेच मदत पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमी उंटाचा पाय होलमध्ये अडकून तो हालचाल करू शकत नव्हता. अखेर क्रेनच्या साह्याने उंटाची सुखरूप सुटका करण्यात आली. यावेळी 'निमल राहत' टीमने तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी उंटाच्या पायावर प्रथमोपचार केले.




# तुळजापूर तहसीलदारांकडून महसूल मंत्र्यांच्या आदेशाची पायमल्ली

### शेतरस्त्याच्या तक्रारींची घेतली नाही दखल

### जिल्हाधिकारी पुजार यांनी लक्ष देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

तुळजापूर तहसील कार्यालयाकडे शेतकऱ्यांनी शेतरस्त्याची तक्रार दिल्यानंतर तब्बल १० ते १५ दिवस त्या अर्जांची दखलच घेतली जात नसल्याची खंत तुळजापूर तालुक्यातील काही शेतकरी बांधवांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली. दरम्यान, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे वारंवार अधिकाऱ्यांनो, शेतकरी प्रश्नांकडे लक्ष द्या, असे आवाहन करतात. शेतकरी हितासाठी महसूलमंत्र्यांनी अनेक निर्णय, आदेश पारीत केले आहेत मात्र तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळंगे व तहसील कार्यालयातील संबंधित कर्मचारी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे सध्या दिसून येत असून, यासाठी जिल्हाधिकारी किर्ती पुजार यांनी लक्ष द्यावे, अशीही मागणी या शेतकरी बांधवांनी केली आहे.

### मी संबंधित कर्मचाऱ्यांना याबाबत सुचना देतो : तहसीलदार बोळंगे

शेतरस्त्याच्या अर्जाबाबत तहसीलदार अरविंद बोळंगे यांच्याशी संपर्क केला असता; त्यांनी शेतरस्त्याचा अर्ज त्यांच्या वॉटस्ॲपवर पुन्हा एकदा मागवून घेतला आणि तहसीलदार बोळंगे म्हणाले की, आपला शेतरस्त्याचा अर्ज मी पाहून सही करुन दिला आहे. आवक-जावकमधून इतके दिवस अर्ज संबंधित कर्मचाऱ्यांकडे अजून का गेला नाही? याची मी चौकशी करतो आणि या कामाबाबत संबंधित कर्मचाऱ्यांना सूचना देतो.

### जिल्हाधिकारी आणि महसूलमंत्र्यांकडे करणार तक्रार

गेल्या २ पिढ्यांपासून चालत आलेला वहिवाटीचा रस्ता बंद केल्याबाबत तहसील कार्यालयास रितसर अर्ज देवूनही तहसीलदारांनी दखल घेतली नसल्यामुळे हे शेतकरी आता या शेतरस्ताप्रश्नी जिल्हाधिकाऱ्यांकडेच नाहीतर थेट महसूलमंत्र्यांकडे धाव घेणार असल्याचे या शेतकऱ्यांनी सांगितले. कारण हा वहिवाटीचा रस्ता गेल्या १ वर्षांपासून बंद असल्याने ४ शेतकऱ्यांचे ८ एकरातील मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

महसूल प्रशासनाला गतिमानता येण्यासाठी १५ दिवसात मोजणी पूर्ण करणे, जिल्ह्यातील पानंद रस्ते व वहिवाटीचे रस्ते जिल्हाधिकारी, तहसीलदार, तलाठी यांनी पालकमंत्र्यांशी समन्वय साधून प्रत्येक रस्ते शोधून त्यांची मोजणी करून शेतकऱ्यांच्या वहिवाटीसाठी सुरू करावेत. असे वारंवार निर्देश देतात मात्र तुळजापूर तहसील कार्यालयाकडून याबाबत आलेल्या अर्जाची दखलच घेतली जात नसल्याचे दिसून आले आहे. इतकेच नाहीतर तहसीलदारांनी प्रत्येक गावात जाऊन जनतेचे प्रश्न गावातच मार्गी लावावेत, असेही निर्देश महसूलमंत्री बावनकुळे हे देतात. मात्र तुळजापूरचे तहसीलदार १० ते १५ दिवस शेतकऱ्यांच्या आलेल्या अर्जाकडे ढुंकूनही पाहत नाहीत, हेही विशेषच आहे.

२७ एप्रिल २०२६ रोजी तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील अविनाश गायकवाड, अनिल गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, निळोबा गायकवाड यांनी गट नंबर ११० मधील शेतरस्ता गेल्या १ वर्षांपासून त्यांच्याच चुलत भावांच्या ३ मुलांनी अडविल्याचा तक्रारी अर्ज तहसीलदार बोळंगे यांना भेटून दिला होता. या अर्जावर त्याच दिवशी तहसीलदार बोळंगे यांनी सही करून पाटील नावाच्या संबंधित कर्मचाऱ्यांकडे देण्यास सांगितले.

तो अर्ज कर्मचारी पाटील यांच्याकडे शेतकरी द्यायला गेल्यावर आवक-जावक विभागात तो अर्ज देण्यास पाटील यांनी सांगितले. त्यानुसार आवक-जावक विभागात अर्ज देवून त्याची पोहोचही संबंधित शेतकऱ्यांनी घेतली. याबाबत तहसील कार्यालयाकडून तब्बल ११ दिवसांनीही विचारणा होत नसल्याने संबंधित विभागाचे कर्मचारी पाटील यांना मोबाईलवरून विचारणा केली तर त्यांनी माझ्याकडेच अजून आवक-जावक विभागातून अर्ज आला नाहीतर मी काय पुढील कारवाई करू? असा प्रतिसवाल शेतकऱ्यांना केला. यावरही आपल्याच कार्यालयातून इतके दिवस कसा अर्ज आला नाही? अजून किती दिवस लागतील अर्ज आपल्याकडे यायला? अशी विचारणा केल्यास पाटील यांनी माझ्याकडे अर्ज आल्यावरच पुढील प्रक्रिया पाहतो...मला बोलू नका असे म्हणून फोन ठेवला. विशेष म्हणजे चार पावलावरच आणि एकाच कार्यालयात आवक-जावकचा विभाग असताना शेतकऱ्यांचा तक्रारी अर्ज आजतागायत पोहोचलाच नाही? हे ऐकून हे शेतकरीही आवाक्‌च झाले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# 'पर्यावरण'विषयक नियमांना फासला जातोय हरताळ; चक्क उघड्यावर जाळला जातोय 'प्लास्टिक'चा कचरा

**श्रीसिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथील प्रकार**

**श्वसन विकार, डोळ्यांची जळजळ यामुळे नागरिक त्रस्त**

**सर्वसामान्य नागरिक आणि बाजार समितीला नियम वेगळे का?**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

पर्यावरणविषयक शासकीय नियमांना हरताळ फासत चक्क उघड्यावर प्लास्टिक व कागदी कचरा पेटविला जात असल्याचा गंभीर प्रकार श्रीसिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीकडून होत असल्याचे उघडकीस आला आहे. या पेटत्या कचऱ्याद्वारे निघणाऱ्या विषारी धुरामुळे श्वसन विकार, डोळ्यांची जळजळ होत असल्याच्या तक्रारी नागरिकांतून येत आहेत.

मार्केट यार्ड अर्थात श्रीसिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील विविध ठिकाणचे प्लास्टिक व कागदी कचरा समितीच्या पाठीमागील भिंतीलगत मोठ्या प्रमाणात टाकला जातो. परंतु पर्यावरण संदर्भात नियमांनुसार या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याऐवजी चक्क उघड्यावर जाळला जात असल्याचा धक्कादायक प्रकार दिसून येत आहे.

बाजार समितीकडील कर्मचाऱ्यांकडून प्लास्टिक कचरा गोळा करुन त्याला आग लावण्यात येत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात विषारी धूर पसरत आहे. या धुरामुळे पर्यावरणाचे गंभीर नुकसान होत असून नागरिकांच्या आरोग्यालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे प्लास्टिक जाळणे हे कायद्याने गुन्हा असतानाही कृषी उत्पन्न बाजार समितीकडून उघडपणे नियमांची पायमल्ली होत असल्याचे सांगण्यात येते.

प्लास्टिक जाळल्याने हवेत घातक रसायने मिसळून श्वसनाचे आजार, डोळ्यांची जळजळ आणि इतर गंभीर आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. मात्र बाजार समितीकडून याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. सामान्य नागरिकांनी कचरा जाळला तर दंड आणि कारवाई केली जाते, मग बाजार समितीला कायद्यापेक्षा वेगळे नियम आहेत का? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

### लोकांच्या जीवाशी खेळ

कृषी उत्पन्न बाजार समितीत दररोज हजारो नागरिक, व्यापारी, हमाल आणि शेतकरी ये-जा करत असतात. अशा प्रकारे विषारी धूर निर्माण करुन लोकांच्या जीवाशी खेळ केला जात आहे. या गंभीर प्रकाराची तात्काळ चौकशी करुन प्लास्टिक कचरा जाळणाऱ्या कर्मचारी, संबंधित अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.

# सोलापूरकरांना भोगावी लागतेय 'पिवळ्या पाण्याची' शिक्षा?

**'जलवाहिनीं'ची नियमित तपासणी**

**'जार'मधील पाण्याद्वारे 'विकतचं दुखणं'**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मे-**

सोलापूर शहरातील अनेक भागांमध्ये पिवळसर, घाण वासयुक्त व गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. सोलापूर महापालिकेचा अनागोंदी-ढिसाळ कारभार व बेजबाबदारपणामुळे 'काळ्या' पाण्याच्या धर्तीवर 'पिवळ्या' पाण्याची शिक्षा भोगावी लागत असल्याची संतापजनक प्रतिक्रिया शहरवासीयांतून व्यक्त होत आहेत.

'आधीच उल्हास, त्यात फाल्गुन मास' याप्रमाणे आधीच अवेळी, चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. त्यातच घाण वासयुक्त, गढूळ व पिवळसर पाणी येत आहे. हे पाणी पिल्याने पोटदुखी, उलट्या, जुलाब यांसारख्या आजारांचा सामना करावा लागत आहे. सोलापूर महापालिका नागरिकांच्या आरोग्याशी खेळ खेळत तर नाही ना? असा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान, शहरातील काही भागातील सुज्ञ नागरिकांच्या तक्रारीवरुन महापालिका कर्मचारी दुषित पाणीपुरवठा झालेल्या भागांना भेटी देऊन पाण्याचे नमुने तपासणीकामी घेऊन गेले. भरुन ठेवण्यात आलेले पाणी वापरावयास घेण्याआधी तुरटी घाला. परंतु दुषित पाणीपुरवठा झालेल्या भागात पुन्हा एकदा पाणीपुरवठा केले जाणार नाही. 'रोटेशन'नुसारच होईल, असे सांगण्यात आले.

एकीकडे महापालिकेकडील करभरणा करायचे तर दुसरीकडे पाण्याचे जार विकत घ्यायचे याद्वारे शहरवासीयांवर दुहेरी आर्थिक फटका बसत आहे. 'जार'मधील पाणी म्हणजे 'विकतचं दुखणं' आहे. याकडे लक्ष वेधताना महापालिका प्रशासनाने तातडीने संबंधित भागातील जलवाहिन्यांची तपासणी करुन स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा करावा, अशी मागणी होत आहे.

### 'त्या' दुर्घटनेची पुनरावृत्ती नको!

ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाईपलाईनमध्ये गेल्यामुळे नळातून दुषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा झाल्याने गतवर्षी मोदी परिसरातील बाबू जगजीवनराम झोपडपट्टी येथील भाग्यश्री म्हेत्रे व जिया म्हेत्रे या दोन शाळकरी मुलींना जीव गमवावे लागले होते. यंदा आज या भागात तर उद्या त्या भागात याप्रमाणे नळाला पिवळसर, घाण वासयुक्त पाणी येत आहे. ही बाब लक्षात घेता, गतवर्षी झालेल्या 'त्या' दुर्घटनेची पुनरावृत्ती होता कामा नये; यादृष्टीने महापालिका प्रशासनाने वेळीच दखल घ्यावी, असे सांगण्यात येते.

### ना सत्ताधारी, ना विरोधी पक्षाचे लक्ष

पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम, पुद्दुचेरी या पाच राज्यातील निवडणूक निकालाचे 'कवित्व'मध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षाकडील नेते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मश्गुल आहेत. मात्र, सोलापूरकरांच्या दृष्टीने जीवनमरणाचा प्रश्न बनलेल्या दुषित, पिवळसर, गढूळ, घाण वासयुक्त पाणीपुरवठ्याकडे लक्ष द्यायला सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या नगरसेवकांना वेळ मिळेना का? असा उपहासात्मक सवाल नागरिकांतून विचारला जात आहे.

### उशिरा सुचलेलं शहाणपण?

गेल्या काही महिन्यांपासून सोलापूरकरांना दुषित पाणीपुरवठासारख्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे. मात्र, लोकप्रतिनिधींसह सर्वच राजकीय पक्षसंघटना याकडे म्हणावे तसे लक्ष देईनासे झाले आहेत. याबद्दल नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान, शिवसेना 'उबाठा'ने याप्रश्नात लक्ष घालत सोमवार, दि.११ मे २०२६ रोजी आंदोलन केले. याकडे लक्ष वेधताना हे उशिरा सुचलेलं शहाणपण तर नव्हे ना? असे एका नागरिकांने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

# ना.देवेंद्र फडणवीसानंतर ना.चंद्रशेखर बावनकुळे यांची आ.देशमुखांच्या निवासस्थानी अचानक भेट

**चर्चांना आले उधाण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर आता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही आमदार सुभाष देशमुख यांच्या होटगी रोडवरील निवासस्थानी अचानक भेट दिल्याने सोलापूरच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. मंगळवारी सकाळी झालेल्या या भेटीत सोलापूर शहरातील विविध विषयांवर दीर्घ चर्चा झाली.



ना.चंद्रशेखर बावनकुळे हे सोमवारी सोलापुरात आले होते. रात्री सोलापुरात मुक्काम केल्यानंतर मंगळवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास त्यांनी आ.सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, स्थायी समितीच्या अध्यक्षा रंजिता चाकोते, भाजप युवा नेते रोहन देशमुख, बाजार समितीचे संचालक मनीष देशमुख उपस्थित होते..

काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बार्शी दौऱ्यावरून परतताना आमदार देशमुख यांच्या निवासस्थानी अचानक भेट दिली होती. या भेटीची चर्चा राजकीय वर्तुळात बरीच गाजली होती. त्यानंतर आता महसूल मंत्री बावनकुळे यांनीही आमदार देशमुख यांची भेट घेतल्याने विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. आमदार सुभाष देशमुख यांचे हायटेक नेत्यांकडे राजकीय वजन चांगलेच असल्याचे या भेटीत दिसून आले.

# शिवानी काळेची अमेरिकेत मास्टर पदवी पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**



येथील शिवानी काळे हिने इन्फॉर्मेशन सिस्टीम्स अँड पॉलिसी मॅनेजमेंट हा मास्टर कोर्स अमेरिकेत पिट्सबर्ग येथील कार्नेगी मेलन युनिव्हर्सिटीमध्ये सायबर सिक्युरिटी या विषयात पूर्ण केला. शिवानीचे वडील सुनील काळे हे सरकारी राजपत्रित अधिकारी आहेत. शिवानीचे शालेय शिक्षण हे लिटिल फ्लॉवर कॉन्व्हेंट हायस्कूल येथे झाले. शालेय स्तरावर तिने ऑलिम्पियाड, बॅकससह विविध परीक्षेत विशेष प्राविण्यसह यश संपादन केले. जेईई मेन आणि ॲडव्हान्स या परीक्षेत देखील विशेष प्राविण्य मिळवून कांचीपुरम् आयआयटी मधून डिझाईन अँड मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला.

# नेहा वळसंगे हिला नॉर्थ कॅरोलिनाची एमएस पदवी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

येथील नेहा अनिल वळसंगे हिने नॉर्थ कॅरोलिना युनिव्हर्सिटी (शार्लेट) अमेरिकामधून मास्टर ऑफ कॉम्प्युटर सायन्स ही पदवी संपादन केली आहे. नेहा ही सेवानिवृत्त पोलीस अधिकारी अनिल वळसंगे यांची कन्या आहे. तिचे माध्यमिक शिक्षण सिध्देश्वर कन्या प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण सोनी कॉलेजमध्ये झाले. तिने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून कॉम्प्युटर सायन्समधून पदवी घेतली आहे.

## महत्वाचे...

### फॉरेस्ट येथे तरुणाला खुर्ची व लाथाबुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि. ११ मे -**

अज्ञात कारणावरून एका तरुणांना खुर्चीने व लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना फॉरेस्ट येथे एका दुकानात घडली. मोईन सय्यद खलील इनामदार (वय-२६, रा.शनिवार पेठ,सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो रविवारी मध्यरात्री फॉरेस्ट येथील दुकानात असताना त्याला अनस बशीर शेख यांनी मारहाण केली. नाकातून रक्त व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्याला उपचाराकरता भाऊ मुबीन याने शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### पत्र्यावर हात आपटून घेतल्याने तरुण जखमी

**सोलापूर, दि. ११ मे -**

अज्ञात कारणावरून एक तरुण पत्र्यावर हात आपटून घेतल्याने जखमी झाल्याची घटना लोधी गल्ली येथे घडली. कुणाल लखन फटफटवाले (वय-१९, रा.लोधी गल्ली, सोलापूर) असे त्या तरुणाचे नाव आहे. तो रविवारी रात्री ११.३० वाजता राहत्या घराजवळ असताना पत्र्यावर हात आपटून घेतले. हाताला जखम झाल्याने तो स्वतः उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल झाला.

### खरातवाडी येथे शेतात कोल्ह्याचा हल्ला, दोघे जखमी

**सोलापूर, दि. ११ मे -**

शेतामध्ये असताना अचानक कोल्ह्याने हल्ला केल्याने दोघेजण जखमी झाल्याची घटना पंढरपूर तालुक्यातील खरातवाडी येथे घडली. सोमनाथ हनुमंत बंडगर (वय-४०), पांडुरंग मारुती बंडगर (वय-६०) असे जखमी शेतकऱ्यांची नावे आहेत. सोमनाथ बंडगर हे रविवारी दुपारी ४ वाजता शेतामध्ये पाणी देत होते तर पांडुरंग बंडगर हे शेळ्या चारत होते. अचानक कोल्ह्याने त्यांच्यावर हल्ला केला. यात दोघे जखमी झाल्याने त्यांना शेटफळ येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात स्वतः दाखल झाले.


# ग्रामस्थांना गॅस टंचाई, हॉटेल मात्र हाऊसफुल्ल

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग दि.११ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथे वळसंग टोल नाका परिसरात असलेल्या मोठ्या हॉटेलना एचपी गॅसचे सिलिंडर सहज उपलब्ध होत आहे. दुसरीकडे गावातील सामान्य नागरिकांना मात्र पंधरा दिवस गॅससाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याचे सांगण्यात येते.

वळसंग टोल नाका हा मुख्य रस्त्यावर असल्याने येथे मोठ्या प्रमाणात प्रवासी आणि अन्य वाहतूक असते. येथील अनेक हॉटेलमध्ये व्यावसायिक गॅसचा वापर होणे अपेक्षित असताना, अनेक ठिकाणी घरगुती सिलिंडरचा साठा मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

टोल नाक्यावरील हॉटेलना नियमितपणे गॅस पुरवठा होत असल्याने त्यांचे कामकाज सुरळीत सुरू आहे. दुसरीकडे गावातील ग्राहकांनी गॅस बुकिंग करून १५-२० दिवस उलटले तरी त्यांना गॅस मिळत नसल्याची ओरड आहे. अनेक महिलांना पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे.




हॉटेलना जादा दराने गॅस विकून एजन्सी चालक सामान्य नागरिकांचा हक्क हिरावून घेत आहेत का? असा सवाल आता नागरिक विचारत आहेत. गॅस एजन्सीचालकाकडून घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार केला जात असल्याची शक्यता असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

गावातील या गॅस तुटवड्याची सरपंच व इतर सदस्यांनी तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना माहिती द्यावी. येत्या काही दिवसांत गावातील घरगुती गॅस पुरवठा सुरळीत झाला नाही, तर ग्रामपंचायतीसमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# श्री कांची कामकोठी पीठम् कांचीपुरम् सोलापूर शाखा अध्यक्षपदी मोहन दाते

**सचिवपदी श्रीहरी म्याकल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

श्री कांची कामकोठी पीठम्, कांचीपुरम् यांच्या सोलापूर शाखेच्या अध्यक्षपदी मोहनराव दाते तर सचिवपदी श्रीहरी म्याकल यांची निवड करण्यात आली आहे.

शाखेच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. दक्षिण भारतातील 'काशी' म्हणून प्रसिद्ध असलेल्या कांचीपुरम् येथील श्री. कामाक्षी टेंपल तसेच जगद्गुरू शंकराचार्यांचे पवित्र पीठ हे सनातन परंपरेचे प्रमुख आध्यात्मिक केंद्र मानले जाते. या परंपरेतील ६८ वे आचार्य चंद्रशेखर सरस्वती





(परमाचार्य) यांनी दोन वेळा भारत परिक्रमा पादयात्रेद्वारे पूर्ण केली होती. त्या काळात त्यांचा पादस्पर्श सोलापूर शहर पुण्यनगरी पंढरपूर क्षेत्राला लाभला होता. त्यानंतर जयेंद्र सरस्वती व विजयेंद्र सरस्वती यांनीही सोलापूर येथे मुक्काम केला होता. त्यामुळे शहरात या पीठाचे असंख्य श्रद्धाळू भक्त आहेत.

येथील बांधकाम व्यावसायिक अंबादास मिठाखोल यांनी अक्कलकोट रोड, ओम अवंती नगर, कृष्णा पार्क परिसरात सुमारे एक एकर जागा संस्थेला देणगी स्वरूपात प्रदान केली आहे. संबंधित ठिकाणी कांची कामाक्षी मंदिर व शंकर मठ उभारण्याचा संकल्प करण्यात आला असून हे स्थळ धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित करण्याचा मानस आहे.

**सोलापूर शाखेच्या कार्यकारिणी अशी :** मोहनराव दाते (अध्यक्ष), वेंकटेश चिलका (उपाध्यक्ष), श्रीहरी म्याकल (सचिव), श्रीधर म्याकल (सहसचिव), अंबादास मिठ्ठाकोल (खजिनदार), जयेन्द्र श्रीगांधी, गोवर्धन चाटला, योगेश म्याकल, पांडुरंग दिड्डी, दयानंद कारमपुरी, महेंद्र चाटला, गणेश बुधाराम, वेणुगोपाल मालपुरी (सर्व सदस्य).

# वृध्द आईला मारहाण; मुलासह सुनेवर गुन्हा

**सोलापूर :** राहते घर पत्नीच्या नावे कर असे म्हणत एका मुलाने आपल्या वृद्ध आईला लाकडाने मारून गंभीर जखमी केल्याची घटना विजापूर रोडवरील नेहरू नगरात घडली. मुलगा प्रतिक महादेव चव्हाण, सून अश्विनी प्रतीक चव्हाण (रा. नेहरू नगर, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याप्रकरणी आई भारूबाई महादेव चव्हाण (वय ६७, रा. नेहरू नगर, विजापूर रोड) यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी मुलगा प्रतीक चव्हाण हा दारू पिऊन घरी आला. त्याने भांडणाची तक्रार पोलिसात का केली, असा जाब विचारत आईला शिवीगाळ करू लागला. मध्यस्थीसाठी आलेल्या बहिणीला व आईला आरोपी सुनेने शिवीगाळ व मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# दिलेल्या वचनाची पूर्तता करण्यासाठी मोहोळ तालुका दौऱ्यावर

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची स्पष्टोक्ती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

भारतीय जनता पक्ष हा विकासाला केंद्रस्थानी ठेवून काम करणारा पक्ष आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारमार्फत विविध लोकाभिमुख योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. पंचायत समितीच्या निवडणुकीत कोमल अंकुश आवताडे यांना दिलेल्या वचनांची पूर्तता करण्यासाठी मी मोहोळ तालुक्याच्या दौऱ्यावर आलो आहे. सोलापूर जिल्ह्याचा सर्वांगीण विकास, स्वच्छता, सुरक्षितता आणि पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अधिक ताकदीने काम करावे, असे आवाहन



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा सत्कार करताना पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.सचिन कल्याण शेट्टी, अंकुश आवताडे, लहू आवताडे, सचिन जाधव, शशिकांत चव्हाण आदी.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

कामती खुर्द (ता.मोहोळ) येथील सिनाई ग्रो टुरिझम रिसॉर्टमध्ये युवा नेते अंकुश आवताडे यांच्या पुढाकारातून आयोजित संवाद मेळाव्यात बोलताना ते पुढे म्हणाले, संघटनात्मक बांधणी, स्थानिक विकासकामे, आगामी निवडणुका आणि शासनाच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सजग राहावेत. ग्रामीण भागातील रस्ते, पाणीपुरवठा, महसूल विभागातील प्रश्न, शेतीविषयक अडचणी, स्थानिक विकासाच्या मागण्यांसंदर्भात सादर करण्यात आलेल्या निवेदनावर आठवड्याच्या आत कार्यवाही करण्यात येईल.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.देवेंद्र कोठे, आ.समाधान आवताडे, माजी आमदार राजन पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जकराया शुगरचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य सचिन जाधव, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, पंचायत समितीच्या सदस्या कोमल आवताडे, सोलापूर महापालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्यासह मनीष देशमुख, प्रणव परिचालक, विक्रांत पाटील, शहाजी पवार, महेश देवकर, विकास वाघमारे, रामराव भोसले-पाटील, प्रकाश चवरे, अस्लम चौधरी, दीपक माळी, सतीश काळे, रमेश माने, सुशील क्षीरसागर, लखन शिंदे, महेश बिराजदार, गणेश जामदार, लहू आवताडे, सोमेश क्षीरसागर, जयसिंग आवताडे, रुद्राक्ष खताळ, प्रदीप आमले, विठ्ठल माळी उपस्थित होते.

### पीरटाकळीच्या घोडके वस्तीतील घरे कायदेशीर करणार

पंचायत समिती निवडणुकीदरम्यान पीरटाकळी येथील घोडके वस्ती येथील घरे कायदेशीर करून देण्याचे आश्वासन ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी युवा नेते अंकुश आवताडे यांच्या मध्यस्थीने दिले होते. त्या अनुषंगाने जून अखेरपर्यंत संबंधित नागरिकांच्या नावावर घरे करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, असे स्पष्ट आदेश त्यांनी तहसीलदार सचिन मुळीक यांना दिले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी : १४३८

**रवि रश्मिकळा । नये काढितां निराळा ।।**

प्रत्येकजण अर्थात, आपण सर्वजण समाजाचा एक अविभाज्य घटक असतो. त्यामुळे प्रत्येकाचे समाजाशी अतुट नाते असायला हवे, हे कोणालाही विसरता येणार नाही. हे अतूट नाते कोण किती जपतो हे ज्याचे त्याच्यावर अवलंबून आहे. ज्या मातृभूमीत आपण जन्मलो, वाढलो त्या मातृभूमीच्या ऋणाची परतफेड करता येणे शक्य नसले तरीही ती परतफेड करण्याचा प्रयत्न आपल्याकडून व्हायलाच हवा. हा प्रयत्न आपल्या कर्तव्यातून होऊ शकतो. आपण ज्या पांडूरंगावर श्रध्दा ठेवून मातृभूमीचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करीत आहोत, तो पांडूरंग पूर्णत: समत्व जोपासणारा आहे. हा समत्व जोपासणारा व समत्व आणि कर्तव्याचा संदेश देणारा पांडूरंग आमचे समाजाशी अतूट नाते निर्माण करतो. प्रत्येक जीवात त्याला म्हणजे एका ईश्वराला पाहायला लावतो. अर्थात, आपण सर्वजण एका ईश्वराची लेकरे आहोत. ही त्याची शिकवण आपणाला समाजापासून वेगळे होऊ देत नाही. समाजरुपी पांडूरंगही आपल्यापासून अजिबात दूर होत नाही. आम्ही आमच्या वर्तनातून, कर्तव्यातून, समाजाच्या ऋणाची परतफेड करण्याच्या प्रयत्नातून समाजाशी सूर्य आणि त्याची किरणे यातील अतूट नात्याप्रमाणे नाते निर्माण केले आहे. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**रवि रश्मिकळा । नये काढितां निराळा ।।**

संत महात्म्यांप्रमाणे सर्व जीवमात्रात ईश्वराला पाहून त्यांच्याशी अतूट नाते जोडणे ही साधी गोष्ट नाही. संसारात अडकलेला जीव मी व अहंकार यामुळे स्वत:च स्वत:चा राहत नाही. जो स्वत:चा राहात नाही तो इतरांचा होईलच कसा? कुटूंबातल्या सदस्यांशी, मित्रपरिवाराशी ज्याला अतूट नाते निर्माण करता येत नाही, त्याला समाजाशी अतूट नाते निर्माण करता येणे अशक्य असते. इतरांशी अतूट नाते निर्माण करण्यासाठी आपण आपल्यातून ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध, वासना आदिंना काढून टाकायला हवे. समाजाशी आपले नाते अतूट आहे, हा दाखविण्याचा किंवा भाषणातून सांगण्याचा विषय नाही. तर हा विषय प्रत्यक्ष अनुभवण्याचा व अनुभूती देण्याचा विषय आहे. ही अनुभूती आपण तेव्हाच समाजाला देऊ शकू जेव्हा आपण आपणाला खऱ्या अर्थाने ओळखू शकू. आपणाला आपली खरी ओळख होण्यासाठी आपणाला तो भेटावा लागतो, जो स्वत:ला खऱ्या अर्थाने ओळखतो. स्वत:ची खरी ओळख होणारे अत्यंत नगण्य आहेत. धावपळीच्या जीवनात अशा महात्म्यांचा शोध लागणे अत्यंत कठीण आहे. पण गाथा, ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून ज्याने ज्ञानोबा-तुकोबांचा सहवास मिळविला त्याला स्वपरिचय होणे व समाजाशी अतूट नाते निर्माण करणे अवघड नाही. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार,
दि. १२ मे २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - वैशाख, कृ. दशमी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- पू.भाद्रपदा (२५.१६)
योग - वैधृति (२३.१८)
करण - बव (२६.१७)
राहू काल : मंगळवार
दु. ३.०० ते ४.३०

दिनविशेष : १५५१: अमेरिकेतील सर्वात जुने विद्यापीठ, सान मार्कोस राष्ट्रीय विद्यापीठाची स्थापना झाली.
आधुनिक शुश्रूषाशास्त्राच्या संस्थापिका, ब्रिटिश परिचारिका फ्लोरेन्स नाइटिंगेल यांचा जन्म.
१९५२: प्रजासत्ताक भारताचे पहिले संसदीय अधिवेशन सुरू झाले.
१३६४: पोलंडमधील सर्वात जुने विद्यापीठ, जगीलोनियन विद्यापीठाची सुरुवात झाली.

# अधिक मासानिमित्त गाथा पारायण, अखंड हरिनाम सप्ताह

## डॉ. जयवंत महाराज बोधले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ मे-**

श्रीसंत माणकोजी महाराज बोधले व सद्गुरु प्रभाकरदादा बोधले महाराज यांचे प्रेरणेने डॉ. जयवंत महाराज बोधले यांचे मार्गदर्शनाने यावर्षीच्या जेष्ठ अधिक पुरुषोत्तम मासानिमित्त जगद्गुरु श्रीसंत तुकाराम महाराज गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन श्रीक्षेत्र देहूगांव (ता. हवेली, जि. पुणे) येथे करण्यात आले आहे.

अधिक मास हा दर तीन वर्षातून एकदा येतो. या अधिक मासामध्ये अनेक धार्मिक विधी केले जात असतात. बोधले महाराज सांप्रदायिक परंपरेनुसार प्रति अधिक मासामध्ये तीर्थक्षेत्रावर अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. आतापर्यंत १५ अधिक मास सप्ताह वेगवेगळ्या तीर्थक्षेत्रावर झालेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने श्रीक्षेत्र हम्पी, श्रीक्षेत्र कुडल-संगम, श्रीक्षेत्र गणगापूर, श्रीक्षेत्र पंढरपूर, श्रीक्षेत्र तुळजापूर, श्रीक्षेत्र त्रिबंकेश्वर, श्रीक्षेत्र काशी, श्रीक्षेत्र पैठण, श्रीक्षेत्र आळंदी इत्यादी पवित्र भूमीवर अखंड हरिनाम सप्ताह संपन्न झाले असून यावर्षीचा १६ वा अधिक मास सप्ताह इंद्रायणी तीरावर श्रीसंत तुकाराम महाराज अवतार व वैकुंठगमन तीर्थक्षेत्री 'देहूगांव' येथे आयोजित केला आहे.

या सप्ताहाचा प्रारंभ रविवार दि. १७ मे रोजी होत असून या सप्ताहामध्ये दररोज पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ७ ते १ गाथा पारायण, सायं ४ ते ५ हरिपाठ, सायं. ५ ते ६ प्रवचन आणि रात्री ६-३० ते ८-३० वा. कीर्तन व नंतर हरिजागर याप्रमाणे दैनंदिन कार्यक्रम संपन्न होणार आहेत. या सप्ताहामध्ये प्रासादिक परंपराच्या प्रमुखांची दररोज कीर्तने होतील. त्यामध्ये प्रामुख्याने प्रथम दिवशी रविवारी वासकर महाराज फड परंपरेचे हभप विठ्ठलदादा वासकर महाराज, पंढरपूर यांचे कीर्तन होईल. त्यानंतर देगलुरकर महाराज संस्थानचे हभप. चैतन्य महाराज देगलुरकर, पंढरपूर तसेच वाणीभूषण हभप प्रमोद महाराज जगताप, बारामती, नंतर जोग महाराज शिक्षण संस्थेचे हभप उमेश महाराज दशरथे, आळंदी, गाथा मंदिरचे अध्यक्ष हभप पांडूरंग महाराज घुले, देहूगांव, हभप रामकृष्ण महाराज लहवितकर, महामंडलेश्वर-नाशिक तसेच शनिवार दि.२३ मे २०२६ रोजी सायं ४ ते ६ या वेळेत केशवभट्ट स्वामी वंशज ह.भ.प अमृत महाराज जोशी यांचे प्रवचनानंतर श्रीसंत जगद्गुरु तकाराम महाराज यांचे विद्यमान वंशज ह.भ.प पुंडलिक महाराज देहूकर, देहूगांव यांचे कीर्तन होईल. वरील सर्व कीर्तनसेवा सायंकाळी ६-३० ते ८-३० या वेळेत संपन्न होतील. या अखंड हरिनाम सप्ताहाचा सांगता रविवार दि. २४ मे रोजी होणार असून सकाळी १० ते १२ या वेळेत श्रीसंत माणकोजी महाराज बोधले यांचे वंशज हभप. डॉ. जयवंत महाराज बोधले, धामणगांव पंढरपूर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये श्री सद्गुरु बोधले महाराज फडावरील सर्व गांवे तसेच परंपरेतील गायक, वादक, टाळकरी आणि शिष्य परिवार उपस्थित राहणार आहेत. प्रामुख्याने महाराष्ट्रातील भक्तगणाबरोबर आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा आदी प्रदेशातील भक्त समुदाय एकत्र येऊन सत्संग व सद्गुरु सेवा घडावी म्हणून मोठया उत्साहाने उपस्थित राहणार आहेत. तरी या अखंड हरिनाम सप्ताहातील कीर्तनसेवा श्रवणाचा पारमार्थिक आनंद सर्व भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन सद्गुरु प्रभाकर बोधले महाराज सेवा प्रतिष्ठान, पंढरपूर यांच्याकडून करण्यात येत आहे.



# सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयामध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करा

## १४ मे ला शासकीय सुट्टी जाहीर करा

### संभाजी महाराजांचा दैदिप्यमान पराक्रमाचा इतिहास शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये समावेश करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

१४ मे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी त्याचबरोबर छत्रपती संभाजी महाराज यांच्या दैदीप्यमान इतिहास शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करण्यात येऊन सर्वच शासकीय निमशासकीय शाळा महाविद्यालयांमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात यावे अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवेदन व ईमेलद्वारे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.

उपजिल्हाधिकारी देशमुख यांनी संभाजी ब्रिगेडच्या निवेदनाची तात्काळ दाखल घेत आज तातडीने सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात जयंती साजरी करण्यात यावी असे परिपत्रक काढण्यात येईल, अशी माहिती दिली. महाराष्ट्र शासनाच्या प्रशासन विभागाच्या वतीने सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करणे बंधनकारक आहे असे असताना देखील अनेक शासकीय कार्यालय व निमशासकीय कार्यालय मध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली नाही अनेक कार्यालयांमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची प्रतिमा सुद्धा उपलब्ध नाही केवळ लोकसहभागातून नव्हे तर प्रशासकीय पातळीवर सुद्धा छत्रपती संभाजी महाराजांचे विचार पोहोचावेत त्यामुळे आपण सोलापूर विभागातील सर्व शासकीय निमशासकीय कार्यालय शाळा महाविद्यालय यांना छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त कार्यालयात अभिवादन करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली. यावेळी संभाजी ब्रिगेडचे माजी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास, उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष विक्रम वानकर, जिल्हा संघटक विशाल साळुंखे, अॅड. हर्षवर्धन बोधले, योगेश शेंद्री, प्रशांत चौरे, मिलिंद मस्के, समाधान गावडे, गणेश स्वामी, अभि बंडगर, आकाश भोसले, जीवन साळुंखे आदी उपस्थित होते.

## जागेच्या वादातून वृध्दास पाईपने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

जागेच्या वादातून एका वृद्धाला पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथे शनिवारी दुपारी घडली.

युसुफ शेख (वय ६० वर्ष, रा . मंद्रूप )असे त्या मारहाण झालेल्या वृद्धाचे नाव असून ते शनिवारी दुपारी घराजवळ असताना त्यांना अबू शिंदे यांनी पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.

यात सर्व अंगाला मुका मार लागल्याने त्यांना मंद्रूपच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयाचे ते आज सोमवारी दुपारी एक वाजता स्वतः दाखल झाले.

## रूपाभवानी मंदिरासमोर तरुणास मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

कामाच्या ठिकाणी झालेल्या वादातून एका तरुणाला लोखंडी वस्तूने व लाथा बुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना रूपा भवानी मंदिरा समोर रविवारी संध्याकाळी घडली.

विशाल श्रीकांत जाधव ( वय २५ वर्ष , रा. सम्राट चौक सोलापूर )असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे . तो रविवारी सायंकाळी साडेसहा वाजता रुपा भवानी मंदिरासमोर असताना त्याला विराज शिवशरण, ओंकार शिंगे व इतर एक जणांनी मिळून लाकडाने व लोखंडी वस्तूने मारहाण केली . यात हाताला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने तो उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात संध्याकाळी स्वतः दाखल झाला.



## चुंगी प्रशालेत माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ मे-**

श्रीमती धोंडूबाई स्वामी प्रशाला चुंगी ( ता. अक्कलकोट) येथील सन २००२-२००३च्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल २३ वर्षांनी स्नेह मेळावा पार पडला.

प्रथमत: गुलाब पुष्पांच्या पाकळ्यानी मुख्याध्यापक व सेवानिवृत्त शिक्षकावर पुष्पांजली वाहत स्वागत करण्यात आले. तदनंतर विद्यादेवता सरस्वती प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्राचार्य किरण गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. तर अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक सर्जेराव पाटील होते. यावेळी वसंत मोरे, प्रकाश जाधव, सुमन कंदले, तोळनुर प्रशालेचे प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड, शहाजी खंदारे आदींचा सन्मान करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांना सेवानिवृत्त शिक्षकांनी मार्गदर्शन केले. यावेळी नारायण बागल, भागवत चव्हाण, अमोल साळुंखे, सुरज रेड्डी, नवनाथ कोळी, किरण थोरे, विनोद काजळे, अनिल धुमाळ आदी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी स्वामीनाथ कलकोटे, अमर काजळे, सखाराम मोटे, सुदर्शन शितोळे, रेवणसिद्ध कलशेट्टी, विठ्ठल चव्हाण, सिराज तांबोळी, तानाजी चव्हाण, पांडुरंग खेत्री, राजेंद्र सुरवसे, कल्याणी कलकोटे, सचिन चव्हाण, सुज्ञान चव्हाण, भुवनेश्वरी अस्वले, लक्ष्मी बोकडे उपस्थित होते. सूत्रसंचालन वासंती मोरे तर माधुरी चव्हाण यांनी आभार मानले.

## छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त मूर्ती प्रतिष्ठापना



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ मे-**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त मूर्ती प्रतिष्ठापना आ. विजयकुमार देशमुख, नगरसेवक अमर पुडाळे, उद्योजक आप्पा इटाई, प्रकाश जाधव, संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्व मान्यवर यांनी मनोगत व्यक्त केले.

मध्यवर्ती महामंडळ च्या वतीने सर्व मान्यवर यांचं सत्कार करण्यात आला. यावेळी मध्यवर्ती महामंडळ संस्थापक राम जाधव, उत्सव अध्यक्ष रोहित नलवडे, कार्याध्यक्ष सॅम बिराजदार, नियोजन प्रमुख वीरेश कलशेट्टी, सहकार्याध्यक्ष ओंकार धावणे, विश्वस्त बंटी सोनके, राजा गेजगे, राहुल दहीहंडे, पवन आलुरे, अक्षय जाधव, संदीप चेळेकर, रोहन जाधव, शिवराज झुंजे, महेश मिश्राम, सौदागर क्षीरसागर, राहुल कोळेकर, ओंकार धावणे, ललित धावणे, सागर धावणे, सागर गायकवाड, अमित निकम आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या उपस्थित होते.



# जिल्ह्यात मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा : पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना ही शासनाची एक महत्त्वाची योजना असून आत्तापर्यंतच्या शेत रस्ते योजनेतील सर्वोत्तम योजना आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लोकप्रतिनिधी व अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपला जिल्हा या योजनेत राज्यात अग्रेसर राहील यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजनेचा आढावा पालकमंत्री श्री. गोरे यांनी घेतला. त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार समाधान आवताडे, उत्तम जानकर, नारायण पाटील, बाबासाहेब देशमुख, अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कार्तिकियेन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी रोहयो अंजली मरोड आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले, मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजने अंतर्गत पहिल्या टप्प्यात वाद नसलेल्या रस्त्यांचे सीमांकन करून घ्यावे. या रस्त्यांची कामे त्वरित सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही पूर्ण करावी. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात वाद असलेल्या रस्त्या अंतर्गत वाद मिटणारे तसेच वाद न मिटणारे रस्त्यांचे वर्गीकरण पूर्ण करावे. या योजनेअंतर्गत तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष संबंधित तालुक्याचे आमदार यांनी तालुकास्तरीय अधिकारी यांच्याशी चांगला समन्वय ठेवावा व या योजनेच्या कामाला अधिक गती द्यावी. या योजनेअंतर्गत एक किलोमीटरच्या रस्त्यासाठी १५ लाख पर्यंतचा खर्च प्रस्तावित करण्यात आलेला आहे. जिल्ह्यात या योजनेच्या कामांना निधीची कमतरता नाही त्यामुळे सर्वांनी वाद नसलेल्या रस्त्याच्या कामांना प्राधान्य देऊन तात्काळ कामे सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. त्याप्रमाणेच काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या सोडवल्या जातील.

महसूल व वन विभागामार्फत ही योजना सुरू असून शेतकऱ्यांना शेतमाल वाहतुकीसाठी मजबूत व सुलभ रस्ते उपलब्ध करून देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेत शेतरस्ते व पाणंद रस्त्यांचा समावेश असून एका किमीसाठी कमाल १५ लाख रुपये खर्च करता येणार आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी चर खोदून मुरुम टाकून दबाई केली जाणार असून आवश्यक ठिकाणी सिमेंट पाईप बसवले जातील. योजनेसाठी समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष पालकमंत्री असून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक आदी अधिकारी सदस्य आहेत, अशी माहिती उपजिल्हाधिकारी रोहयो अंजली मरोड यांनी दिली.

## जंगम समाजाच्या एकत्रिकरणासाठी रविवारी बैठक

**सोलापूर, दि. ११ मे-**

सध्या जंगम समाजामध्ये अनेक संघटना कार्यरत आहेत परंतु प्रत्यक्षात समाज एक संघ होऊ शकलेला नाही. या समाजाला एकत्रित करण्यासाठी रविवार १७ मे रोजी सकाळी ९ वाजता श्री वीर तपस्वी होटगी ब्रहन्मठ , अक्कलकोट रोड, कोंडा नगर येथे बैठक आयोजित केली आहे, अशी माहिती सिद्धय्या स्वामी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या बैठकीत समाजाचे सध्याच्या व्यथा, येणाऱ्या काळातील समस्या, समाजाची रचना कशी असावी?, समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येईल.

त्याला विविध घटकांकडून प्रतिसाद मिळत आहे. समाजातील केवळ २० टक्क्यांपेक्षा कमी लोकांकडे आवश्यक साधने उपलब्ध आहेत. उर्वरित समाज मोठ्या प्रमाणात अस्थिर , अज्ञानी आणि वंचित जीवन जगत आहे. समाजातील सर्वांसाठी शिक्षण, रोजगार व आरोग्य क्षेत्रात सुधारणा घडवून आणणे, सर्व घटकांना एकत्र आणणे यासह विविध विषयांवर चर्चा होणार आहे. या पत्रकार परिषदेत संभाशास्त्री, संतोषकुमार स्वामी, चन्नय्या स्वामी, पंचाक्षरी स्वामी आदी उपस्थित होते.

## दि प्रोग्रेसिव्ह उर्दू हायस्कूलचा दहावीचा निकाल शंभर टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीज संचलित उर्दू हायस्कूल, सोलापूर या प्रशालेत इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ अध्यक्ष डॉ. इम्मद फैज शेख यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावर्षी प्रशालेत १७८ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झालेले होते. त्यापैकी ५८ विद्यार्थी विशेष प्राविण्य, ८१ विद्यार्थी प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणीत ३९ विद्यार्थी यश संपादन केले आहे. तर शेख उम्मे हुस्ना अब्दुल कादर ९५.२०% गुण घेऊन प्रथम क्रमांक जमादार अर्शिया कासिम ९५% गुण घेऊन द्वितीय क्रमांक व काझी बीबी आयेशा अबीदुल्ला ९३.८०% गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावले.



संस्थेचे अध्यक्ष डॉ. इमाद शेख साहेब यांनी अध्यक्षीय भाषण केले. यावेळी मंचावर सदस्य एम. आर. शेख, मुख्याध्यापक अब्दुल गफूर सगरी पर्यवेक्षिका सादिका बारजगी, परवीन मुजावर, झुलफिकार नदाफ, जाफर बांगी, महजबीन मुल्ला, फखरुन्निस्सा, इनामदार, स्वालेहा शेख, फारूक बिद्री, हवलदार, अब्बास किल्लेदार, एहतेशाम काजी, वसीम रंगरेज, वायज शेख, सायेम शेख, शाहनवाज शेख, शाहेबाज बागबान, अयाज हुंडेकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एजाज शेख, आभार मेहजबीन उस्ताद यांनी मानले.

## दहावी परीक्षेत स्वामी विवेकानंद पोलिस पब्लिक स्कूलचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

स्वामी विवेकानंद पोलिस पब्लिक शाळेचा १० वी स्टेट बोर्ड परीक्षेत १०० टक्के निकाल लागलेला आहे. प्रशालेतून ९३ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले. १२ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. प्रतीनि पवार हीने (९६ टक्के) गुण मिळवून प्रथम आलेली आहे. अथर्व व्हटकर (९४.८०) गुण मिळवून प्रशालेतून द्वितीय आलेला आहे.

प्रथमेश घागरे (९४.४० टक्के) गुण मिळवून प्रशालेतून तृतीय आलेला आहे. तनिष्का बल्ला (९४.२० टक्के) गुण मिळवून चौथी आलेली आहे. तसेच श्रावणी गोणे (९३.४० टक्के) गुण मिळवून प्रशालेतून पाचवी आलेली आहे. सई खुणे (९२.६० टक्के), वेदिका इंदापुरे (९१.८० टक्के), मायरा नाईक(९१.६० टक्के), निलमाधव कैरमकोंडा (९१.२० टक्के), अनुष्का बोमेन,(९१.०० टक्के) निहारीका नंदाल (९०.८० टक्के), भक्ती थोरात (९०.४० टक्के) हे विद्यार्थी ९० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेले आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त हसन गौहर, सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) सुरेंद्र मलाळे, पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, इंडियन मॉडेल स्कूलचे अध्यक्ष प्रा. ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सायली जोशी, मुख्याध्यापिका स्वाती कारंडे, ममता बसंवती यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## महत्वाचे...



## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची राधाश्री निवास येथे भेट

**सोलापूर, दि. ११ मे-**

शहरातील प्रख्यात गॅस्ट्रोलॉजिस्ट डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांच्या विशेष निमंत्रणावरून महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुरारजी पेठ येथील राधाश्री निवास येथे सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान कोठे परिवारातर्फे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी परिवारातील महिलांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. तसेच ग्रामविकास मंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे औक्षण करून स्वागत केले. कार्यक्रमास गॅस्ट्रोलॉजिस्ट डॉ. सूर्यप्रकाश कोठे, सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे, नगरसेवक प्रथमेश कोठे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजप महिला अध्यक्षा रोहिणी तडवळकर, भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मनीष देशमुख, सभापती रंजिता चाकोते, नगरसेविका श्रीदेवी फुलारे, सुधा अळ्ळीमोरे उपस्थित होते.




## ॲड. सुरेल शहा, माऊली फाउंडेशनतर्फे दिव्यांगांना मोफत बसविले जयपूर फूट

**सोलापूर, दि. ११ मे-**

येताना कुबडी, व्हील चेअरवर किंवा काठी टेकत आलेले दिव्यांग जाताना मात्र स्वतःच्या पायावर चालत अत्यंत समाधानी मनाने घरी परतले. जेष्ठ विधिज्ञ ॲड. सुरेल शहा आणि माऊली फाउंडेशनतर्फे तब्बल १४० दिव्यांगांना मोफत जयपूर फूट बसविण्यात आले. सुनील शहा यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त जेष्ठ विधिज्ञ ॲड. सुरेल शहा आणि माऊली फाउंडेशन (काळबादेवी, मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने शिवस्मारक येथे हे शिबिर घेण्यात आले. वडिलांच्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून ॲड. सुरेल शहा यांनी सामाजिक ऋण फेडण्याच्या हेतूने हा कौतुकास्पद उपक्रम राबविला. यात दिव्यांगांना जयपूर फूट, कॅलिपर बसविण्यात आले. याप्रसंगी सुनिल शहा, रेखा शहा, संकेत शहा, ॲड. सुरेल शहा, ॲड. विश्वनाथ टाळकुटे, ॲड. निलेश ठोकडे, इंजि. शशांक कासलीवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी दिव्यांगांनी जयपूर फूट, कॅलिपर बसवून दिल्याबद्दल ॲड. सुरेल शहा आणि माऊली फाउंडेशनचे आभार मानले. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल सोलापूरकरांनी संयोजकांचे कौतुक केले.

## भाग्यश्री ॲग्रोकडून ब्लू कुराकाओ शीतपेयाचे लाँचिंग

**सोलापूर, दि. ११ मे-**

शहरातील स्थानिक उद्योगविश्वात नव्या संधींचे दार उघडत भाग्यश्री ॲग्रोने ब्लू कुराकाओ या शीतपेयाचे दमदार लाँच केले. आकर्षक चव, उच्च गुणवत्ता आणि परवडणारी किंमत यामुळे हे उत्पादन लवकरच ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास भाग्यश्री ॲग्रो कंपनीचे प्रमुख यशवंत देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली. ब्लू कुराकाओ हे आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे आणि आंतरराष्ट्रीय मानकांचा विचार करून तयार करण्यात आले असून, गुणवत्ता व विश्वास या तत्त्वांवर आधारित आहे. स्थानिक पातळीवर तयार झालेले हे शीतपेय आता बहुराष्ट्रीय ब्रँड्सशी स्पर्धा करण्यासाठी सज्ज झाले आहे. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी भाग्यश्री ॲग्रोने विविध योजना जाहीर केल्या आहेत. कुपन योजनेंतर्गत अंदमान, लक्षद्वीप टूर, कॉर्डेलिया क्रूझ प्रवास, तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विमान प्रवास आणि रेल्वे तिकीट परतावा यांसारख्या सुविधा देण्यात येणार आहेत. सोलापूरहून गोवा, मुंबई, हैदराबाद आदी शहरांकडे प्रवास करणाऱ्या ग्राहकांना या योजनांचा लाभ मिळणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात स्थानिक व्यापारी, हॉटेल, रेस्टॉरंट आणि किरकोळ विक्रेत्यांच्या माध्यमातून हे उत्पादन बाजारात उपलब्ध करण्यात येणार असून, लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात वितरण वाढविण्याचे नियोजन आहे. भाग्यश्री ॲग्रोचे प्रमुख यशवंत लक्ष्मण देशमुख यांनी स्थानिक पातळीवर शिक्षण घेत विविध ठिकाणी कामाचा अनुभव घेतल्यानंतर उद्योजकतेचा मार्ग स्वीकारला. सातत्य, जिद्द आणि नव्या कल्पनांच्या जोरावर त्यांनी ब्लू कुराकाओ या उत्पादनाद्वारे उद्योगविश्वात नवे पाऊल टाकले आहे. सोलापूरचा ब्रँड देशभरात पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. नागरिक व माध्यमांचे सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा देशमुख यांनी व्यक्त केली. या पत्रकार परिषदेस केतन शहा उपस्थित होते.

## आमच्या शेतात यायचे नाही म्हणून वृद्धास लाकूड व लाथा बुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि. ११ मे -**

तू आमच्या शेतात यायचे नाही असे म्हणून एका वृद्धास लाकडाने व लाथा बुक्क्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना माढा तालुक्यातील लऊळ येथे शनिवारी घडली. बाबासाहेब पांडुरंग घाडगे (वय ६० वर्ष , रा. लऊळ ) असे त्या मारहाण झालेल्या वृद्धाचे नाव असून शनिवारी सकाळी त्यांना बिट्टू घाडगे व सुवर्णा घाडगे या दोघांनी तू आमच्या शेतात यायचे नाही असे म्हणून लाकडाने व लाथा बुक्क्याने मारहाण केली . यात डोक्याला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्यांना कुर्डवाडी येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात ते स्वतः आज सोमवारी सकाळी दाखल झाले.

# नवले सिंहगड महाविद्यालयात 'एफडीपी'चा समारोप

### राज्यभरातील प्राध्यापकांचा सहभाग; संशोधन, उद्योग व आधुनिक तंत्रज्ञान विषयांवर मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी यांच्या पुढाकारातून एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या एक आठवड्याच्या प्राध्यापक विकास कार्यक्रमचा समारोप झाला. क्षमता उजागर करणे : रसायनशास्त्र शिक्षणतज्ज्ञांना सशक्त बनविणे'' या विषयावर आधारित हा उपक्रम दि. ४ ते ८ मे या कालावधीत पार पडला. राज्यभरातील प्राध्यापक, संशोधक व शिक्षणतज्ज्ञांनी या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

समारोप समारंभास प्रभारी कुलगुरू तथा प्र-उपकुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा प्रमुख उपस्थित होते. यावेळी कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, ज्येष्ठ संशोधक डॉ. एस. एच. पवार, डॉ. ए. ए. घनवट, प्रा. के. एस. पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक व सहभागी शिक्षक उपस्थित होते.''क्षमता उजागर करणे : रसायनशास्त्र शिक्षणतज्ज्ञांना सशक्त बनविणे'' या विषयावर आधारित हा उपक्रम दि. ४ ते ८ मे दरम्यान एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे होत आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन पद्मश्री प्रो. गणपती यादव यांच्या हस्ते झाले होते.

कार्यक्रमात पॉलिमर सायन्स, केमिकल इंजिनिअरिंग, इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी, इंडस्ट्री ४.०, संशोधन प्रकाशन व नीतिमत्ता, पेटंट प्रक्रिया, आधुनिक साधनांचा वापर, विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, तसेच सोलापूरच्या वस्त्रोद्योगाचे भविष्य अशा विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सीएसआयआरराष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (-), पुणे येथील वरिष्ठ वैज्ञानिकांसह विविध विद्यापीठांतील मान्यवर प्राध्यापकांनी सत्रांमध्ये सहभाग नोंदविला.

समारोपाप्रसंगी डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी सांगितले की, हा एफडीपी अत्यंत चांगल्या पद्धतीने पार पडला असून सहभागी शिक्षकांकडून प्रतिसाद आणि सकारात्मक फीडबॅक मिळाला आहे. विद्यार्थी हित समोर ठेवून अशा उपक्रमांचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे. या माध्यमातून प्राध्यापकांच्या ज्ञानात व संशोधन क्षमतेत निश्चितच भर पडेल. कार्यक्रमादरम्यान संशोधनातील नव्या दिशा, उद्योग-शिक्षण समन्वय, बौद्धिक संपदा हक्क आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अध्यापनातील वापर याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रयोगशाळांमधील ''लॅब सेफ्टी'' चे महत्त्वही विशेष अधोरेखित करण्यात आले. समारोपावेळी सर्व सहभागी शिक्षकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. मानसी जाधव यांनी केले.



## पुल्ली कन्या प्रशालेचा दहावीचा निकाल ९९ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

सौ भू. म. पुल्ली कन्या प्रशालेचा दहावीचा निकाल ९८.५४% इतका लागला. ७८ विद्यार्थिनींनी विशेष प्राविण्य मिळवले तर १०६ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.

दिव्या जाधव ही शेतकरी कुटुंबातील विद्यार्थिनी ९५ टक्के गुण मिळवून प्रशालेतून पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. श्रद्धा मोगलगिद्दी हिने ९४.२०% गुण मिळवून द्वितीय तर श्रावणी कळसकर हिने ९३.४०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थिनी व पालकांचा पद्मशाली शिक्षण संस्थेचे खजिनदार गोवर्धन कमटम व विश्वस्त श्रीधर चिट्याल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा.श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली व विश्वस्त मंडळाने अभिनंदन केले. मुख्याध्यापिका गीता सादुल, उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम, पर्यवेक्षक परमेश्वर बाबळसुरे तसेच सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखण्यात यश मिळाल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.

## आंबा उत्पादकांच्या मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे १५ मे रोजी आंदोलन

### गिरगाव चौपाटी ते 'वर्षा' निवासस्थानापर्यंत मोर्चा निघणार

**जिल्ह्यातून हजारो शेतकरी मोर्चात सामील होणार**

माळशिरस तालुक्यातून आंबा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने जाणार आहे फडवणीस सरकारने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत केली आहे याचा जाब विचारण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातून हजारो शेतकरी मोर्चात सामील होणार आहेत.

**-अजित बोरकर,** स्वाभिमानी शेतकरी संघटना

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ११ मे-**

महाराष्ट्रातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचा योग्य मोबदला मिळावा तसेच बागायतदारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, या प्रमुख मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना यांच्या वतीने माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवार दि. १५ मे रोजी मुंबई येथे धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यभरातील आंबा उत्पादक, बागायतदार व शेतकरी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार आहेत. ''फडणवीस साहेब, घोषणांचा पाऊस खूप झाला... आता तरी बागायतदारांच्या पदरात मदतीचा घास घाला..!'' अशा भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. सदर मोर्चा मुंबईतील गिरगाव चौपाटी येथून दुपारी ३ वाजता सुरू होणार असून मुख्यमंत्री निवासस्थान 'वर्षा'कडे मार्गस्थ होणार आहे. आंबा उत्पादकांना हमीभाव, निर्यात प्रक्रिया सुलभ करणे, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई, तसेच शासनाकडून आर्थिक मदत देण्यात यावी, या मागण्यांसाठी आंदोलन छेडण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# सनातन संस्कार प्रशिक्षण वर्ग सुरु

### संस्कार, अध्यात्म आणि नैतिक मूल्यांचे मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ मे-**

सोलापूर : सनातन संस्थेच्या वतीने उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात २५ हुन अधिक ठिकाणी 'सनातन संस्कार प्रशिक्षण वर्गा'चे आयोजन करण्यात आले आहे. मुलांमध्ये संस्कार, शिस्त, राष्ट्रप्रेम, स्वभाषा आणि भारतीय संस्कृतीविषयी अभिमान निर्माण व्हावा, तसेच अध्यात्मिक जाणीव आणि नैतिक मूल्यांची रुजवण व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत झालेल्या ७ शिबिरांमधून २४५ हुन अधिक मुले आणि ७० हुन अधिक पालकांनी या वर्गाचा लाभ घेतला आहे.

पाच दिवसीय या शिबिरात मुलांना श्लोक, प्रार्थना, सूर्यनमस्कार, अनुलोम-विलोम प्राणायाम, बोधकथा, नैतिक मूल्य संवर्धन, मंदिराचे महत्त्व, नमस्कार करण्याची योग्य पद्धत, वडीलधाऱ्यांचा आदर, प्रार्थना आणि कृतज्ञतेचे महत्त्व, अभ्यास कसा करावा, वाचनाचे महत्त्व, वाढदिवस साजरा करण्याची योग्य पद्धत, अन्नाविषयी संवेदनशीलता, तेजोमय इतिहास, संत आणि राजांचे प्रेरणादायी जीवन, तसेच शौर्य आणि पराक्रमाचे महत्त्व यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे. विविध आध्यात्मिक खेळ, प्रात्यक्षिके, प्रश्नमंजुषा आणि अनुभवकथन यांच्या माध्यमातून मुलांचा उत्स्फूर्त सहभाग वाढविण्यात आला.

या शिबिरात सहभागी झालेल्या पालकांनी मुलांमध्ये सकारात्मक बदल दिसून येत असल्याचे सांगितले. मुलांमध्ये नम्रता वाढणे, हट्टीपणा आणि राग कमी होणे, पालकांचा आदर करणे, नियमित प्रार्थना व नामजप करणे, सूर्यनमस्कार घालणे तसेच श्लोक म्हणण्याची सवय लागणे असे अनेक सकारात्मक बदल मुलांमध्ये दिसून येत असल्याची प्रतिक्रिया पालकांनी व्यक्त केली. काही पालकांनी मुलांनी ''मम्मी'' ऐवजी ''आई'' म्हणण्यास सुरुवात केल्याचेही सांगितले. शिबिराच्या समारोपावेळी मुलांनी नियमितपणे आठवड्यातून एकदा बालसंस्कार वर्ग सुरू करण्याची मागणी केली. तसेच पालकांनीही नियमित सत्संग, संस्कारवर्ग आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि नैतिक मूल्यांवर आधारित अशा उपक्रमांमुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला सकारात्मक दिशा मिळत असल्याचे मत अनेक पालकांनी व्यक्त केले.



## माऊली उद्योग समूहातर्फे बार्शीत माऊली लॉज, बँक्वेट हॉलचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ मे-**

शहरातील राऊत परिवाराच्या माऊली उद्योग समूहाच्यावतीने नव्याने उभारण्यात आलेल्या 'माऊली लॉज आणि बँक्वेट हॉल'चे उद्घाटन मा. आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी राऊत परिवारास नव्या व्यवसायासाठी शुभेच्छा देत शहरात दर्जेदार निवास सुविधा उपलब्ध होणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. या नव्या लॉजमुळे बार्शीमध्ये येणाऱ्या नागरिकांना व पाहुण्यांना चांगल्या दर्जाची राहण्याची सोय उपलब्ध होणार असल्याचेही यावेळी राजेंद्र राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त करताना नमूद केले. माऊली उद्योग समूहाच्यावतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, लॉजमध्ये एसी व नॉन-एसी अशा सुसज्ज व हवेशीर खोल्या, प्रत्येक खोलीला संलग्न स्वच्छतागृह, २४ तास गरम पाण्याची सुविधा, एलईडी टीव्ही व हाय-स्पीड वाय-फाय उपलब्ध आहे. तसेच बसस्थानक, रेल्वे स्थानक व महामार्गाच्या जवळ असल्याने प्रवाशांसाठी सोयीचे ठिकाण ठरणार आहे. बँक्वेट हॉलमध्ये लग्नसमारंभ, साखरपुडा, वाढदिवस, कॉर्पोरेट बैठका व इतर कौटुंबिक कार्यक्रमांसाठी प्रशस्त हॉल, स्वतंत्र डायनिंग व्यवस्था, सेंट्रल एसी सुविधा, आकर्षक इंटेरिअर, दर्जेदार प्रकाशयोजना व स्टेजची सोय करण्यात आली आहे.

# अभावातून यशाचा 'उजेड'!

### दोन किमीची पायपीट अन् कंदिलाच्या प्रकाशात वैष्णवीची दहावीत झेप

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ११ मे-**

अभावातही स्वभाव न बदलता कष्टाची कास धरली की यश कसं पायाशी लोळण घेतं, याचंच मूर्तिमंत उदाहरण बार्शी तालुक्यातील शेळगाव (आर) येथील वैष्णवी मोहन बाडगुडे हिने घालून दिलं आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या दहावीच्या निकालानुसार, वैष्णवीने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ९४.२०% गुण मिळवून ग्रामीण भागासह संपूर्ण जिल्ह्याचे नाव सुवर्णाक्षरात कोरले आहे.

**दैनंदिन संघर्ष आणि दोन किमीची जीवघेणी पायपीट**

वैष्णवीचे कुटुंब अतिशय हलाखीच्या परिस्थितीत आपला उदरनिर्वाह करते. शेळगाव (आर) हे गाव सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवर वसलेले असल्याने भौगोलिक अडचणींचा डोंगर कायमचाच. वैष्णवीचे वडील मोहन बाडगुडे यांची शेती शेजारच्या धाराशिव जिल्ह्यातील वाणेवाडी (ता. तुळजापूर) शिवारात आहे. घरापासून शेतापर्यंत जाण्यासाठी पक्क्या रस्त्याचा साधा मागमूसही नसताना, पावसाळ्यात चिखल तुडवत आणि उन्हाळ्यात रणरणत्या उन्हात वैष्णवी दररोज साधारण २ किलोमीटर अंतर पायपीट करत शेतात जायची. ही केवळ पायपीट नव्हती, तर तिच्या स्वप्नांचा पाठलाग होता.



**अंधारालाही दिली मात; अभावातून उजळलं भविष्य**

शेतात वास्तव्यास असताना वीज आणि मूलभूत सोयीसुविधांची मोठी वानवा होती. मात्र, निसर्गाच्या आणि परिस्थितीच्या या आव्हानांना तिने कधीही जुमानले नाही. शेतात राहून घरच्या कामात आणि शेतीच्या कामात आई-वडिलांना मदत करत असतानाच तिने अभ्यासाचे नियोजन केले. दिवसभर कष्ट केल्यानंतर थकवा जाणवत असतानाही, रात्रीच्या वेळी जेव्हा गाव शांत असायचे, तेव्हा वैष्णवी सौर कंदील आणि बॅटरीच्या मंद उजेडात तासन् तास अभ्यास करायची. तिच्या डोळ्यांतील जिद्दीने त्या अंधारालाही फिके पाडले होते.

**माझं यश आई-वडिलांच्या कष्टाचं फळ**

आपल्या यशाबद्दल बोलताना वैष्णवी भावूक झाली. ती म्हणाली, माझं यश हे केवळ माझं नसून माझ्या आई-वडिलांच्या कष्टाचं फळ आहे. शेतात राबताना आणि चिखल तुडवत शाळेत जाताना अनेकदा थकवा यायचा, पण बाबांच्या कपाळावरचा घाम आणि आईची जिद्द पाहिली की माझा सगळा थकवा पळून जायचा. आमच्याकडे वीज नव्हती, पण मनातला अभ्यासाचा प्रकाश विझू दिला नाही. कंदिलाच्या उजेडात अभ्यास करताना मी फक्त पुस्तकं वाचत नव्हते, तर माझ्या कुटुंबाचं भविष्य घडवण्याचं स्वप्न पाहत होते. जिद्द आणि सातत्य असेल तर परिस्थिती कधीच अडथळा ठरू शकत नाही, हेच मला या गुणांतून सिद्ध करायचं होतं. पुढे जाऊन मला उच्च शिक्षण घेऊन समाजासाठी काहीतरी चांगलं करायचं आहे. वैष्णवीच्या या यशामुळे केवळ बाडगुडे कुटुंबाचाच नव्हे, तर संपूर्ण बार्शी तालुक्याचा शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्दीच्या जोरावर आभाळाला गवसणी घालता येते, हेच वैष्णवीने दाखवून दिले आहे.



## रिपब्लिकन सेनेच्या सोलापूर लोकसभा जिल्हाध्यक्षपदी अमित कांबळे

**सोलापूर, दि. ११ मे-**

रिपब्लिकन सेनेच्या सोलापूर लोकसभा जिल्हाध्यक्षपदी अमित कांबळे यांची निवड करण्यात आली. रिपब्लिकन सेनेची महत्वपूर्ण आढावा बैठक सोलापूर येथे पार पडली. या बैठकीत संघटनेच्या विस्तार, बळकटीकरण आणि आगामी थोरणांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीस रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर, राष्ट्रीय महासचिव संजीव बावधनकर, प्रदेश अध्यक्ष सुशील सूर्यवंशी, प्रदेश सचिव सोमनाथ भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. संदीप क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विश्वजीत सरवदे, शरणू हजारे, सिध्दार्थ कांबळे, आशा रिकिबे, सुनीता सरवदे, राधा गायकवाड, सचिन जाधव, विश्वास उगाडे, महिबूब शेख, वाहिद मुस्तफा, सद्दाम पठाण, दाऊद मुलाणी, विकी बनसोडे, विजय पवार, विक्रम ऐवळे उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वेळापूरमध्ये आमदार रोहित पवार यांचे स्वागत

**वेळापूर, दि. ११ मे-**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांचे आज वेळापूर येथे आगमन झाले. यावेळी त्यांचे स्वागत सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सामाजिक विभागाचे तालुकाध्यक्ष रजनीश बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शक्तीपीठ महामार्गाच्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच परिसरातील विविध प्रश्न, नागरिकांच्या अडचणी आणि प्रलंबित विकासकाम ंबाबतही आमदार पवार यांच्याशी संवाद साधण्यात आला. या प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य सतीश माने-देशमुख, कमलाकर माने-देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष विठ्ठल माने, विनायक माने, धनंजय शिवपुजे, दत्तात्रय चंदनशिवे, उत्तम काशीद, सचिन माने-देशमुख, लोखंडे, मनोज पालकर, रोहित सुतार, प्रसाद जवंजाळ, बापुराव मगर, ओंकार माने-देशमुख, रितेश बनकर, अमित माने-देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.





### महत्त्वाचे...

## वखारिया विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल १०० टक्के

**बार्शी, दि ११ मे -**
तालुक्यातील उपळे (दु.) येथील वखारिया विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. दहावीचा विद्यार्थी समर्थ बुरगुटे याने ९३.४० टक्के गुण मिळवून विद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळवला. शिफा बागवान ९३ टक्के द्वितीय तर राजवर्धन भोसले ९२.८० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. विशेष प्राविण्यासह २८, ग्रेड १ मध्ये १४ तर ग्रेड २ मध्ये ११ व उत्तीर्ण ग्रेड १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, अरुण देबडवार, खजिनदार शितोळे यांनी आणि शालेय समितीचे चेअरमन डॉ.प्रकाश बुरगुटे, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांसह मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर व उपळे ग्रामस्थांमधून कौतुक होत आहे.

## मेघदूत पुरस्कारासाठी काव्यसंग्रह पाठविण्याचे आवाहन

**बार्शी, दि ११ मे-**
येथील कवी कालिदास मंडळाच्यावतीने दरवर्षी आषाढ महिन्यात पहिल्या रविवारी कालिदास महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. महोत्सवात वितरित होणाऱ्या मेघदुत पुरस्कारासाठी काव्यसंग्रह पाठविण्याचे आवाहन कवी कालिदास मंडळाचे अध्यक्ष आबासाहेब घावटे यांनी केले आहे. गेली ३५ वर्ष कवी कालिदास मंडळ साहित्याच्या क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. नवोदित कवींना प्रोत्साहन मिळावे या हेतूने मंडळाच्यावतीने दरवर्षी नवोदित कवींच्या पहिल्या काव्यसंग्रहाला मेघदूत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षीही जानेवारी २५ ते डिसेंबर २५ या कालावधीत प्रकाशित झालेल्या सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रहास या वर्षीच्या कालिदास महोत्सवामध्ये मेघदूत पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरुप आहे. हे पुरस्कार पं.ना.कुलकर्णी यांचे स्मरणार्थ ज्येष्ठ साहित्यिक मुकुंदराज कुलकर्णी यांचेवतीने व मातोश्री जिजाबाई गव्हाणे यांचे स्मरणार्थ ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश गव्हाणे यांच्यावतीने देण्यात येणार आहेत. पुरस्कारासाठी काव्यसंग्रहाच्या तीन प्रती २० जूनपर्यंत स्वतःचे छायाचित्र व अल्प परिचयासह प्रकाश गव्हाणे, ईश्वरी अभ्यासिका, पाटील प्लॉट, शिवाजीनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर. पिनकोड ४१३ ४११ मोबाईल नंबर ९७६३४६६८३० या पत्त्यावर पाठवाव्यात. यावेळी माजी अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी, दत्ता गोसावी, रामचंद्र इकारे, प्रा. रविराज फुरडे, उपाध्यक्ष सौ. सुमन चंद्रशेखर, कार्याध्यक्ष प्रकाश गव्हाणे , सचिव अर्चना पोळ, सदस्य शिवानंद चंद्रशेखर आदी उपस्थित होते.



## पडसाळी विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या निवडी जाहीर

**मोडनिंब, दि. ११ मे-**
पडसाळी विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी बालाजी फरड यांची तर व्हाइस चेअरमनपदी विजयकुमार फरड यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर मावळते चेअरमन व व्हा. चेअरमन यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नुतन चेअरमन बालाजी फरड व व्हा. चेअरमन विजयकुमार फरड यांचा सत्कार सचिन पाटील व रामचंद्र मुटकुळे यांनी केला. यावेळी गुलालाची उधळण करून व पेढे भरवून आनंदोत्सव साजरा झाला. यावेळी पडसाळी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे संचालक दादासाहेब देशमुख, अण्णासाहेब मुटकुळे, तुकाराम सलगर, गणपत मुटकुळे, बिभीषण माळी, नारायण मुटकुळे, शारदा मुटकुळे, अनिता देशमुख, बाळू थोरात यांच्या शिफारशीने निवड करण्यात आली. माजी सरपंच दत्ता फरड, सरपंच योगेश पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष महेश पाटील, ग्रा. पं. सदस्य आण्णासाहेब मुटकुळे, दत्तात्रय देशमुख, तात्यासाहेब फरड, विष्णू फरड, प्रविण पाटील, जयकुमार मुटकुळे, पिंटु सलगर, लक्ष्मण देशमुख, बालाजी मुटकुळे, प्रकाश पाटील, संजय मुटकुळे, सचिन फरड, रामदास फरड, सुग्रीव फरड, दत्तात्रय फरड, धनाजी फरड, सदाशिव फरड, अनुरथ पाटील, विलास देशमुख, सिध्देश्वर देशमुख, करण फरड, ओंकार फरड उपस्थित होते.निवडणूक अधिकारी म्हणूनललिता बागल यांनी काम पाहिले. सचिव विलास चट्टे व गुरुदेव अनभुले यांनी निवड प्रक्रिया पूर्ण केली.

## भर दिवसा सव्वा दोन तोळ्याचे दागिने चोरीस

**सोलापूर , दि. ११ मे-**
बंद घरात प्रवेश करून चोरट्याने केवळ अर्धा तासात कपाटातील सव्वा २ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना मार्केट यार्ड मागील २५६ गाळा येथे शनिवारी सकाळी नऊ ते - साडेनऊ वाजेच्या दरम्यान घडली. याबाबत जेल रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. वैभव झिपरे (वय ३६, रा. २५६ गाळा, मार्केट यार्ड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे कामानिमित्त वडिलांसोबत ९ मे रोजी सकाळी नऊ वाजता घराबाहेर जाऊन अर्ध्या तासात परतले. या दरम्यान चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश करून कपाटातील ९ ग्रॅमचे नेकलेस, १० ग्रॅमचे कानातील जोड आणि ३.५ ग्रॅमची सोन्याची अंगठी असा एकूण सव्वा दोन तोळे वजनाचे दागिने चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक गायकवाड करत आहेत.

# शेतकऱ्यांना मुबलक खते व बियाणे उपलब्ध करावीत

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे निर्देश

- निविष्ठा विक्रेत्याने लिंकिंग केल्यास कठोर कारवाई
- जिल्ह्यात फळबाग लागवडीचे उद्दिष्ट दुप्पट करावे
- राज्याच्या आर्थिक पाहणीत कृषी दरात सोलापूर जिल्हा प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ११ मे-**
जिल्ह्यात आगामी खरीप हंगामासाठी कृषी विभागाने ४ लाख ९९ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन केले आहे. मागील वर्षीपेक्षा खरीप पेरणी क्षेत्रात वाढ दिसत आहे. कृषी व संबंधित विभागांनी खरीप हंगामासाठी खते व बियाणे मुबलक व वेळेवर उपलब्ध करावेत, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथे आयोजित खरीप हंगाम २०२६ आढावा बैठकीत पालकमंत्री मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, खासदार ज्योती वाघमारे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, विभागीय कृषी सह संचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, खत पुरवठा तसेच बियाणे पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडून कृषी विभागाने वेळेतच खते व बियाणे उपलब्ध करून घ्यावीत. जे निविष्ठा विक्रेते लिंकिंग करून शेतकऱ्यांना बोगस खते व बियाणे विकत असतील त्यांच्यावर प्रशासनाने कठोर कारवाई करावी. यामध्ये लोकप्रतिनिधी तसेच अधिकाऱ्यांनी अत्यंत संवेदनशील होऊन काम करावे. पोलिस विभागाने यासंबंधी तक्रारी प्राप्त झाल्यावर तात्काळ गुन्हे दाखल करून घ्यावेत, असेही त्यांनी निर्देशित केले. प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी खरीप हंगामासाठी कृषी विभागाच्या तयारीची सविस्तर माहिती दिली. मागील वर्षी ४ लाख १७ हजार हेक्टरवर खरीप पेरणी झालेली होती. यावर्षी ४ लाख ९९ हजार हेक्टरवर खरीप पेरणी होणार असल्याचे सांगितले. यासाठी खते व बियाणे शेतकऱ्यांना वेळेत उपलब्ध होतील याचेही नियोजन झाले आहे. बफर स्टॉकही उपलब्ध आहे असे माहिती त्यांनी दिली. सोलापूर जिल्ह्याला दोन लाख ५१ हजार ९०० मेट्रिक टन इतका खत उपलब्ध असल्याचे सांगितले. केळी लागवड, फळ लागवड, पीक परिस्थितीत होत असलेला बदल, पीक कर्ज वाटप, नमो शेतकरी योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा अनुदान, पीएम किसान सन्मान निधी, माती परीक्षण पत्रिका या विषयी श्री. भोसले यांनी सविस्तर माहिती बैठकीत दिली.

यावेळी आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, बाळासाहेब देशमुख, समाधान आवताडे, अभिजित पाटील, उत्तम जानकर, नारायण पाटील यांनीही कृषी विभागाने खते व बियाणे वेळेत उपलब्ध करून देण्याची तसेच लिंकिंग होणार नाही याची काळजी घेण्याची मागणी केली.





### नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान वितरित करा

मागील वर्षी अतिवृष्टी व गारपिटीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मिळालेले अनुदान तात्काळ वाटप झाले पाहिजे. शेतकऱ्यांची एकदा ई केवायसी झाल्यानंतर पुन्हा पुन्हा ई केवायसी करू नये व संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान वितरित करावे. ई-केवायसी अनुषंगाने मंत्रिमंडळाने पुनर्वसन सचिवांना याबाबत सविस्तर सूचना दिलेल्या आहेत त्या अनुषंगाने प्रशासनाने अनुदान वितरण करणे अनिवार्य असल्याचे पालकमंत्री श्री. गोरे यांनी सुचित केले.

### शेतकऱ्यांचे माती परीक्षणासाठी प्रबोधन करावे

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेत जमिनीचे माती परीक्षण करून घेण्याबाबत लोकप्रतिनिधी तसेच कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रबोधन करावे. तसेच जिल्ह्याला एकच माती परीक्षण लॅब आहे. तरी यापुढील काळात प्रत्येक तालुक्याला माती परीक्षण लॅब असावी याबाबत प्रयत्न करणार असल्याचे श्री गोरे यांनी सांगून कृषी विभागाने फळबाग लागवडीत चांगले काम करावे यासाठी मागील वर्षीपेक्षा यावर्षी फळबाग लागवडीचे उद्दिष्ट दुप्पट करावे व प्रत्येक तालुका कृषी अधिकाऱ्यांना उद्दिष्ट ठरवून देण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

### अल निनो सुरक्षा कवच पंचसूत्री राबवा

दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेऊन कृषी विभागाने अल निनो सुरक्षा कवच पंचसूत्री राबवावी. यामध्ये पीक नियोजन, पाणी व्यवस्थापन, कीड रोग व्यवस्थापन, पावसाचा खंड व्यवस्थापन, जोखीम व्यवस्थापन आदीबाबत सर्व शेतकऱ्यांना व नागरिकांना जागृत करावे, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले. वीज वितरण कंपनीने त्यांच्याकडे प्रलंबित असलेले डीपी दोन दिवसात दुरुस्त करून शेतकऱ्यांना सुरळीतपणे वीज पुरवठा करावा. सर्व बँकांनी शेतकऱ्यांना त्वरित पीककर्ज केला पाहिजे, असे ही सूचना त्यांनी दिल्या.

### सोयाबीन पिकाची प्रातिनिधिक स्वरूपात पेरणी

प्रारंभी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते आंबा फळझाडाला पाणी घालून, सोयाबीन पिकाची प्रातिनिधिक स्वरूपात पेरणी करून तसेच दीप प्रज्वलन करून खरीप हंगाम बैठकीला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच उत्कृष्ट उत्पादन घेतलेल्या शेतकऱ्यांना पालकमंत्री यांच्या हस्ते गौरवण्यात आले. तर कृषी विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचाही सन्मान पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला.

### क्यूआर कोडचे विमोचन -

कृषी निविष्ठांच्या अनुषंगाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सहज व सुलभ पद्धतीने तक्रार नोंदविता येईल यसाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या संकल्पनेतून क्यूआर कोड तयार करण्यात आलेला आहे. हा क्यूआर कोड प्रत्येक ग्रामपंचायत कृषी सहाय्यक कार्यालयात उपलब्ध करून दिला जाणार आहे त्या अनुषंगाने संबंधित शेतकरी यावर तक्रार नोंदवतील व त्या तक्रारीची दखल घेऊन जास्तीत जास्त सात दिवसात त्याचे निवारण करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिली. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे व मान्यवरांच्या उपस्थितीत या तक्रार निवारण क्यूआर कोड चे विमोचन करण्यात आले.

## मंगळवेढा नगरपरिषदेत दरमहा 'जनता दरबार' भरवा



### 'एक दिवस गावासाठी' सामाजिक उपक्रमाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ११ मे -**
नागरिकांच्या दैनंदिन समस्या प्रशासनापर्यंत पोहोचून तात्काळ निर्णय व्हावेत, यासाठी मंगळवेढा नगरपरिषदेत महिन्याच्या पहिल्या सोमवारी नियमित जनता दरबार भरवण्याची मागणी 'एक दिवस गावासाठी' या सामाजिक उपक्रमाने केली आहे.

मागणी संदर्भातील निवेदन नगराध्यक्षा सुनंदा आवताडे, उपनगराध्यक्ष येताळा भगत, मुख्याधिकारी तसेच सर्व नगरसेवकांना देण्यात आले. नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या निराकरणासाठी जनता दरबार हा लोकाभिमुख उपक्रम आहे. नागरिकांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत, तर नगराध्यक्ष, नगरसेवक आणि प्रशासकीय अधिकारी नागरिकांशी संवाद साधून समस्या जाणून घेतील. पाणीटंचाई, नाले सफाई, रस्त्यांची दुरवस्था, स्ट्रीट लाईट, स्वच्छता, आरोग्य, अतिक्रमण आदी प्रश्नांवर जनता दरबारामध्ये त्वरित कार्यवाही होवू शकते. प्रत्येक प्रभागातील नगरसेवकांनी आठवड्यातून किमान एकदा आपल्या प्रभागात नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधावा, त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशीही मागणी करण्यात आली.

नगराध्यक्षा सुनंदा आवताडे यांना निवेदन देताना माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष मल्लय्या स्वामी, वारी परिवाराचे अध्यक्ष सतीश दत्तू, सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाचे माजी अध्यक्ष चंद्रकांत काकडे, सिद्धेश्वर शिंदे, कृषीतज्ञ अजय आदाटे, गणेश मेहकर आदी उपस्थित होते.



## सहकार महर्षि कारखान्याच्या वतीने वृक्षारोपण

### नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ११ मे-**
सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि, शंकरनगर-अकलूज येथे आज नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्याहस्ते कारखाना परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांनी कारखाना स्थापनेपासून कारखाना परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व संवर्धन केलेले आहे. कारखान्याचे मार्गदर्शक संचालक विजयसिंह मोहिते-पाटील, चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील व संचालिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून यावर्षीपासून कारखाना परिसर, कामगार कॉलनी तसेच उपलब्ध मोकळ्या जागेत वृक्षारोपण केले आहे. शेती विभागाकडून याचे संगोपन होत आहे. कारखान्याच्या विविध विभागीय कार्यालयात ५ जून पर्यावरण दिनी तसेच या महिन्यात वृक्ष लागवडीचा मनोदय सयाजीराजे मोहिते-पाटील यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमप्रसंगी कारखान्याचे सेक्रेटरी अनिल काटे, चिफ अकौटंट वाय. बी. इनामदार, मुख्य शेतकी अधिकारी आर.एस.चव्हाण, सिव्हिल इंजिनिअर एस.ए. शेखर, बी.व्ही. सावंत, एस. जे. नरसाळे, पी.एच. इनामदार, एस. एम. साळुंखे, आर. एस. गायकवाड, गॅरेज इन्जार्ज बी. आर. इनामदार तसेच विविध विभागाचे सेक्शन इन्चार्ज, कामगार संचालक जयवंत माने-देशमुख, युनियन प्रतिनिधी तसेच शेती विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सांगोल्यात राष्ट्रीय लोकअदालतीत ११७ प्रकरणे निकाली

### तब्बल १ कोटी ६ लाख ७३ हजार २०६ रुपयांची वसूली

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.११ मे -**
उच्च न्यायालय मुंबई, सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष एम.एस.शर्मा, सचिव एस.एस.शिंदे, सांगोला तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष पी.आर.कुलकर्णी व विधीज्ञ संघ यांचे सहकार्याने सांगोला न्यायालय आवारात आज राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन केले होते. लोकअदालतीत ११७ प्रकरणे निकाली निघाली. तब्बल १ कोटी ६ लाख ७३ हजार २०६ रुपयांची वसूली झाली.



लोकअदालतीत एकूण ६४ प्रलंबित प्रकरणे तसेच दाखलपुर्व (बँक, पतसंस्था, नगरपालीका, ग्रामपंचायत, एम.एस.ई.बी यांचे वसुलीची) एकुण ५३ प्रकरणे निकाली झालेली आहेत. या एकूण ११७ निकाली प्रकरणांमधुन १ कोटी ६ लाख ७३ हजार २०६ रुपयांची तडजोड करण्यात आली. कौटुंबिक वादातून विभक्त झालेल्या एका प्रकरणात समेट घडवून आणण्यात यश मिळाले. लोकअदालत यशस्वी करण्यासाठी विधीज्ञ संघाचे अध्यक्ष व्ही.व्ही.बाबर व सर्व पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले. तसेच सांगोला न्यायालयाचे सहायक अधीक्षक ए.एस.बमनळ्ळी, डी.डी.मायभाटे, विधीसेवा समिती व न्यायालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### तीन पॅनलमार्फत निवाडे निकाली

सदर राष्ट्रीय लोकअदालतीत एकूण ३ पॅनल तयार केले होते. यामध्ये पॅनल प्रमुख म्हणून न्यायाधीश पी.आर.कुलकर्णी, सहन्यायाधीश ए.ए.पाटील, सह दिवाणी न्यायाधीश एस.एस.साळुंखे तसेच पॅनल विधिज्ञ म्हणून एम.यु.डबीर, ए.डी.कांबळे यांनी काम पाहिले.

## गांधी नाथा रंगजी विद्यालयाचा माजी विद्यार्थी अभिषेक कत्ते आयएफएस अधिकारी

**सोलापूर, दि. ११ मे -**
गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जन मंगल प्रतिष्ठान संचलित गांधी नाथा रंगजी विद्यालयाचा माजी विद्यार्थी अभिषेक योगीराज कत्ते याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत देदीप्यमान यश मिळवले आहे. त्याची भारतीय वन सेवेत क्लास वन अधिकारी म्हणून निवड झाली असून, त्याच्या या यशाने विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



अभिषेक हा शालेय जीवनापासूनच अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्तेचा विद्यार्थी होता. सन २००९ च्या १० वी बोर्ड परीक्षेत ९० टक्के गुण मिळवून त्याने विद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला होता. शालेय शिक्षणानंतर सांगली येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातून त्याने कॉम्प्युटर सायन्समध्ये पदवी प्राप्त केली. पदवीनंतर पुण्यातील नामांकित आयटी कंपनीत एक वर्ष नोकरी केल्यानंतर, त्याने युपीएससीच्या तयारीसाठी दिल्ली गाठली. आपल्या जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर त्याने या कठीण परीक्षेत यश संपादन केले. अभिषेकच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सरोजना मुलींटी, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका स्मिता रणदिवे आणि क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांनी त्याचे कौतुक केले आहे.